महाराष्ट्र–राज्य–साहित्य संस्कृति मंडळ–पुरस्कृत

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ५६) **त्रैमासिक** (अंक १–४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य
खंड १७

हा अंक शक १८९७ चा आहे.
THIS QUARTERLY IS FOR SHAKA 1897

संपादक – प्रा. ग. ह. खरे

मूल्य आठ रुपये

शक १९०० इ. १९७८

महाराष्ट्र–राज्य–साहित्य संस्कृति मंडळ–पुरस्कृत

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ५६) **त्रैमासिक** (अंक १–४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १७

हा अंक शक १८९७ चा आहे.
THIS QUARTERLY IS FOR SHAKA 1897

संपादक – प्रा. ग. ह. खरे

मूल्य आठ रुपये

शक १९०० इ. १९७८

निवेदन

'ऐतिहासिक संकीर्ण साहित्य' या मालेंतील हा १७ वा खंड आहे. या खंडाचे दुसरे नाव 'भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक' वर्ष ५६ अंक १ ते ४ असे आहे. काही चुकीच्या समजुतीमुळे याच खंडाला ऐ. सं. सा. खंड १४ असे ग्रंथ-गर्भात व समपृष्ठांवर मथळे दिले आहेत. त्या ठिकाणी खंड १७ असे समजावे.

या खंडात दोन प्रकरणांत मिळून एकूण ९१ कागद प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकी क्रमांक १ ते ६९ हे कागद वाई येथील श्रीमती अन्नपूर्णाबाई कृष्णराव उपाख्य माईसाहेब रास्ते यांजकडील असून उर्वरीत 'संकीर्ण पत्रे' या प्रकरणामध्ये समाविष्ट केलेल्या कागदांपैकी क्र. ७० हा कागद श्री. जेजुरीकर पेशवे, क्र. ८१ हा पुण्यातील तांबड्या जोगेश्वरीचे पुजारी व व्यवस्थापक श्री. भालचंद्र दामोदर बेंद्रे, क्र. ८६ व ९१ हे कागद डॉ. सौ. कमलाताई गोखले यांजकडील आहेत. क्र.७१ ते ७५, ७७ ते ८०, ८३, ८५, ८७ ते ९० हे कागद आपल्या भारत इतिहास संशोधक मंडळात असलेल्या दाभाडे दप्तरातील, तर क्र. ७६, ८२ ते ८४ हे कागद मंडळातील गुप्ते दप्तरातील आहेत.

उपर्युक्त व्यक्तींनीं आपल्याकडील कागद प्रकाशनासाठी मंडळास दिले या-बद्दल मंडळ त्यांचे अत्यंत आभारी आहे.

हे कागदपत्र नीट समजावे म्हणून त्यावर शक्य तितक्या थोडक्यात टीपा दिलेल्या आहेत. त्या अभ्यासकांना उपयुक्त ठरतील असा विश्वास आहे. वाचकांस ठाऊक असेलच की पेशवाईतील पत्रव्यवहारापैकी फार थोड्या पत्रांत पूर्ण काल दिलेला असतो. सुमारे शेकडा ९० पत्रांतील कालनिर्देश अपुरे असतात. यामुळे संपादकाला अशा अपुऱ्या कालनिर्देश असलेल्या पत्रांचे काळ ठरविणे आवश्यक असते. त्याप्रमाणे यथे अपूर्ण कालनिर्दिष्ट पत्रांचे काल निश्चित ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात अभ्यासकांना काही चुका आढळल्यास त्या कळविण्याची कृपा करावी.

पेशवाईत ब्राह्मण सरदारांमध्ये पटवर्धनांच्या खालोखाल मोठे सरदार म्हणजे रास्ते हे होत. पटवर्धनांप्रमाणे त्यांनाही कर्नाटकात, सामान्यतः पटवर्धनांच्या सरं-जामाच्या पूर्वेस सरंजाम मिळाला होता. पटवर्धनांच्याप्रमाणे रास्ते घराण्यातील पुरुषांनी हैदर, टिपू यांशी झालेल्या लढायांत भाग घेतला होता. अपेक्षा अशी होती कीं, पटवर्धनी दप्तराप्रमाणे यांच्याही दप्तरात शेकडो तत्कालीन राजकारणाची

माहिती देणारे कागद मिळावेत. पण आज तरी मंडळाला प्रकाशित करण्यासारखे एवढेच कागद मिळाले आहेत. याच रास्ते घराण्यातून कित्येक वर्षांचे जमाखर्ची कागदपत्र मंडळात आले आहेत. त्याचा अभ्यास चालू आहे. अर्थव्यवहारासंबंधी मनोरंजक व उद्‌बोधक माहिती त्यात मिळत आहे. ती माहितीही जमेल तशी व यथावकाश मंडळ प्रसिद्ध करणार आहे.

या अंकातील पत्रांचे संपादन प्रा. ग. ह. खरे यांनी केले आहे. आजपर्यंत प्रा. ग. ह. खरे यांनी वाईहून काही हजार पोथ्या आणि शेकडो ऐतिहासिक कागद मंडळाच्या संग्रहात आणले आहेत. अशाच कागदांपैकी ही पत्रे आहेत. प्रा. खरे यांचे आभार मानणे मंडळाचे कर्तव्य आहे. त्यांचे संशोधन चिकाटीचे परंतु बहुमोलाचे ठरते. या किंचित क्लिष्ट कार्यात त्यांना मंडळाच्या लेख्यशाळेतील सेवक श्री. मा. मो. ओंकार यांचे साहाय्य झाले आहे. त्यांचे आभार मानण्यास आम्हास आनंद वाटतो. कागदटंचाई, कागदाच्या किंमतीतील महर्गता, आणि इतर कित्येक अडचणी यांमुळे हा अंक सादर करण्यास मंडळास उशीर झाला आहे याची जाणीव आहे. अशाही अडचणीत ज्ञानविलास छापखान्याचे चालक श्री. जोशी यांचे सहकार्य मिळाले. त्यांचे मंडळ आभारी आहे. उत्पन्न होणाऱ्या महत्त्वाच्या अडचणींवर मात कशी करावयाची या प्रश्नाचा मंडळास विचार करावा लागेलच. पण अशा अडचणींतही नेहमीप्रमाणे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचे बहुमोलाचे साहाय्य झाले आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाचे मंडळ आभारी आहे.

लवकरच निबंध लेखाचा अंक व सूची अंक सादर करण्याची मंडळ उमेद धरून आहे.

चिं. ना. परचुरे

चिटणीस

शक १९०० भाद्रपद शु. १४ भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे

अनंतचतुर्दशी

शुद्धिपत्र

पत्र क्र.	ओळ क्र.	
४	९	‘त्याजबरोबर’ नंतर ‘सदरहू पंचवीस हजार रुपये तुम्ही पाठविले’ हा मजकूर
६	२	‘वद्य’ पूर्वी ‘पौ (पौष)’
६	२	‘इ’ नंतर ‘१७५२’ ऐवजी ‘१७५१’
६	९	‘व’ नंतर ‘सो’ ऐवजी ‘रा’
७	१	‘श १६७६–७८’ ऐवजी ‘श १६७७ पौष शुद्ध ८’
७	२	‘इ १७५४–५६’ ऐवजी ‘इ १७५६ जानेवारी ९’
७	८	‘माणूस’ नंतर ‘रा’ ऐवजी ‘रा’
७	१५	‘निरंतर’ नंतर ‘पात्री’ ऐवजी ‘पत्री’
८	१	‘श १६७६–७८’ ऐवजी ‘श १६७७ पौष वद्य १३’
८	२	‘इ १७५४–५६’ ऐवजी ‘इ १७५६ जानेवारी २९’
८	१०	‘६’ ऐवजी ‘२६’
९	१	‘श १६७६–७८’ ऐवजी ‘१६७७’
९	२	‘इ १७५४–५६’ ऐवजी ‘१७५६’
१०	१	‘श १६७६–७८’ ऐवजी ‘श १६७७ पौष शुद्ध १४’
१०	१	‘इ १७५४–५६’ ऐवजी ‘इ १७५६ जानेवारी १६’
१०	८	‘लोकांची’ नंतर ‘घता’ ऐवजी ‘घेता’
१०	१८	‘आले’ नंतर ‘त्याजकरून’ ऐवजी ‘त्याजवरून’
१६	१०	‘धाकटे’ नंतर ‘नामा’ ऐवजी ‘नाना’
१७	१५	‘सबनिसीची’ नंतर ‘मुतालेकी सागाबयाचे’ ऐवजी ‘मुतालकी सागावयाचे’
१८	५	‘नजीक’ नंतर ‘वेगरूल’ ऐवजी ‘बेगरूल’
१९	५	‘नमस्कार’ नंतर ‘विज्ञापना’ ऐवजी ‘विज्ञापना’
२३	१३	‘लिा’ नंतर ‘कृपालोभ’ ऐवजी ‘कृपा लोभ’
२४	२	‘शुद्ध १४’ नंतर ‘सोमवार’
२७	२	‘वद्य ६’ नंतर ‘सोमवार’
२८	१	‘श १६८३’ नंतर ‘माघ’ ऐवजी ‘कार्तिक’
२८	२	‘वद्य १४’ नंतर ‘बुधवार’

२९	२	'वद्य १' नंतर 'रविवार'
३०	२	'वद्य ७' नंतर 'रविवार'
३१	२	'वद्य २' नंतर 'गुरुवार'
३२	२	'शुद्ध १४' नंतर 'मंगळवार'
३३	१	श १६८५ नंतर 'अधिक ज्येष्ठ' ऐवजी 'ज्येष्ठ'
३६	२५	'केले' नंतर 'प्रो' ऐवजी 'पो'
४०	३	'भाद्रपद' नंतर 'शुद्ध' ऐवजी 'वद्य'
४३	२	'रखर' नंतर '२१' ऐवजी '१०'
४९	१६	'सरंजाम' नंतर 'देतो समई' ऐवजी 'देते समई'
५०	६	'डेऱ्यास' नंतर 'पाठवूस' ऐवजी 'पाठवून'
८४	१	'जमादिलावल २९'
८८	१	'वद्य १३ नंतर 'गुरुवार'

पान ६१, ६३ पृष्ठ मथळा : 'वाई : गोशाळा रास्ते' ऐवजी 'संकीर्ण पत्रे'

卐 卐 卐

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १४ वा

वाई-रास्ते

१

गोरा ५ रजब	श्री	श. १६७२ ज्येष्ठ इ. १७५० मे–जून

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मल्हारराऊ स्वामी गोसावी यांसि –

पोष्ये लक्ष्मण कासी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान तुमचे कृपाद्रिष्टी करून ता। छ [मो. जा.*] माहे रजब स्वस्तिक्षेम जाणून तुम्ही आपले स्वकुशल लेखन करून संतोषविले पाहिजे विशेष श्रीमंत राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान स्वामीनी ममतेने फौजेचे सरजामास परगणा दिल्हा तुम्ही कृपा करून कमावीस आम्हांस सांगितली त्यास मालवियांतील धंदा इमाने प्रमाणे कामकाज करून श्रेमसायास करून लावणी इजाफा करून सरकारचे नेमणुकेसिवाये दोन च्यार हजार रुपये तुम्हास पावऊन कृपा संपादून घ्यावी हे मनात आणून धंदा कबूल केला तुमची अज्ञा घेऊन स्वार जालों ते मजल दरमजल रात्रंदिवस करून जेष्ट सुध चतुर्दसीस सुरजेस पावलो परगणियाचा मजकूर मनास अणिता सुरजेपासून पूर्वेस पांचा कोसावर आहे परगणियांची लांबी च्यार कोसावर आहे रुंदी दीड कोस परगणियाचे असपास पश्चिमेस सुरज दक्षणेस भेलसे अग्नकोनास बसोदे पूर्वेस भोवरासे उतरेस मुगावली दरम्यान ताल उनारसी पा। मजकुरचे वर्तमान तर का। ताल येथे मुसलमानाची वस्ती कोसावरून पाणी प्यावयासी अणितात त्यामुले उनारसींत गढी यारमहमद रोहिला होता त्याणे बांधली तेथे सरकारचे ठाणे राहाते गढी उतम अहे परगणियांत कोणी मवास नाही जमीदारही कोणी मातबर नाही सरकारचे तरफेने जो राहील त्याणेच तरतूद लावणीची करावी गांव इजारा द्यावे काहीं गांव रयेतीची निशा करून कौल करार देऊन लावावे गांव कुल बेतालीस त्यामधें दोन दाखली त्यास पांढरी व कालीचा ठिकाणा नाही चालीसा गांवात मोडून गेले आहेत त्यामधे इजारा असामीवार तेवीस गांव अहेत सतरा रयेती अहेत याजवर लावणीचा विचार तर पठाणाच्या अमलापासून कोठें गुरु चरावयासी जागा राहिली नाही लावणी कुल आहे याजवर अकार सालगुदस्ता सुा। खमसेन सालातील राजश्री लक्ष्मण शंकर याणी अकार केला

त्याची यादी अलाहिदा तपसिलवार पाठविली अहे त्यावरून पा मजकुरचे वर्तमान श्रृत होईल याजवर अमल तगीर जाला याजमुले राजश्री लक्ष्मण शंकर याजकडील कमाविसदार तुकोपंत याणी मोकदम व इजारदार पा मजकुरचे कैदेत बाकीबदल घातले त्यास अम्हीही प्रसंगास आलो त्यास मनास अणिता बाकी बहुत राहिली गतवरसी पीकही नाही अणि सवंगाईमुले रयेतीत ताकत राहिली नाही यैसे असोन त्याणी रयेतीवर नजर देऊन लावणी करावी तर ज्याचा अमलच तगीर जाला त्यास रयेतीची ममता येते यैसा अर्थ नाही बाकी झाडून घ्यावी हाच निश्चये त्यांचा त्यास अम्ही तुकोपंताची भेटी घेतली त्यावर च्यार गोष्टी सांगावयाच्या त्या सांगितल्या संनदी जे बोलणे तेच त्यास बोलिलो त्यावर प्रसंग यैसा दिसोन अला की बाकीमुले लावणी बुडते त्यावर अम्ही त्यास परिछिन सांगितली की बाकीमुले परगणियाची लावणी बुडते अणि सरकारात तुमचा ताहूत अहे ज्या गोष्टीने लावणी होये अणि बाकीही वसुलात ये ते गोष्ट करणे अम्ही खावंदास लेहून पाठऊ आणि तुम्हीही अपल्या खावंदास लेहून पाठवणे खावंदाची अज्ञा तुम्हासच अली की लावणी बुडवणे अणि बाकीच घेणे यैसेंच निश्चयात्मक जालें तर लावणी तुम्हाकडे लागली व पुढें ताहूद सरकारांत तुमचा अहेच यामधे अमची नुकसानगिरी कांही नाही जे गोष्ट करणे ते खावंदाचा शब्द तुम्हावर न ये ते करणे त्यावर प्रसंग पाहून मोकदम कैदेत होते त्याचा हवाला बाकीचा घेऊन लावणीवर दृष्टी देऊन मोकदम घेऊन ठाणे मजकुरास अलो रयेतीस कौलपत्र देऊन लावणी करावयासी लाविले त्यास कैदेमुले लावणीचे अंतर थोडेबहुत पडेल यैसे दिसोन येते त्यास जमीनदाराची अबरू घ्यावी मार द्यावे परंतु बाकी झाडून घ्यावी यैसा विचार त्याणी केला होता त्यास प्रसंग यैसा दिसोन अला कीं जेंव्हा मोकदमाची अबरुच गेली तेव्हा परगण्याची मामलत सहजच बुडाली याजकरिता कार्यावर नजर देऊन हवाला घेतला त्यास परगणियाचा अकार पडले पान सालमजकुरी पा म [अपूर्ण*]

२

गोरा ४७
फाल्गुन शुद्ध ५ मंगळ } श्रीशंकरप्रसन { श. १६७२ फाल्गुन शुद्ध ५
इ. १७५१ फेब्रुवारी १९

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्यें मल्हारीने दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता फालगुण सुध पंचमी मंगळवार जाणोन मुा बागडकोट नदी घटप्रभा येथे वडिलांचे आसिर्वा [दे*] करून सुखरूप आसो विशष तीर्थस्वरूप रा पुडलीक

नाईक तात्या याचे लग्न माघ सुध दशमीस जाहाले रा कृष्णाजी नाईक जोसी सातारियांत होते त्याची कन्या वाईत आणून लग्न केलें वडिलांस कलावे म्हणोन लि॥ आसे नवरी नवा वर्षाची आहे तीर्थस्वरूपाच्या चितात लग्न करावयाचे नव्हते परंतु श्रीमंताही व सौ॥ मातुश्रीबाईनी आणून सागून करविले वडिलांस कलावे वरकड समस्त सुखरूप असेत श्रीमंत पुढे करणाटकात जाणार तीर्थस्वरुप सौ। मातुश्रीबाईही सांगातीच आहेत व मुलेही सागातीच आहेत सुखरूप आहेत वरकड सत्परुसीकडील पूर्वस्थित आहे त्यप्रोाच आद्याप आहे कलले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंति.

आपत्यासमान गणेश कृष्ण कृतानेक सिर सां नमस्कार विनंति उपरी लिा परिसोन सदैव आसिर्वादपत्र पाठऊन साभाल करीत जावे वडिली तिरस्थली यात्रा करून कार्तिक मासी देशास आले पाहिजे शरिरास निगा बहुत प्रकारे करीत असावे सीतल देश आहे वडिलाप्रती बहुत काय लिहू कृपा आसो दीजे हे विज्ञप्ति

३

गोरा ४२ वैशाख शुद्ध १३ | श्री | श. १६७३ वैशाख शुद्ध १३ इ. १७५१ एप्रिल २७

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

पोष्ये सुबाजी षेशाद्री साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल त॥ वैशाख सुध त्रयोदसी जाणून स्वकीयें कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले लिहिले सविस्तर कलो आलें सविस्तर मजकूर लक्ष्मण यांजबा। पत्रे पाठविली आहेत त्यावरून विदित होईल इकडील बदोबस्ती येथास्थित असे वरकड पुणियाकडील सभोवते गाव जालितात फारच दंगा जाहाला आहे दाभाडे याचे तलेगांवी जप्ती आली ऐसे वर्तमान आहे आपणास विदीत व्हावे याकरिता लिहिलें आहे [नि*] दाभाडियाची फौज तलेगावास आली पुण्याभोवते गाव त्यांनी जालिले आपणास कला [वे*] म्हणून लिहिले असे पुण्याची अवस्ता काये होईल पाहावे इकडील बंदोबस्त जाला म्हणजे आपणाकडे लोक पाठवितो उतर पा। बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंति पागा आपलेकड आणावी आणि सडे वाईत राहवे सर्व गडास पावते करावे

४

गोरा २६
सु. ११५२ सफर२६ } श्री { श. १६७३ पौष वद्य १३
इ. १७५२ जानेवारी ३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भिकाजी नाईक रास्ते स्वामीचे सेवेसी

पोष्य त्रिबकराव विस्वनाथ सां नमस्कार विनती उपरी येथील कुशल ताा छ २६ सफर पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष तुम्हाकडे सरकारात कर्जाचा ऐवज रुपये पंचवीस हजार करार करून पंचवीस हजार रुपयाचे खत तुम्हाकडे लिहून पाठविले तो ऐवज आणावयासी राजश्री नागो सिवाजी कारकून पाठविलें त्याज बरोबर त्यापैकी वजा.............. रुपये

२८४ बहुडा खोटे हिणाचे वगैरे
१ नापैवस्ता अधेल्या दोन
दोन रुपयाचे मुबदला
म्हणून लागल्या साा

२८५

येकूण दोनसे पंच्यासी रुपये बाकी रुपये २४७१५ चवीस हजार सातसे पंधरा रुपये सरकारात जमा पोतां जाहले असेत सदरहू बहुडा रुपये २८५ दोनसे पंच्यासी सुभानजी चव्हाण व जानेखान खासबारदार दीा सोनजी धनवडे याज-बराबर पाठविले आहेत ते घेऊन सदरहू दोनसे पच्यासी रुपये खासबारदार याज बराबर पाठवून देणे दोनसे पच्यासीस तपसील ऐन बहुडा पाठविले रुपये दोनसे चवऱ्यासी व नापैवस्ता रुपया येक प्रमाणे पाठविलें असेत लस्करचें वर्तमान तर मोंगल नगरास आहे व श्रीमंत नगरापलीकडे तीन कोशावर आहेत असे वर्तमान आहे पुढे जे वर्तमान होईल ते मागाहून लिहून पाठवू सुाा ईसनै खमसैन मया व अलफ बहुत काये लिहिणे [नि*] हे विनंती

५

गोरा २१
मार्गशीर्ष शुद्ध १ } श्रीसकर प्रसन { श. १६७४ मार्गशीर्ष शुद्ध १
इ. १७५२ डिसेंबर ६

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

अपत्य सदासिवानें दोनी कर जोडून सिर साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम ताा मार्गेश्वर शुध१ जाणून वडिली आपले क्षम लिहीत असिले पाहिजे यानंतर वडिलांकडील वर्तनान कलत नाहीं व लस्करचें वर्तमान कलत नाहीं

मोगलाचे श्रीमंताचें युध्ध जाहाले म्हणून येथे बाजारी वर्तमान आहे येसियास लस्करचा कागदपत्र आगर वर्तमान काय आले आसेल ते लेहून पाठविले पाहिजे चिरंजीव भाऊ पुण्याहून आले की नाहीं मल्हारजी पाटलाकडील काय वर्तमान भाऊनी लिहिलें आसेल ते लिहिले पाहिजे त्याजकडील ऐवजाचा निकाल कांही जाहाला कीं नाहीं राजश्री अनंतभट वाकणकर यांनी वधूचे सांगितले होते त्यास वडिलीं लिहिले होते कीं शाधास ब्राह्मण पाठविला आहे त्यास अनंतभटानी अद्यापी कोठे ठीक लाविले की नाही हे लिहिजे तांदलाचा भाव वाईत कैसा आहे बारकाचा पाड कैसा आहे व मोठ्याचा कैसा आहे शेपंनास रुपयांचे थोक मिलेसे आसले तरी रुपये पाठवून देऊं दांडी पालखीची वाईत आहे ती चिरंजीव बाबानी नेली नाहीं त्यास येथे पालखीची दांडी जाया जाहाली आहे तरी भोई पाठविला आहे याजबरोबर पाठवणे तेथे श्रीमंताकडील स्वार व माणसे कितीक चौकीस आहेत हे लिहिले पाहिजे स्वार व माणसे चवकीस आणविलीं आसलीं तरी उत्तमच जाहाले नाहींतर पुण्याहून कांही स्वार व माणसे चवकीस आणवणे सुचनार्थ लिहिले असे कलले पाहिजे [नि*] बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

६

गोरा १७
वद्य १ रविवार

श्री

श. १६७३ पौष वद्य १
इ.१७५२ डिसेंबर २२

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सुबाजी सेशाद्री सां नमस्कार विनंती येथील कुशल पो बहुल प्रतिपदा रविवार जाणून येथास्थित असे विशेष अजी दीड प्रहर दिवसास श्रीमंत थोरले स्वार होऊन डेऱ्यास गेले उदईक थेवेरास जाणार व पुढे कुरूकुंबास जाऊन मग सालप्याचे घांटाने वडुथावरी येणार यैसे वर्तमान आहे राजश्री तात्यानी पुसिले त्यासी उत्तर दिले कीं वडूथावरून तुम्ही वाईस नेले तरी येऊ म्हणून उत्तर दिल्हे श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व सो विश्वासराव यैसें पुण्यात राहिले थोरले श्रीमंत व रा दादा व रो माधवराव व सौ बाई देखील बाहेर गेले अपणास कलावे म्हणून लिहिले आसे वडुथाहून वाईस येतील आपण साहित्यांत असावे वाडे झाडवावे भाजीपाला व कास्टे सामान पुस्कल करावे कापड वगैरे जे घयावयाचे ते अपण राजश्री तात्यास लिहिले आहे ते घेतील अद्यापी घेतले नाही परंतु अता घेतील बहुत काये लिहिणे कृपा लोभ [असो*] दीजे हे विनंती रो कृष्णाजीपंताचे पत्र अले अहे ते अपणाकडे पाठविले अहे श्रीमंतास पत्र होते ते त्यासी दिल्ह त्याचे उत्तर घेऊन पाठवितो हे विनंती

७

गोरा २७
पौष शुद्ध ८ } श्री { श. १६७६-७८
इ. १७५४-५६

श्रीमंत् राजश्री भिकाजी नाईक रास्ते स्वामीचे सेवेसी

पोष्य रामाजी माहादेव सांा नमस्कार विनंती येथील कुशल पौष शुध्द ८ पर्यंत जाणोन स्वकीये लेखन करवीत असावें विशेष स्वामीचे पत्र येऊन साभाल होत नाही तरी ऐसे नसावें सर्वदा कृपापत्रीं सांभालावें उचीत आहे श्रीमंत् राजश्री नारायणराव आपणासंनिध्ध आहेंत यास्तव श्रीमंतांची आज्ञापत्रें लस्करातून येताच सुवर्णदुर्गाहून दोनसें माणूस रा लखमोजीराव खानविलकर यांजबराबर पाठविले उपरांत दुसरे शंभर माणूस तेथून रवाना केले ते स्वामीजवळ जाऊन दाखल जाहालेच आहे अलीकडे साताराकडील हलावल कसी आहे लोकांचे प्रयोजन आहे नाही हे स्वामीचे पत्र येऊन कांहीच न कले यास्तव लिा आहे तरी कृपा करून सविस्तर ल्याहावें श्रीकृपेने श्रीमंतांचे पुण्यप्रतापें करून तांम्रानें सख्य करून घेतले परस्पर भेटी जाल्याची पत्रे पुणियाहून आली ताम्राचा उत्कर्ष राहिला तेव्हा साताराकडीलही राहीलच परंतु आपल्याकडून लेहून यावे याकरिता कागदी पाठविला आहे. [नि*] निरंतर पात्री संतोशवीत असावे बहुत काय लिहिणे हे विनंती

८

गोरा २८
रबिलाखर २६ } श्री { श. १६७६-७८
इ. १७५४-५६

पुा राजश्री भिकाजी नाईक रास्ते स्वामीचे शेवेसी

विनंती ऐसीजे हुजूरचे आज्ञे प्रा लोक आपणाकडे रा केले आहेत या लोकांस अडसेरीचे ऐवजी नख्त दरमाहा सिरीस्त्याप्रां देत म्हणोन येकदोन वेल लिहून पाठविले आहे त्याप्रा आपण अडसेरीस नख्त ऐवज देतच असतील लोकांस अडसेरीस नंख्त ऐवज आपणाकडोन पावेल तो हुजूरून आपणास मंजुरा देतील न देत तरी आम्हास लेहून पाठवावे त्याप्रा अडसेरीस ऐवज पावेल तो देऊं सांप्रत आपणाजवल लोक आहेत खर्चावेचाची बेगमी करीत जावी राा छ ६ राखर बहुत काये लिहिणे लोभकीजे हे विनंती

९

गोरा २९ } श्री { श. १६७६–७८
इ. १७५४–५६

श्रियाविराजित राजमान्य राजश्री भिकाजी नाईक रास्ते स्वामींचे शेवेसी

सेवक नारो कृष्ण मो जंजिरे सुवर्णदुर्ग साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावोन संतोष जाहालां रा लखमोजीराव खानविलकर याणी लेहून पाठविले की लोकास अडसेरीस नख्त ऐवज दरमाहा देविला त्याप्रा पावावा तो मारनिले देत नाही लोकांनी गवगवा केला आहे म्हणोंन लिा त्याजवरून स्वामींस लिहिले आहे तरी स्वारीचे लोकांस अडसेरीस नख्त ऐवज लागेल तो घ्यावा आणि लेहून पाठवावे त्याप्रा रुा पाठऊन देऊ स्वारीचे लोकांची अडसेरीच्या पैक्याकरतां गवगवा न होये ते करून लोकाची समजाविसी करीत जावी स्वारीच्या लोकांस नख्त ऐवज दरमाहा हुजुरोन पावेल चिंता नाही हुजूर लेहून पाठविले आहे तेथून ऐवज यावयासी दिवसगत लागेल लोकास पैका दिल्हा पाहिजे यास्तव लिहिले आहे अडसेरीस ऐवज दरमाहा लागेल तो द्यावा आणि हुजुरून ऐवज येईल त्यापैकी आपणाकडोन रुा पावतील ते उगऊन घ्यावें सारांष लोकांची समजाविसी करून लोकाचे समाधान करावे हुजूरून ऐवज न आला आणि आपणाकडोन रुा पावले तरी बुडतील ऐसा विचार नाही हुजुरन ऐवज न आला तरी काये रूा लागतील ते देऊन लेहून पाठवावें त्याप्रा स्वामींचें रुा पाठवून देऊ रूपये द्यावयास अनमान सहसा न करावा येविसी साष्टीस लेहुन पाठविले आहे तेथून ऐवज आल्यावरी पाठवून देऊ कलले पाहिजे [नि*] बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती

१०

गोरा ३०
रबिलाखर १३ } श्री { श. १६७६–७८
इ. १७५४–५६

श्रियाविराजित राजमान्य राजश्री भिकाजी नाईक रास्ते स्वामीचे शेवेसी

सेवक नारों कृष्ण मों जंजिरे सुवर्णदुर्ग सा नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १३ रबिलाखर पर्येत जाणोन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष स्वामीनी पत्र पाठविले ते पावले राजश्री लखमोजीराव खानविलकर यांजबराबर दोनसे माणूस देऊन रा केले आहेत म्हणोन लिहिले परंतु येथे

हाजिरी लोकांची घता येकसेच्यालिसाची जाहाली बाकी साठ माणूस दोनसेपैकी राहिले त्यांस पत्र पावतांच रवाना करावें म्हणोन लिहिले यैशास श्रीमंताचे आज्ञे-प्रा दोनसे माणूस मारनिलेबराबर रोजमुरा देऊन रवाना केले त्यास नेमणूकप्रमाणे लोकांची हाजरी घेऊन आले कोणत्या पतकाचे न आले कोणत्या पतकाचे त्याचा झाडा काहीच लिहिला नाही लोकाची हाजरी तपसिलवार पाठविली असती म्हणजे लोकाचा सूड कलता त्याप्रो लोकांस ताकीद करून पाठवावयासी कलते ते काहीच लेहून पाठविले नाही लखमोजीराव खानविलकर याचें पत्र येकसेबाहातर लोक आले आहेत म्हणोन लिहिले आहे त्यांस लोक नेमणूकप्रो येऊन हाजीर जाहालेच असतील दोनसें माणूस नेमणूक करून पाठविले त्यापैकी तोंड चुकाऊन पाठीमागे राही ऐसा नाही मागेपुढे लोक गेले यामुले लोकाची चुकामूक जाहाली असेल परंतु नेमणूकप्रा लोक आलेच असतील स्वामीचे पत्र आले त्याजकरून कानकदुर्ग फत्यगड येथील च्यालीस माणूस दुसरे रा केले आहे येऊन दाखल होईल सदरहू लोक दाखल जाहाल्यावरी येकंदर साऱ्या लोकाची हाजीरी घेऊन तपसील-वार पाठविली पाहिजे या लोकास ऐन आसामीस अडसेरीचे ऐवजी रुा २ व पोरग्यास रुा १ येणेप्रा दरमाहा देत जावा हालीचे लोकांस जमादिलोवलचे अडसेरीपैकी यैन आसामीस रुा १।. व पोरग्यास ·।। = पावला असे बाकी वर्तीला नेमणूक-प्रा द्यावा या लोकास व पेसजीच्या लोकास कापड दुसाला पावले नाही देशातील वस्ती आणि कोकणचे लोक यास्तव्र कापड दिल्हे पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती

११

गीरा ३५ माघ वद्य १४ रविवार	श्रीशंकर प्रो	श. १६७७ माघ वद्य. १४ इ. १७५६ मार्च १

तीर्थरूप राजश्री आपा वडिलाचे सेवेसी

बालके अंतोबाने चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता माघ वद्य १४ रविवार मुकाम सावनूरनजीक येथे सुखरूप आसो यानंतरी इकडील वर्तमान तरी मोगल सावनूरचा व मुरारजी व मुशाफरजंग येसे मिलोन दाहा [ह*] जार फौज व गारदी फिरंगी व कानडे प्यादे दाहा हजार आहेत सावनूरचे किलीयाचे आश्रा करून भांडत आसे तोपा त्याच्या व आमच्या तोफातोफाची गोलागोली नित्य आज दोन महि [ने*] जाहाले परंतु गावचा आश्रा केला याजमुले गावावर हाला करीत नाहीत माणूस फर जाया होईल याजकरिता भोवता वेढा घातला आसे आत वैरण दाणा जाऊ देत नाहीत तो काही बाहेर

निघत नाही त्याजला वैरणेचा दुकाल फार जाह्‌ला आसे पर[तु*]थोरला मोगल सलाबतजंग येणार यैसी बोली आसे म्हणौन च्यार दिवस तग धरीला आसे परंतु मोगलाचे कागद श्रीमंतास आले आसेत की आम्ही आपणास मदत येतो त्याजला आभाव असे की आम्हास मदत येतो म्हणौन च्यार दिवस दम त्यानें धरिला आसे याची फौज पनास साठ हाजार आसे दाणावैरण आमच्या फौजेत सवग आसे मुलख सावनूर बकापूरचा आगदी लुटिला कलावे म्हणौन लिहिले आसे चिरंजीव आणा सुखरूप आहेत कलावे म्हणौन लिहिले आसे सह सो भारी पडला आसे ईस्वर करील ते खरे फौजेस नित्य उठोन कसाला भारी आसे बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो देणे हे विज्ञापना तीर्थस्वरूप राजश्री तात्यास सिरसास्टांग नमस्कार

स्वामीचे सेवेसी कृष्णाजी विस्वनाथ सा। नमस्कार लि। परिसोन कृपा करीत असावे चिरंजीव त्रिंबकपंतास चिठी लि। आहे हे पावत करणे

१२

गोरा ८ फाल्गून वद्य १०	श्रीशंकर प्रसन्न	श. १६७७ फालगुग वद्य १० इ.१७५६ मार्च २५

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे शेवेसी

आपत्ये मल्हारीने दोनी कर जोडून सिरसां। नमस्कार विनंति येथील क्षेम ता। फालगुण वद्य दशमी जाणौन मु। सावनूर येथे वडिलांच्या आसिर्वादेंकरून सुखरूप आसों विशष वडिली पत्र फालगुण सुध त्रितीयेचें पा। ते पा। चिरंजीव रामचंद्रबालाची मुज जाहाली म्हणोन लि। उतम जाहाले इकडील वर्तमान सविस्तर रा। नारोपंत आले त्यांनी सांगितलेच असेल सावनुरास वेढा आहे तैसाच आहे सावनुराबाहेर चौक्या च्यार आर्ध कोसावर होत्या त्या हाला करून माडल्या आणि सेदोनसे माणूस मारिले लस्कर गावाबाहेर पठाणाचे घोरपड्याचे होते ते व मुजफरजंग सारे गावात गेले श्रीमंताचे मोर्चे खंदकापासी खासे मोर्चे गेले आहेत तिकडील तोफा रोज उठोन सुटतात व इकडील तोफा सुटतात त्याने रोज उठोन घोडे माणसे मरतात श्रीमंत रा। दादांचाही येक बाजूस मोर्चा येणेप्राच आहे व भोसले याचा मोर्चा येक बाजूस आहे जेर जाहाले आहेत परंतु आद्याप सल्यास येत नाहीत मोगलही इकडे येत आहे आठाचौ रोजा येणार याजउपर होईल वर्तमान तें लिहून पाठऊ चौक्या माडल्या त्या दिवसी आपलेकडील पाचसात घाड ठार जाहाले व तीन च्यार भले माणूस पडले व आणिखीही घोडी माणसे जखमी आहेत रा। बाबुराऊ धायगुड खडकर पाटलाचा लेक आपलेकडे होता तो पडला व

नारायेणजी येवला सेदुरजने भाडल्याजवल आहे तेथील ठार जाहाला वरकड आज ता। समस्त सुा आसेत त्याच्या घरचे पुसावयास आले तरी सागावे बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञापना चिरंजीव रा। दादा व आंणा सुा आसेत हे विनंती तीर्थस्वरूप रा। तात्यास सिरसां नमस्कार चिरंजीव रा। भाऊस आसिर्वाद वडिलाचे सेवेसी आतोबाने चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार

सेवेसी गणश कृष्ण सिरसां नमस्कार विनंती लिा। परिसोन आसिर्वादपत्र पाठवीत गेले पाा कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति

१३

गोरा ६५
सु. ११५७ रमजान १४ }   श्री   { श. १६७९ ज्येष्ठ शुद्ध १५
इ. १७५७ जून

राजश्रियांविराजित राजमान्य राजश्री मल्हार भिकाजी स्वामी गोसांवि यांसि

पोष्य बालाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष पाा बागलकोट देखील ठाणी येथील कमावीस सालमारी तुम्हांस सांगितली असे तरी इमाने इतबारें वर्तोन चौकसीने अमल करून ऐवज आकारेल तो सरकारात पावता करणे याखेरीज कलमे

तुम्हास ठाणेजात व माहालसमंधे सिबंदी प्यादे याची नेमणूक आसामी १००० येकून सालीना रोजमरे ७ येकून रुा

१४७०० किता आसामी ३०० दर आसामीस दर ७ प्रो

१४००० किता आसामी ४०० दर रोजमरा दर आसामीस रुाये ५ प्रो

८४०० किता आसामी ३०० दर रोजमरा दर आसामीस रुाये ४ प्रो

३७१००   १०००

येकून येक हजार प्यादे त्यासी सालीना रोजमरे रुाये सततीस हजार येकसे रुाये करार केले असेत माहालचे ऐवजी खर्च लिाणे   कलम १

रसद साल मजकुरी तुम्हाकडे करार केली रुाये ५०००० पंनास हजार रुाये घयावयाचे करार केले असेत यासी व्याज दरमाहे दरसदे रुा १ येकोत्रा सिरस्तेंप्रो करार केले असे हिसेब बमोजिब मजुरा पडेल सदरहू रसदेच्या ऐवजाचा भरणा सरकारात करून जाब घेणे तेणेप्रो व्याजास मित्या लागतील सदरहू रसदेचा ऐवज मा॰ालचे ऐवजी वसूल घेणे कलम १

येणेप्रमाणे दोन कलमे करार करून दिल्हीं आसेत सदरहूप्रो वर्तणूक करणे सिबंदीची नेमणूक तूर्त सदरहूप्रो अजमासे करून दिल्ही आहे त्यास आगत्या-आगत्य जाजती दोन च्यार हजार रुाये लागले तर पाहून चौकसीने कसोसीने करून लागले तर मजुरा पडतील ठाणे मजकुरी हुजूरचे हशम येईल त्याची सनद आलाहिदा येईल त्याप्रो करणे हुजूरचे हशम व तुम्ही प्यादे ठेवाल ते सुधा हजार येक माणूस ठेवावे या अजमासे नेमणूक केली आहे चौकसीने कसोसीने पाहून करणे रा छ १४ रमजान सुा सबा खमसैन मया व अलफ [नि*] बहुत काये लिहिणे हे विनंती

१४

गोरा १५ मार्गशीर्ष वद्य ६ शनि. } श्रीशंकर प्रसन्न { श. १६७९ मार्गशीर्ष वद्य ६ इ. १७५७ डिसेंबर ३१

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपल्यें मल्हारीने दोनी कर जोडून सिरसाां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता मार्गेसीर्ष वद्य शष्टी मंदवार गंगातीर नजिक बीड आंबड प्रा येथे वडिलाचे आसिर्वादे करून सुा आसो विशष इकडील वर्तमान सविस्तर जासूद सटवाजीबा पेशजी लिा होते त्याजवरून कललेच आसेल सांप्रत मोगल गंगातीरास आलिया-वर श्रीमंतानी सळूखाचे आनुसंधान लाऊन सळूख करून घेतला आहे श्रीमंत् राजश्री विस्वासराऊ याच्या मोगलाच्या भेटी परवाचे दिवसी जाहाल्या मोगलाने पंचवीस लाखा रुपयाचा सरंजाम करनाटकांत वगैरे मिलोन देसी घावासा करार करून भेटी जाहाल्या आहेत सनदापत्रे येकादो दिवसांत तयार होऊन हातास आलियावर मोगल कोणीकडे जातो तो येकदोन मजली गेलियावर श्रीमंत् राजश्री विश्वासराऊ वगैरे हुजरात व सिंदे यैसे आमदाबादेस जाणार आम्हास व रा गोपाळराऊ यांस करनाटकांत रवाना करणार येणेप्रा मनसबा आहे थोरले श्रीमंत् राक्षसभुवनावरच आद्याप आहेत फौज तरी पुष्कळ जमा जाहली होती परंतु मुसा घु(भु)सी भागांनगरास आला आहे तो कांही दिवसांत मोगलास येऊन मिलणार मिलालिया जड पडेल सबब सला करून घेतला आहे सारी फौज आपली खरीखुरी चालीस हजार जमा जाहाली आहे श्रीमंत् राक्षसभुवनावर आहेत त्याजपासी आठ हाजार फौज व सिंदे हुजरात श्रीमंत् रा विस्वासराऊ मिलोन पचंवीस हाजार आम्ही गोपाळराऊ कवडे यैसे इकडे दाहाबारा हाजार

येकून सारी चालीस पंचेतालीस हाजार फौज जमा जाहाली आहे मोगल येथून कूच करून गेलियावर माघून सविस्तर वर्तमान लिहून पाा वडिलांस कलावे म्हणोन लिाा आसे बहुत काय लिाा कृपा लोभ असो दीजे हे विज्ञापना तीर्थस्वरुप राा तात्यास सिरसाा नमस्कार चिरंजीव राा भाऊस आसीर्वाद

वडिलाचे सेवेसी आंतोबाने दोनी कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार हे विज्ञापना

वडिलाचे सेवेसी लक्षुमणाने दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाा नमस्कार

सेवेसी गणेश कृष्णा सिरसांा नमस्कार विनंति लिाा परिसिजे कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ती

१५

गोरा १८
मार्गशीर्ष वद्य ३० सोम } श्रीशंकर प्रसन्न { श.१६७९ मार्गशीर्ष वद्य ३०
इ. १७५८ जानेवारी ९

तीर्थरुप राजश्री आपा वडिलांचे शेवेसी

आपत्य मल्हारीने दोन्ही कर जोडून सिरसांा नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा मार्गेसीर्ष वद्य अमावाशा सोमवार जाणोन मुाा गंगातीर नजीक बीड अंबड येथे वडिलाचे आसीर्वादिकरून सुाा असों विशेष इकडील वर्तमान सविस्तर सटवाजी जासूद वगैरे याज बाा लिााच होते त्यावरून कळलेच आसेली मोगल माा मजकुरास येऊ [न*] सलियावर घालून पंचवीस लक्षा रुपयाचा सरंजाम देसी वगैरे करनाटक तैलंगण वगैरे तुलजापुराकडे नलदुर्ग येणेप्राा देऊ करून धाकटे श्रीमंत् पुढे आले आहेत त्यांच्या व मोगलाच्या भेटी जाहालियावर मोगलाने आड घातली जे थोरले श्रीमंताच्या व आमच्या भेटी जाहाल्या पाहिजेत त्याजवरून श्रीमंत् राक्षसभुवनावर होते त्यांस मुकाम मजकुरास बोलाऊन श्रीमंताच्या मोगलाच्याही भेटी जाहाल्या श्रीमंत् सारे मोगलाच्या लस्करांत डेरियास गेले होते व मोगलही श्रीमंताच्या लष्करांत डेरियास येऊन माघारा गेला बोलणेचालणे सारे जाहाले आहे परंतु सिके सनदावर होऊन आद्याप हातास येत नाही मोगल म्हणतो जे आपला वडील भाऊ शहारास आहे तेथें मी जाऊन सनदावर सिके करून देतो भेटी सला जाहाला आहे हा खराच आहे येसे बोलतात त्यास भेटीही होऊन दाहा बारा रोज जाहाले परंतु तोही अद्याप कूच करून कोणीकडे जात नाही व श्रीमंत्‌ही अद्याप कूच करून जात नाही उभयतां कूच करु न जात नाही उभयतां कूच करून जिकडील तिकडे जातील तेव्हा खरे मोगली मनसबा समजत नाही मुसाघु(बु)सी भागानगराहून येत आहे तोही पाचा साहा मजलीवर

जाला आहे तो निजामआलीस सागून पाठवितो जे तू वऱ्हाडचा सुभा तुजला इतका कारभार करावयास गरज काये खासा नबाब सलाबतजंग औरंगाबादेस आहे येसे त्याने मोगला [स*] सागून पा ह्याने तरी भेटी करुन सला केला आहे सलियात तरी बिघडेलसे दाखवीत नाही मोगल औरंगाबादेस जातो म्हणतो श्रीमंत्‌ही जिकडील तिकडे फौजा गुजराथेस व करनाटकात रवाना करणार परंतु आठ च्यार दिवस काये होते ते पाहून करणार येणेप्रोा वर्तमान आहे मुसा धु (बु) सी आलियावर श्रीमंतासही भारी व मोगलासही भारी दोघासही भारी याजकरिता सला करून घेंतला मागती तो येऊन पोहचलीयावर काय होईल हे न कले मोगली मनसबा समजत नाही दाणावैरण बंद केली होती सबब सळूखावर घालून सळूक केला आणि त्याची वाट पाहातो हे न कले त्याच्या घरात आजताा बेइमानी जाहली नाही परंतु बहुनाइकी आहे येक भाऊ शहरी आहे येक आला आहे ह्यानेच बल बांधून इतके दिवस जुजला आहे मागती मुसा धु (बु) सी आला आणि श्रीमंतांनी फौजा सारे जिकडील तिकडील रवाना केल्या आणि संध पाहून मागती लबाडी करितील सबब आठ च्यार दिवस वाट पाहून फौजा रवाना करणार व सनदाही सिके होऊन आद्याप हातास आल्या नाहीत श्रीमंताची सारी फौज साठ हजार पावेतो देखील भोसले वगैरे मिलोन जमा जाहाली आहे वडिलास कलावे म्हणोन लिा आसे वाईकडील वर्तमान लिा ते कलले श्रीमंतास तिकडील फिकीर आसेल फौज रवाना केलीच आहे बहूत काये लिा कृपा लोभ असो दीजे हे विज्ञापना तीर्थस्वरूप तात्यास साष्टांग नमस्कार चिरंजीव भाऊस आसिर्वाद लिा परिसोन जासूद माघारा पा हा आसिर्वाद

१६

गोरा ४१

श. १६७९ पौष शुद्ध ११
इ. १७५८ जानेवारी १९

रोख घेतले त्यात अनगलाकडे साठ हजार आहेत व वरात लस्करची अली होती त्यासी पांच दिल्हे येकून येका लक्षाचा मजकूर हा आहे दुसरे सरकारांत येकतीससे रुपयाची वरात आली आहे ते जेव्हा देतील तेव्हा घ्यावे येवज पाहून देतो म्हणतात घेऊन आपणास लेहून पाठऊ व काल राजश्री गोपालराव गोविद यांचे लस्करचे कागद आले ते आम्ही पाहिले त्यांत मजकूर सला उत्तम प्रकारे जाला सोमवारी भेटी जाल्या त्यासी आजी दाहा रोज जाले पुढे गुदस्ताप्रा छावणीस दोनी पतके करनाटकांत पाठवावयाचा मजकूर आहे व श्रीमंत राजश्री विस्वासराव याजबरोबरी धाकटे नामा पुरंधरे देऊन गुजरातेत रवानगी होणार आणि श्रीमंत

कोकणांत जाणार येसा मजकूर आहे व मोगल वराडप्रांते जाणार यैसी बोली आहे मग आपले लिहिले येईल ते आपणाकडे पाठऊ वरकड आपण लिहिले त्याप्रा श्रीमंत राजश्री बावाकडे हिसेब लेहून पाठविला उदईक जासूद जाईल

१७

गोरा २४
माघ शुद्ध १

श्रीशंकरप्रसन्न

श. १६७९ माघ शुद्ध १
इ. १७५८ फेब्रुवारी ९

तीर्थरुप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी अपत्यें मल्हारींने दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता माघ सुध प्रतिपदा जागीन मुा नजीक सिंदखेड येथे वडिलांचे आसीर्वादे करून सुा असो विशष किले सिवनेर येथोल सबनिसीची आसामी श्रीमंतांनी आपल्याकडे दिल्ही आसे तरी तेथे कोणी कारकून पाठवावा हे उत्तम नाही याजकरितां राा बाबाजीपंत अभ्यंकर यांजकडें सबनिसीची गुमास्तगिरी आपल्याकडून वडिलीं दिल्ही पाहिजे माारनिलेसीं आमचे वचन गुतले आहे तरी वडिलीं माानिलेस गुमास्तगिरीची सनद द्यावी मातबर माणूसही आहेत व आप्तविषई शहाणे माणूस सबनिसीस रुप आणतील दुसरियास योजू नये माारनिलेसच सन [द*] द्यावी पेस्तर तेथें काम कारभार करुं लागलियावर आपणहि कांही मेलऊन घेतील वडिलांसही कांही देतील वडिलांस कलावे म्हणोन लिा आसे बहुत काय लिा कृपा लोभ असों दीजे हे विनंती

तीर्थस्वरुप राजश्री तात्यांस सिरसां नमस्कार विज्ञापना राजश्री बाबाजीपंतास सबनिसीची मुतालेकी सागावयाचे माानिलेसी आम्ही कबूल केले आहे तरी माारनिलेस सनद देवणे लोभ असो दीजे हे विनंती चिरंजीव राा भाऊस आसीर्वाद उपरी लिा परिसोन लिाप्रा वडीलांस विनंती करुन करणे हा आसीर्वाद

१८

गोरा १६
भाद्रपद शुद्ध ९

श्री गजानन

श. १६८० भाद्रपद शुद्ध ९
इ. १७५८ सप्टेंबर ११

तीर्थस्वरुप राजश्री भिकाजी नाईक आपा स्वामीचे सेवेसी

आपत्यसमान गणेश कृष्ण कृतानेक सिरसां नमस्कार विनती उपरी येथील कुशल ताा भाद्रपद शुध नवमी मुा खणखणहली नजीक वेगरुल प्रा श्रीरंगपटण येथे समस्त मंडली वडिलाचे आसीर्वादे क्षेम आसो विशेष वडिलाकडून श्रावण शुध

पक्षीची पत्रे आली ते पावोन संतोश जाहाला यैसेच निरंतरी आसीर्वादपत्री सांभाल करीत गेले पा। इकडील वर्तमान तरी श्रीरंगपटणकर खंडणी देखील बाकी करार करुन गेले परंतु निशा यैवजाची अद्यापी पडत नाही आपली फौज तो ठाणी घेत बेगरुलास जात आहे वरकड सांकल्य आर्थ राजश्री बाबासाहेबी लिहिला आहे त्या वरुन विदीत होईल पत्रे वरचेवरी पाठवीत आसावे बहुत काय लिहिणे कृपा लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति

राजश्री तात्या स्वामीस सिरसा। नमस्कार विनंती आपली पत्रे सर्वांस येतात परंतु आम्हावरी निष्टूरता कायेनिमित्य धरिली आहे हे कलत नाही तरी आसीर्वादपत्र पाठवीत आसावे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती

राजश्री गोपालना। व रा। गंगाधर नाना व रामचंद्र बाबा व जीवनराव यासी नमस्कार लिा। परिसोन लोभ असो दीजे हे विनंती

१९

गोरा ३३ भाद्रपद शुद्ध ९	श्रीशंकरप्रसन्न	श. १६८० भाद्रपद शुद्ध ९ इ. १७५८ सप्टेंबर ११

तीर्थरूप राजश्री आपा वडिलाचे सेवेसी

आपत्ये आंतोबाने दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत भाद्रपद सुध ९ खनखनहाली प्रा। श्रीरंगपटण येथे वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप आसो यानंतरी वडिली आसीर्वादपत्रे पाठविली ती उतम समई प्रविष्ट जाहाली ऐसीच आसीर्वादपत्रे पाठवून बालकाचा सांभाल करीत आसिले पाहिजे विशेष इकडील वर्तमान तरी वडिली पत्रे लिहिली आहेत त्याजवरून विदीत होईल बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विज्ञापना

चिरंजीव राजश्री नाना व बापाजी व चिंतामणी व रामचंद्रबावा जिउबा व माहादेव सर्वास आसीर्वाद तुम्ही स्वदस्तूरची पत्रें पाठविली ती पावली हे आसीर्वाद

२०

गोरा १२
भाद्रपद शुद्ध ९ } श्रीशंकर प्रसन्न { श.१६८० भाद्रपद शुद्ध ९
इ. १७५८ सप्टेंबर ११

तीर्थरुप राजश्री आपा वडिलाचे सेवेसी

आपत्यें मल्हारीनें दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विनंती

येथील कुशल तागाईत भाद्रपद सुध नवमी मुकाम खनखनहाली प्रां पटण नजीक बेगरूळ येथे वडिलांचे आसीर्वादेंकरून समस्त सुखरूप असों विशेष वडिलीं आसीर्वादपत्र पा ते पावले लेखनार्थ कलला इकडील वर्तमान तरी पटणवाल्याची ठाणी घेत घेत चेनपटण घेऊन मुकाम मारचे ठाणें घेऊन पुढें मजल दरमजल बेंगरुलास जात आसों पूर्वी श्रीमंताची पत्रें येत होतीं त्यांत रुपये घेऊन पटणवाल्याचा मुलुक सोडावा हाच प्रकार लिहित होते हाली येक दोन पत्रें आलीं त्यांत लिा जे पुष्कल रुा घ्यावे अगर मुलुकच आणीक घ्यावा परंतु मुलुक न सोडावयाचा प्रकार लिहितात यैसीयास मुलुक ठेविलियाने नफा नाही श्रीमंतांस कोणी काये समजाविलें आसेल न कलें आसों आमची फौज चेनपटणच्या सुमारें ठाणीं घेत घेत आली तेव्हा पटणवाल्याकडून त्याचे वकील व आपलेकडील रा बनाजीपंत पाठविले होते यैसे सारे येऊन महदप्रयासे महदसंकटें आमची वोढ फार पाहून निदान दुसालां खंडणी व बाकी सारें मिलोन चालीस लक्ष रुा कबूल करून माघारे गेले त्यापैकी तूर्त रुा वीस लाख व विसा लक्षाची सावकारी निशा करून द्यावी येणेप्रा करार जाहाला आसता येणेप्रो गुता उरकून माघारे येत नाहीत सावकार निशा करीत नाहीत रुा थोड नव्हेत गावात पटणवाला मारामार रयतेस वगैरे मुसदी लोकास करितात परंतु चाळीस लाख थोड नव्हत निशा येकायेकी कसी होती आठा चौहू दिवसांत आम्ही बेगरुलास जाऊन लागलो नाही तों कराराप्रा उरकून आले तरी बरेंच जाहले नाहीतरी बेगरुळास जाऊन लागावे लागेल बेगरुलांत सामान फारच आहे दीड हाजार फौज व दोन ती हाजार गाडदी व पांच हजार प्यादा येणेप्रा आहे तेथें जाणे प्राप्त जाहले श्रीमंताचे पुण्य समर्थ आहे येईल तरी येईल येथून बेगरूळ आद्याप पंधरा कोस आहे तोफाचे बैल आगदी उठवेणेस आले आहेत व फौजेची घोडी गलाठली आहेत फौजही फारच आहे तोफा नित्य येक कोस चालता महदप्रयासे चालतात श्रीमंताचे पुण्य मात्र समर्थ आहे येस येत आहे श्रीमंताचे पुण्य करून सर्व गोष्टी होणें त्या होतील बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना

२१

गोरा ४३ } श्रीरामचंद्र { श. १६८२ चैत्र वद्य ३
साबान १६ } पौ शके ८२ चैत्र वद्य १० { इ. १७६० एप्रिल ३०

श्रीमंत राजश्री [मो. जा.*] बाबासाहेब स्वामीचे सेवेसी

सेवक बालाजी कृष्ण देशाई कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ताा छ १६ साह'बान पावेतों श्रीमंताचे कृपादृष्टीकरून किले मिरज येथे सुखरूप असो विशेष लस्करातून वाईस आपले येणे जाहाले म्हणून परभारें वर्तमान ऐकिले आपल्या दर्शनास येणार होतो परंतु येथातथ्य वर्तमान कलले नाही याबदल सेवेसी पत्र लिा असे या पत्राचे उतर श्रीमंतानी कृपा करून पत्र पाठविल्यानंतर सेवेसी येऊन हाजीर होऊ इकडेस वर्तमान की विजापूर प्रांत आपणाकडेस करून घेतला यैसे परस्पर यैकिले व बागलकोटाहूनहीं वर्तमान लिा यैसियासी आम्ही तो सर्वाप्रकारे आपले कुटुंबीक तेथे लोक ठेवतील किंवा मजलात्र आज्ञा करितील कीं राहावे तरी नवा जागा तेथे आपणासनिध सेवाचाकरी करून दाखविल्यानंतर ऊर्जितता सहजेकरून होऊन येईल हा तों पूर्ण भरवशाहा आम्हास असे स्वाम काही आमची उपेक्षा करून दुसरियांचे तिकडेस लोक सिबबंदी ठेवणार नाहीत इलकलावरी ठाणेत लोक आमचे होते सेपनास मनुश्य तेथें युध्य मोठे पडिले हणमसागरकरी हजार दोन हजार प्यादे व दोनसी राऊत घेऊन दबा धरून प्रहर रात्रीस ठाणेवरी बहुत मारामारी केली बहुत लोक जखमी जाहाले हातघाईचे युध्य घडले ते परस्पर राजश्री कृष्णाजीपंत याणी लिा असेल चिरगूट पांघरुन कांही राहिले नाही इतकेही गेलियाची फिकीर नाही श्रीमंताचे पुण्येकरून ठाणे जतन जाहाले आणि येस आपले पुण्यप्रतापेकरून आम्हास आले इतकियाच वचनावरी संतोछ जाहाला श्रीमंत श्रमपरिहार तो करितील कपिला गायविसी आज्ञा केली होती त्यास गाय घेऊन ठेविली असे येथातथ्य वर्तमान वाईस आलियाचे पुर्तो सोध कललेनंतर पाठऊन देतो हाली खडावांचा जोड व पंखा येक यैसे दोन दागिने पाठविले असेत [नि.*] हे विज्ञापना

२२

गोरा ६ } श्रीशंकर प्रसन { श. १६८२ मार्गशीर्ष शुद्ध ११
मार्गशीर्ष शुद्ध ११ } { इ. १७६० डिसेंबर १८

वडिलांचे सेवेसी विज्ञापना येथील क्षेम ताा मार्गसीर्ष सुध येकादसी जाणोन मुा नजीक मनरथ गंगातीर स्वकीयें कुशल लेखन करून आसीर्वादपत्र पाा आसिले

..२

पाहिजे विशष इकडील वर्तमान तरी आम्ही पुण्याहून निघालो ते खरड्याचे मुकामी श्रीमंताचे लस्करात दाखल जाहालो श्रीमंतानी करमल्यावर रा जानबा निंबालकर याची भेट घेऊन पुढे खरड्यावर रा वेंकटराऊ निंबालकर याची भेट घेऊन त्यांसी करार केला जे तुमची फौज काही चाकरीस देणे त्यानीही मान्य केले दुसरे दिवशी कूचे करून पुढे येऊन नवाब निजामनआलीचे वकील आले होते त्यासी सांगितले जे तुम्ही आमच्या कुमकेस हिंदुस्थानात येणे आम्ही तुम्ही जाऊन आबदालीचे पारपत्य करू यैसे सागून त्याच्या वकिलास निरोप देऊन श्रीमंत् रा दादासाहेब यांस बीडच्या मुकामाहून निरोप देऊन निजामनआलीस जाऊन भेटून त्यांस हिंदुस्थानात न्यावयास घेऊन यावे लागलेच आले तरी घेऊन हिंदुस्थानात जावे त्याप्रोाा श्रीमंत् रा दादासाहेब यास सांगून मोगलाकडे रवाना केले येक मजल गेलियावर आम्हासही सांगितले जे तुम्हींही जाणे मोगलास घेऊन श्रीमंत् रा दादासाहेब हिंदुस्थानात जातात त्याजबाा जाणे म्हणोन सागितलियावर मान्य करणे लागले दुसरे दिवसी आम्हीही निरोप घेऊन मुकाम मजकुरास श्रीमंत् रा दादासाहेबापासी येऊन पोहचलो मोगल निर्मलच्या सुमारे आहे हेही हाळूहाळू फौज जमा होत होत मोगलाकडे जाणार मोगल येईल न ये न कले श्रीमंत् रा नानासाहेब राक्षेसभुवनावर गेले तेथून पुढे लग्न करून काशीयात्रेस जावे असे बोलतात पुढे कोणत्या रोखे जातील पाहावे श्रीमंत् रा भाऊसाहेबाकडील आली-कडे तहकीक वर्तमान आले नाही आबदाली नदी उतरून येऊन त्यांची याची गाठ पडली येकदा तोफखान्याखाली त्याची फौज मारून काढिली पुढे नित्य जुज होतच होते फते जाहालियाची खबरीची पत्रे आली नाहीत आलियावर लिहून पाठऊं तूर्त श्रीमंत् थोरले याजपासी फौज फारच आहे व श्रीमंत् रा दादापासीही फौज फारच आहे पत्री काय ल्याहावें याउपरी फौज जमा होईल श्रीमंत् रा भाऊसाहेब याजकडील फतेची खबर येईल तेव्हा सर्व उतमच आहे

२३

गोरा ४ मार्गशीर्ष शुद्ध ११	श्रीशंकरप्रसन	श. १६८२ मार्गशीर्ष शुद्ध ११ इ. १७६० डिसेंबर १८

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने दोनी कर जोडून सिरसाा नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा मार्गेसीर्ष सुध येकादसी मुाा मनरथ गंगातीर जाणोन वडिलीं स्वकुशल लेखन करून आसिरवादपत्र पाठवीत आसिलें पाहिजे विशेष इकडील सविस्तर

वर्तमान निराले पूर्वीत लिा आहे त्यावरून विदित होईल सारांश आर्थ श्रीमंत् रा। भाऊसाहेबास येश ईश्वरे द्यावे म्हणजे सर्व उत्तम आहे मोगलास आणावयास चालिले आहेत याबाा फौज फारच आहे तीं पत्री काय ल्याहावी आमचीही पाचसातसे फौज जमा जाहाली आहे याउपरी पंधरा दिवसां सारे जमा होतील मोगल आला तरी बरे नाही तरी बिघाड होईल काय न कले फौज तरी फार असती तरी बरे होतें श्रीमंताचे पुण्य समर्थ आहे तेणेकडून सर्व गोष्टो जे करूं म्हणतात ते होते वरकड विचार ल्याहावासा नाही बहुत काये लिा। कृपालोभ असो दीजे हे विज्ञापना

२४

गोरा ३ मार्गशीर्ष शुद्ध १४	श्रीशंकर प्रसन	श.१६८२ मार्गशीर्ष शुद्ध १४ इ. १७६० डिसेंबर २१

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने दोनी कर जोडून सिरसांा नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा मार्गेसीर्ष सुध चतुर्दशी सोमवार मुाा रामपुरी नजीक पाथरी गंगातीर जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत आसले पाहिजे विशष इकडील वर्तमान मोगल कुंडलवाडीवर आहे श्रीमंत् राा दादासाहेब त्यास आणावयास जात आहेत गाठ पडून भेटी जाहालियावर होईल वर्तमान ते लिहून पाठवूं श्रीमंत् राा नानासाहेब मुगी पैठणच्या सुमारे आहेत श्रीमंत् राा भाऊसाहेबाची मोगला [सी*] गांठ पडली आहे नित्य सावनूरच्या सारखे तोफांचे वगैरे जुज होत आहे आलीकड नवलविशेष वर्तमान आलियावर लिहून पाठऊं बहुत काय लिाा कृपालोभ आसो दीजे ही विज्ञापना

२५

गोरा २ पौष शुद्ध ४	श्री	श. १६८२ पौष शुद्ध ४ इ. १७६१ जानेवारी १०

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलाचे सेवेसी

आपत्ये आपाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी यथील कुशल ताा पौष शुध ४ मुाा प्राा बालापूर नजीक घाट उदरी येथे वडिलाचे

आसीर्वादे सुखरूप असो विशेष वडिली आसीर्वादपत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कलो आले इकडील वर्तमान तर दिलीहून काल पत्रे आली त्यातील वर्तमान मिा। कार्तिक वद्य ३० सकाली आबदलीने आपली सारी फौज तयार करून पुढे तोफखाना देऊन याजवर चाळून आला यानीही आपली फौज सारी तयार करून तोफखाना फुढे करून चाळून गेले सकालापासोन गांठ पडली ती संध्याकालपावतो उभे होते संध्याकाळचे घटका दिवसास तोंड लागले ते याचा तोफखाना पिऊन आंत आले तेथ जुंज बहुत जाहाले बलवंतराव गणपत यासी छातीत गोली लागोन ठार जाले त्याचे सिर छेदून नेत होते तो भाऊसाहेबी निकड करून सोडवून माघारे लाऊन दिल्हे आणिक तेथ जुंज जाहाले त्याजकडील नजीबखान रोहिल्यास दंडास गोली लागली व जाहानखान बक्षी ठार जाहला याचे त्याचे माणूस हजार दीढ पावेतो ठार जाहाले आणि भाऊसाहेबी उडचा टाकून आपल्या तोफखान्यातून त्यास बाहेर घातले त्याची पाठ घेतली येकून बरोबर जाहली जुंज उतम जाहाले याची बाजू सेर जाहली आणि तीन च्यार सरदार ठार जाले त्याची नावनिसी आली नाही च्यार घटका रात्रपर्यंत जुंज जाहले गर्दी फार जाली त्याप्रा पत्रे आली जानोजी भोसले याची भेट जाहली पांच साहा हजार फौज आहे नागपुराकडे जावयाचा रोख होता तो राहिला बुराणपुरास चालले याजउपर दादाकडील पत्रे आली की निजामआलीखान समागमे यावयासी आनमान करितो त्यास यानी दादास पत्रे लिहिली की स्नेहेकडून आला तर उत्तम नाहीतर हाच अन्याये त्याकडे स्तापून परिछिन गळा पडोन निर्मूल करावे येसे पत्र लिहिले आहे तो आला तर उत्तम नाहीतरी बुराणपुरीहून फौजा येथील तमाम दादाकड रवाना करून त्याची निशा करून पुढे दुसरा मनसबा अगर तो आला तर दादास व त्यास व फौज रवाना करून आपण प्रयागास जाणार (नि.*) नारोवा नाईक वोखरे देशस्थ पैठणकर यांची [कन्या*] श्रीमंती आपणास केली लग्नाचे वर्तमान गोविदभट सांगतील त्याजवरून कलेल नवरी बरोबर आहे भाऊ येक आहे वडिलाकारणे मकरशक्रमणाचे तील सर्करायुक्त पाठविले आहेत स्वीकारून पावलीयाचे उतर पाठविले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

२६

गोरा १०,११ फाल्गून वद्य ३ | श्रीशंकर प्रसन | श. १६८२ फाल्गून वद्य ३ इ. १७६१ मार्च २३

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता फाल्गुण वद्य त्रितीया मुा विज्यापूर जाणोन स्वकीयें लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशष इकडील वर्तमान मोगलाचा सला जाहालियावर भालकी चिटगोपियाची खडणी घेऊन पंचमहालात जाऊन गुत्तीमटकल लोकापली नारायेणपेठ धनवाट वगैरे ठाणीं घेऊन कमावीसदारांच्या हावाली करून आम्हास व रा सखारामपंत यांस पुढे रवाना कोल्हापूरकराच्या पारपत्यास रवाना केले होते मागतीं पत्र पाठविले जे तुम्हीं विज्यापुरी मुा करणे आम्हीही येतो मागाहून मुा मारी श्रीमंत्ही आले याजउपरी काही फौज करनाटकांत रवाना करून कोल्हापूरकराचे पारपत्य आगर तहरह करून पुढे काय मनसबा होईल तो लिहून पाठऊं श्रीमंत् रा नानासाहेबाकडील पत्रे येतात त्यांत लिहिले जे श्रीमंत् रा भाऊसाहेबाचे व आबदालीचे जुज होऊन श्रीमंताचा माड जाहाला श्रीमंत् रा विश्वासराऊ यास गोली लागून विपरीत वर्तमान आहे श्रीमंत् रा भोऊसाहेबाचे तरी ठिकाणच नाही जाटाच्या मुलकांत निघोन गेले म्हणोन वर्तमान आले होलकर वगैरे सरदार कोणी ग्वालेरीस कोणी झासीस आसे आले सौ पार्वतीबाई ही होलकराबा आली येक्या पत्रांत आसें आहे जे श्रीमंत् विश्वासराऊ यांस गोली लागलियावर श्रीमंत् रा भाऊसाहेब यांनी त्यांस पुढे घालून दाहा पांचा हाजार फौजेनसी निघोन गेले बाकी सरदार कोणी संभाळून निघाले कोणीं लुटलेले ग्वालेरीस झासीस तहकीक आले सिदे मात्र श्रीमंत् भाऊसाहेबाबा गेले त्याचा शोध पुर्ता पाहोन कोणी आलेला नाही याजउपरी ईश्वरी इच्छा जे होणे ते होईल श्रीमंत् रा नानासाहेब यांची पत्रे येतात जे तुम्ही पत्रदर्शनी फौज

श्रीशंकर प्रसन्न

पुा तीर्थरूप रा आपा वडिलाचे सेवेसी

सुधा येऊन पोहोचणें नाही तरी आमचीही स्थित राहात नाही असी येत असतां श्रीमंत् रा दादासाहेब यांच्या ध्यानात येऊन जात नाहीत यांस तिकडील आगत्य नाही तिकडे काहीतरी होऊ परतु आपण न जावे हा हेत यांचा आहे स्वता विचार बराच आहे कोणाचे सांगितलेही यैकत नाहीत येथील कारभारास ताल नाही घटके घटकेस येकेक मनसबा करितात केवल श्रीमंत्च

आहेत फार काय ल्याहावें सारांश आर्थ श्रीमंत् भाऊसाहेब वाचले आसले म्हणजे मागती दौलतेस सावर बसेल नाहीतरी ईश्वरास्वाधीन सर्व गोष्टी आहेत ईश्वरें आजता आसे केले नव्हते इलाज काय आहे आम्हास फौज घेऊन करनाटकांत जाऊन दोन दिवस पोट भरून यां म्हणत होते त्यास आम्ही सागितले जे आजता सारी फौज घेऊन धणीपणा करून घेऊन गेलो नाही आणि या कालांत कसे कबूल होईल तुम्ही हिदुस्था [ना*] त जाल तरी ये समयी तुम्हाबा येऊं हिदुस्थानात तुम्ही जात नाही तरी तुम्हाबा दोन महिने फिरू अगर ज्याबा पाठवाल त्याबा दोन महिने फिरू परंतु सारी फौज घेऊन धणीपणा करून आम्ही जात नाही म्हणोन सांगितल्यावर राहिलेसे जाहाले आहे काही फौज रा आबाजीनाईकाबा देऊन करनाटकात पाठविणार कांही बाकी राहील ती फौज घेऊन कोल्हापूरचे कार्य करून मग निरोप देतील काय करितील पाहावे सारांश तिकडील हिदुस्तानचे सारे बुडालें तरी यांची वासना तिकडे जावयाची नाही बहुत काये लिा लोभ आसो दीजे हे विनंती मलहारजी होलकर तरी वाचून आलेच आहेत श्रीमंत् रा भाऊसाहेब वांचले आसले तरी मागती संभाळून काही तहरह करितील आगर संभाळून येतील परंतु वांचले मात्र असावे बहुब काय लिा हे विज्ञापना

२७

गोरा २२ वैशाख वद्य ६	श्रीशंकरप्रसन	श.१६८३ वैशाख वद्य ६ इ. १७६१ मे २५

सहश्राय चिरजीव राजश्री भाऊ व राजश्री दादा यासीप्रती सदासिव-नाईक रास्ते असीर्वाद उपरी येथील कुशल ता वैशाख वद्य शस्टी सोमवार जाणून स्वकीये कुशल लिहिणे विशेष काल रविवारी राजश्री अच्युतराव याची बातमी आली की मोगल फौजसुधा मसीदीच्या रांझणगावावर आहे म्हणून वर्तमान आले बाजार आंवाई निरेवर आला भिवरेवर आला म्हणून आवाई आहे त्यास तुम्हाकडे ठीक बातमी येत असेल ते लेहून पाठवणे वस्तभाव बुधवारी रवाना करावयाची आहे तर माणसे दाहपंधरा पाठऊन द्यावी हरभरे व दारू न्यावयासी उट सत्वर पाठविले पाहिजे बातमीचे वर्तमान सविस्तर लेहून पाठवणे उंट उदईक पाठविणे तुम्हाकडे गडबड बहुतसी नसली तर माणसे व पालखी व उंट मंगलवारी त्रितीय प्रहरीं यावेत असे पाठऊन देणे बुधवारी रवानगी करू [न*] देऊ [नि.*] कलले पाहिजे उदईक उंटे व पालखी व चागले माणूस दाहा पधरा येसे पाठवणे बुधवारी रवानगी करून बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे आसीर्वाद

२८

गीरा ७ कार्तिक वद्य १४ } श्रीशंकर प्रो { श.१६८३माघ वद्य १४ इ. १७६१ नोव्हेंबर २५

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्यें मल्हारीने दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ कार्तिक वद्य चतोर्दसी बुधवार मु॥ नजीक खराडी दौलताबाद जाणोन वडिलीं स्वकुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशष इकडील वर्तमान तरी आम्हीं कारतिक सुध त्रितीयेस पुण्याहून निघालो ते दरकूच कार्तिक सुध त्रयोदसीस गंगेवर राक्षसभुवनानजीक श्रीमंतापासी दाखल जाहालों तो दुसरे दिवसीं मोगल शाहागडावर आला सबब श्रीमंत् सडे जाह्याले बुनगे नगरास लाऊन देऊन मोगलासी ग्रहणास गांठ घातली ते नित्य गोलागोली करीत मोगल आवरंगाबादेस दाखल जाहाला च्यार पाच रोज राहून खंडागला मुरादखान यैसे. आवरंगाबादेस होते तेही सामील करून घेऊन सावकारापासून वगैरे रु॥ घेऊन काल मोगलाने कूच करून वाळुजेस येऊन आजी खराडीस आला पुढें देसचा रोंख धरिला आहे टोक्यावरून आगर पैठणावरून पुण्याचे रोखे यावे हा मनसबा करून दरकूच येत आहे मोगलाकडे निबालकर व खंडागला वगैरे जाधवराव मिलोन मऱ्हाटी फौज दाहापंधरा हाजार आहे व मोगली फौज दाहा हाजार व गाडदी पांच साहा हाजार येकून मोगल सारा पंचवीस तीस हाजार फौज आहे आमची फौज आजता॥ पस्तीस तीस हाजार जमा जाहाली आहे आणिखी वरचेवर जमा होत आहे पंनास हाजार फौज जमा होईल भोसलेही पांच हाजार फौजेनसी जवल आले आहेत आज उद्या येऊन पाहचतील तूर्त मोगलाची धमक फार आहे सळुखाचे ठीकसे बलत नाही तोही दरकूच येणार नित्य गोलागोली फार होत आहे काव्यादाव्यास तेही जपतात आम्हीही जपत आहों ईश्वरास्वाधीन येस आपेश आहे श्रीमंत् रा॥ माधवराऊजी नसिबाचे आहेत फौज पुस्कळ जमा होत आहे मोगल आयास येत येत येईल तूर्त नवा दम आहे मोगलास कुमक दोनतीनसे स्वार दोन हातीं आदवानीहून येत होते ते शाहागडच्या सुमारे आले त्याची बातमी आली सबब रा॥ गोपाळराऊ त्याजवर रवाना केले होते ते दोनसे तटे व दोनी हाती घेऊन आले मोगल आवरंगाबादेस आलियावर दुसरे दिवसी बाबाजी जाधव व खंडागलाचा लेक सातसे स्वारानसी मोगलास मिलावयास येत होते सबब त्याजवर आम्हास रवाना केले होते आम्ही सडे त्याजवर धावलो होतो त्यास बातमी कळून रातोरास शहरास दाखल जाहाले पांच दिवस घोड्यास दाणा माणसास आन्न नाही आसी मेहनत करून गेलों परंतु गांठ पडली नाही पळून आवरंगाबादेस आले आम्हीही परवा येऊन लस्करांत दाखल जाहालों श्रीमंत् रा॥ दादासाहेबाचा

कारभार आहे पत्री काय ल्याहावें आम्ही गोपाळराऊ बाबूजीनाइक मेहनत करितो याप्रो सारे जपतील तरो मोगल भारी नाही लस्करांत बुनगे सिलेदारानी फार ठेऊन राहुटचा पाले उमी करितात सबब श्रीमंत् रा दादासाहेबी गोपाळराऊ छबिन्यास गेले असतां यांचीही स्वारी त्याच्या गोटावरून चालिली हा गोट कोणाचा म्हणोन पुसोन गोपाळराऊ व नागोराम यांच्या गोटावर श्रीमंत् रा दादासाहेबीं खासा हातीवर बसून जाऊन गोट थोडथोडा झाबडून राहुटचा जालल्या आसे केले शाहाणपण न केले गोपाळराऊ रुसून जात होते मागती श्रीमंत् धाकटे जाऊन समजावीस केली आसा आनिवार कारभार करितात मुख्य फौज पुष्कळ जमा जाहाली आहे व आणखी वरचेवर होत आहे परंतु तरतूब नाही दुसऱ्याचेही यैकत नाहीत श्रीमंताच्या नसिबाने होणे ते होईल चिरंजीव रा आणा आरोग्य आहेत बहुत काय लिा कृपा लोभ असो दीजे आमची फौज आडीच हाजार जमा जाहाली आहे वडिलांचे पुण्यकरून आजता ईश्वरे आबरू वांचविली आहे पुढेंही वडिलांचे पुण्येकरून होणे ते होईल बहुत काय लिा लोभ आसो दीजे हे विनंती

२९

गोरा २०
माघ वद्य १

श्रीशंकर प्रसन्न

श. १६८४ माघ वद्य १
इ. १७६३ जानेवारी ३०

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

अपत्यें मल्हारीने सिरसा नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा माघ वद्य प्रतिपदा रविवार मा मिरज जाणोन स्वकीयें लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशष इकडील वर्तमान सविस्तर चिरंजीव रा भाऊ व दादा यांनी सागीतले आसेल आलीकडे आजी सुरुंग येक तयार जाहाला होता त्यास आजी प्रातःकाली बती दिल्ही बुरुज आरधा आलीकडील तोंड उडालें कचे काम जाहालें मग हालेस उभे राहिले होते परंतु हाला तकूफ जाहाली याजउपरी दुसरा सुरुंग तयार होईल तेव्हा जे होणे ते होईल मोगलाकडील काल खबर वकीलाचे कागद आले त्यांत लिा होते जे मोगल कूच करून नऊ कोस आणिखी पलीकडे गेला तूर्त बिघाड करून इकडे येत नाही म्हणोन लिा होते मागती तहकीक दुणावली खबर म्हणजे लिहून पाठऊं रा जानोजी भोसले नीरानरसिंपुरावर आले आहेत म्हणोन खबर तेही मोगलाकडे दाहा वाटचाने जाईनातसे दिसते इकडच येतील बोलाऊं पाा आहे मागाहून होईल ते

लिहून पाठऊं रामचंद्र गणेश यानी करनाटकांत जावयास काल मुहूर्तेकरून डेरा नदीपलीकडे दिल्हा आहे बा आमचे पथक नेमतात काय पाहावे बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विज्ञापना

चिरंजीव राजश्री भाऊ व दादा यांस आसीर्वाद तुम्ही गेलियावर आजी सुरुंग उडविला परंतु कचें काम जाहाले हाला केली नाही हा आसिर्वाद चिरंजीव राजश्री नानास आसिरवाद

३०

गोरा १४ फाल्गून वद्य ७	श्रीशंकर प्रसन	श. १६८४ फाल्गून वद्य ७ इ. १७६३ मार्च ६

तीर्थरूप राजश्री अपा वडिलाचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने दोन्ही कर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना ता फालगुण वद्यं सप्तमी रविवार मुा वाल्हें येथे वडिलाचे आसिर्वादिकरून सुखरूप असो विशष कांल मंदवारी देऊराहून कूच करून मुा मजकुरास आलो आज येथून कूच करून बोरघाटाचे सुमारे मुकाम होईल वडिलास कलावे मोगलाकडील व श्रीमंतांकडील ठीकसी बातमी लागत नाही कोणी म्हणतात श्रीमंत् टोक्यावरून आवरंगाबादेस गेले पुढें वऱ्हाडात गेलें कोणीं म्हणतात सडे माघारे फिरले मोगल निरेच्या पाण्याने पुढें आला कोणी म्हणतात पलीकडे गेला बितीम खबर लागत नाही आम्ही श्रीमंतापासी पोहचू तोंवर पेचात आहों वडिलाचे पुण्य आजता निभावले पुढेंही वडिलांचे पुण्य करून होईल ते खरें बहुत काय लिा लोभ असो दीजे हे विज्ञापना

३१

गोरा १३ चैत्र वद्य २	श्रीशंकर प्रसन	श. १६८५ चैत्र वद्य २ श. १७६३ मार्च ३१

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्यें मल्हारीने सिरसां नमस्कार विज्ञापना तागाईत चैत्र वद्य द्वितीया गुरुवार मुा नजिक नागतले जाणोन वडिलीं स्वकुशल लेखन करावयास आज्ञा करून आसीर्वाद पत्र पा आसिले पाहिजे विशष आम्ही पुण्याहून निघालों ते आसी

उवरीवरून चादवडावरून खानदेसातून दाभाडी पाटण्यावरून नसिराबाद येदलाबादेवरून मलकापुरीं श्रीमंतापासी वराडांत चैत्र सुध आष्टमीस पोहचलो ते वर्तमान सुभाजीपंताच्या गड्याबा लिा होत त्यावरून वडिलास कललेच आसेल आम्हीं गेलियांवर श्रीमंताचा येक मुकाम मलकापुरीं जाहाला पुढे बालापूर नागपुराकडे जावे त्यास मोगल व सारे मऱ्हाठे सडे होऊन उदिरीचा घाट चढून वऱ्हाडात आले येक मजल यांजकड केली त्यास हयास चौदा कोसाची तफावत उरली गाठ पडेल सबब तेथून श्रीमंत माघारे फिरले ते सोलासोला कोसाच्या मजली करीत फर्दापुरच्या घाटाने आवरगाबादेवरून आजी आठवे दिवसी मुा मजकुरास आले श्रीमंत् पुढें बालेघाटाकड जाणार त्यास मोगलही माघोमाघ घाट उतरून लाबलाब चालून जालनापुरावर आला मऱ्हाटे व मोगल गाठ घालावयास येणार त्यास हयास विसा कोसाची तफावत आहे बालेघाटाकडे चालिले तरी आडवाचा येईल देसात आले तरी येता मोठे आरिष्ट आहे घरफितुराने घर बुडविले आहे याउपरी यांच्या प्राक्तने होईल ते खरें फौजही पंनास साठ हाजार पर्यंत आहे परंतु कोणाचा इतबार नाही तिकड गेले ते केवल मात्रागमनास प्रवर्तले आजता यांच्या पदरीं वाढले कांहीं करुणा नाही नष्टपण माडिले आहे ईश्वरइच्छेकडून होईल ते मागाहून लिहून पाठऊं आम्हीं थकून गेलो होतो काही मुा होतील असुदे होऊ म्हणत होते त्यास आमच्यापेक्षा येथे मजली आधिक होऊ लागल्या आहेत घोंडी नाकली फौज दमून बेजार जाहाली परिणाम उत्तम करणार ईश्वर समर्थ आहे आजता आसे कधी हैराण जाहालों नव्हतों या उपरी होईल ते लिहून पाठऊं बहुत काय लिा लोभ असो दीज हे विज्ञापना

३२

गोरा १९ | वैशाख शुद्ध १४ — श्रीशंकर प्रसन — श. १६८५ वैशाख शुद्ध १४ | इ. १७६३ एप्रिल २६

तीर्थरूप राजश्री आपा वडिलाचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने सिरसां नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता। वैशाख सुध चतोर्दसी मगळवार मुा नजीक भालकी जाणोन स्वकीये लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष इकडील वर्तमान मोगलाकडील बातमी आली आहे जे नगरास मोर्चे लाविले आहेत श्रीमंतही खुब मनस [बा*] करितात माघारे फिरतील किंवा आणिखी च्यार दिवस आसेच कालहारण करितील पाहावें ईश्वरइछेकडून घडेल ते खरं बहुत काय लि॥ कृपा लोभ असो दीजे हें विज्ञापना

चिरंजीव राजश्री भाऊ व दादास व नाना यांस आसीर्वाद उपरो जवलील पर्वताचे काय जाहाले कलत नाही तुम्हीं तेथेच स्वस्त आहां कोठे गेला कलत नाही लिहून पा। दगा होईल काल कठीण आला आहे सूचनार्थ लि।। आहे पहिल्या पर्वतावर माणूस सारेच जडीने आहे याजकरितां चिंता आहे ईश्वरइछेकडून होणे आसेल ते होईल तुम्हीं जागा सोडली किंवा कोठे गेला कलत नाही मोगलास च्यार आपले माहीत मिळाले आहेत सबब च्यार दिवस आसऱ्यास जाऊन राहावें उतम आहे जवलील हास्तगत जाहाले आसले तरी सोय जाहालीयावर भाऊकडील तेव्हडी देवपूजा आपलेपासी येईसी आसली तरी आणने बहुत काय लिहिणे इकडील म।।र ल्याहावासा नाही घटके घटकेस येक मनसबा होतो तुम्ही माहीत आहा फार काय ल्याहावे बहुत काय लि।। लोभ असो दीजे हा आसीर्वाद जावजी जासूद माघारा येईल याबा। दुसरा गडी देणे

३३

गोरा ४५ ज्येष्ठ शुद्ध ५ मंगळवार	श्रीराम	श. १६८५ अधिक ज्येष्ठ शुद्ध ५ इ. १७६३ मे १८

श्रीमंत् राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी विश्वनाथ सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान जेष्ट सुध पंचमी मंगलवार दोन प्रहर क्षेम असो विशेष स्वामीनी पत्र पा। तें पावले लि।। सविस्तर कलले प्रस्तुत तिकडे बहुत दंगा माडला आहे म्हणोन इकडे वर्तमान कानड्यानी ऐकोन मोठा दंगा चौहूकडून माडिला आहे मोगलाची फौज विज्यापूरास पाच हजार आली त्यास तमाम काटक मिलाले तमाम श्रीमंताची ठाणी कोठे कोठे होती ती उठवितात प्रस्तुत या प्रांते बागलकोटासिवाये श्रीमंताकडील ठाणे कोठे राहिले नाही गोपाल-रायाकडे बंकापूर वगैरे ठाणी होती तेथे मोगलाची निशाणे लाविली या प्रकारचें वर्तमान जाहाले आहे बागलकोटची {कोटची} कोण गत होत्ये हे न कले बरे जे भविष्य असेल ते होईल स्वामीस पांडवगड हस्तगत जाहाला हे उतम जाहालें आमची मनुष्ये वस्तभाव किल्यावरी दंगाच माजला तरी चिरंजीव त्रिबकपंतास सागोन वर ठेवण स्वामीनीही चार दिवस तेथेच जाऊन राहावे इकडे नाना प्रकारची वर्तमा [ने*] येतात की नारो बाबाजीस धरिले पाचलाख रु।। मागतात पाराजी-पंतास धरिले तीन लाख रु।। मागतात पालथी लाऊन दुरुन धावने धरितात आपले नाव मोठे मुदई घरचे यास्तव विनंति लि।। आहे राग न करावा श्रीमंताचे लस्कर

भागानगराजवळ आहे काल आमची माणसें दाहावे रोजी आली सेवेसी कळावे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

उभयताचे सेवेसी सा। नमस्कार विज्ञापना लिा। परिसोन कृपा करून आपल्या कुटुंबात मिलालो आहे दुसरा विचार न धरावा जागा चागली हातात लागली जतन करून सर्वांचा सांभाल करावा हे विनंति आहे आम्ही तो कुटुंबातच मिलालो हे विज्ञापना

३४

गोरा ५७
श. १६८५ आषाढ शुद्ध १३ } श्री { श. १६८५ आषाढ शुद्ध १३
इ. १७६३ जुलै २२

श्रीमंत् राजश्री भाऊसाहेब साहबाचे सेवेसी

अज्ञाधारक सेरीकर सिबाजी पाटोल आनपट मौजे जेवले ता। निरथडीं, साहेबाचे सेवेसी आर्जदास्त लिहून दिल्हली यैसिजे राजश्री गमाजीबावाजी स्वारी सिरवल प्रांते जाहाली ते समई मौजे मजकुरावरी त्याकडील राऊत ळुटीबद्दल आले त्याजेवर दाहापाचे गावाचे मिळून गेलो त्यात दारकोजी साली मौजे मजकूर यान येक घोडी त्या रावतांपासून पाडाव केली त्यास आम्ही त्याच्या गला पडलो जे अम्ही घोडी घेऊ त्यावरून साली मजकूर साहेबाकडे हुजुर फिरियाद आला साहेबी मजला व साल्यास व मौजे मजकुरचे गांवकरी यास हुजूर आणून गावकऱ्याचे विचारे बिनसिफ बरहाक मनास आणिला त्यास घोडीकडे आमचा लाझा नाही यैसे जाहाले सबब घाडी सामानसुधा साल्याचे स्वाधीन गावकरी याचे विचार व साहेबाचे हुकूमाप्रमाणे केली अथपर अपला लाझा घोडीकडे नाही हे पत्र सेवेसी लिहून दिल्हे सही सके १६८५ सुभानु नाम सवस्चरे अशाढ सुध त्रयोदसी दि॥ गोपाल सिवराम दिमत आपाजी बाबुरांव वेरेड

साक्ष

१ बापूजी नाईक माडरे	१ जाणोजी पा। आनपट
१ राणूजी पा। आनपट	१ मलकोजी पा। आनपट
१ सिदोजी सटवा चेवगुल	
३	२

३५

गोरा ४४
आषाढ वद्य १० गुरुवार

श्रीराम

शः १६८५ आषाढ वद्य १०
इ. १७६३ ऑगस्ट ४

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक कृष्णाजी विस्वनाथ सा नमस्कार विज्ञापना येथील कुशल आषाढ वद्य दशमी गुरुवार बागलकोटी क्षेम असों विशेष श्रीमंत् राजश्री बाबा-साहेबाची स्त्री निवर्तली हे वर्तमान कलोन बहुत काही खेद जाहाला ईश्वरकरणी दुर्घट उपाय नाही आमचे जासूद लस्करातून येव्यादो दिवसी येतात रा. बाबानी बहुत खेद माडीला आहे त्यास राजश्री भाऊसाहेबास अगर रा दादासाहेबास पाठऊन त्याचे बहुत प्रकारे समाधान करवणे हा मृत्यूलोक आहे येथे मनुष्याचा येत्न नाही पुढे हिमत येणे फारच श्रमी होतात लस्करही जवळ नगरच्या सुमारे आहे आपण पाठविलेच असेल नसले पाठविले तरी अगत्य पाठवावे अगर आपणच जावे यात आपल्या विचारास येईल ते खरे इकडील वर्तमात तरी हैदरखानाने सावनूरच्या पठाणास लुटून बंकापुरास वेढा घातला आहे पावणा महिना जाहाला आजुनी ठाणे भांडते ते घेंऊन पुढे विज्यापुरास येणार निजामअलीचे त्याचे सूत्र येकच आहे तमाम काटक जाऊन हैदरखानास भेटले चौहूकडे दंगा माडला आम्हाभोवता काटकानी अतिशये माडिला आहे मुलेमाणसे तिकडे पाठविणार त्यास तिकडे धामधूम आहे की निवल जाहाले हे नकले मार्गही सुधा चालत नाही काही यैवज पाठविणेचा आहे त्यास मार्ग चालतो न चालतो हे पाहावयासी माणूस पा। आहे हुंडी तो होत नाही बंकापूर घेतले म्हणजे बागलकोटपावेतो कोणी गोली वाजवीत नाही आम्ही तरतूद भाडावयाची केली आहे ईश्वर काय करील ते करोत बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

रा। उभयतास सा। नमस्कार लिा परिसोन उतर पाठवावे हे विज्ञापना

३६

गोरा ९
श्रावण वद्य १२ रविवार

श्रीगजानन

शः १६८५ श्रावण वद्य १२
इ. १७६३ सप्टेंबर ४

तीर्थस्वरूप राजश्री आप्पा स्वामी वडिलांचे सेवेसी

अपत्यासमान गणेश कृष्ण सिरसां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा श्रावण वद्य १२ रविवार मुाा नजीक औरंगाबाद साहा कोश वडिलांचे

आसीर्वादिकडून सुखरूप असो विशेष वडिली आसीर्वादपत्र पाठविलें तें पावले आम्हाकडील सविस्तर श्रीमंतांचे पत्रावरून विदीत होईल [नि*] येक वर्ष मुलुखगिरीमुले फार हैरानगत जाहली आहे येक वेल येवनाचे सख्य होऊन वडिलाचे चरण दृष्टीस पडतील तो सुदिन असे बहुत काये लिहिणे कृपा वृधी कींजे हे विज्ञाप्ति

श्रीमंत राजश्री भाऊ व राजश्री दादा व राजश्री नाना स्वामीचे सेवेसी सां नमस्कार विनंती उपरी स्वामीचे पत्र पावले संतोष जाला आम्हाकडील वर्तमान तर मोगलाकडून मुरादखान तह करावयास आला आहे साठी लक्षांची जागीर देत आहेत श्रीमंत यैकत नाहीत जाधवराऊ सुद्धा क्रोडाची मागतात अंतुर वगैरे दोन तीन किले मागतात दोन मजली पैठणाहून आले मोगलात काही बाकी राहिली नाही सेवटीं श्रीमंतांचे मुदेमाफक सला होईल सविस्तर येजमानाही लिा आहे त्यावरून कलो येईल [नि.*] श्रीमंताचे पुन्ये चांगले जाहाले होंते परंतु चिवडे-खोर फार मिळाले अहेत भोसले व होळकर करितील ते होईल मोगलाचे वाईट होऊ नये हे पाईचे देखील चवकर म्हणतो पाडाव सरदार आले ते झाडून सोडिले फिरोन शहरास जातीनिसी गेले जाधवराव सोडून माहादाजीनाईक निंबालकर याचे स्वाधीन केले होते त्याणो आजणडोहास नेले होते तेथून पलोन गेले म्हणोन वर्तमान सरकारात आले आहे सला श्रीगंगातीरीच जाहाला असता परंतु बारभाई सरदारी जाहाली आहे बोटे फार घालणार मिळाले आहेत राजश्री दादासाहेब आपल्यास श्रीमंताचे पत्र व राजश्री बापूचे येणार आहे ते आपल्यास पावल्यावरी यावयाचे केले प्रोा दोन्ही कार्यें होतील श्रीमंत राा बाबाचा वेल जात नाही येकेक दिवस युगासमान जातो आणि आपले जागा त्याची अस्ता फार आहे सदैव आपले स्मरण करितात त्याचा वेल जाईल आणि आपण आल्यास श्रीमंत राजश्री [मो. जा.*] रावसाहेबास समाधान वाटेल यास्तव यावयाचे केले पो वरकड सवि-स्तर राजश्री आणासाहेबी लिहिले अहे त्यावरून कलेल बहुत काय लिहिणे कृपा वृधी कीजे हे विज्ञाप्ती

राजश्री रामचंद्रबावा व राा जीवनराऊ यासी नमस्कार लोभ असो दीजे हे विनंती

३७

गोरा ३१ } श्रीशंकर प्रसन { श. १६८४ इ. १७६३

सहस्रायु चिरंजीव राजश्री दादा यांसी प्रती सदासिवनाईक रास्ते आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष इकडील नवलविशेष वर्तमान काही ल्याहावे येसे नाही पुण्याकडील वर्तमान तर सासवडचा वाडा आद्याप जुजतो आहे माचीची खंडणी जाहली म्हणोन वर्तमान होते परंतु तेथीलही बंदोबस्त जाहला येक पैसा दिल्हा नाही पुण्याच्या शहरचाही पैसा दिल्हा नाही याप्रमाणें वर्तमान आहे आपणाकडे काही नवलविशेष वर्तमान आले असीलें तर लेहून पाठवणें श्रीमंतही धारूरावर आले म्हणोन वर्तमान आहे परंतु तहकीक लिहिले आले नाही आपणास कलावे म्हणोन लिहिले आसे [नि.*] बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीरवाद

३८

गोरा १ मंगळवार } श्रीशंकर प्रसन { श. १६८४ इ. १७६३

सहस्रायु चिरंजीव राजश्री दादा यासी प्रती सदासिवनाईक रास्ते आसिर्वाद उपरी येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष तुम्ही जगोबा धिदे व जासूद पाठविला त्याजवरून मजकूर कलो आला येथील वर्तमान तरी आजी मंगलवारी राजश्री गमाजीबावा मौजे म्हसवे येथे मुक्काम केला आहे उदईक राजश्री मुधोजी भोसले येऊन उरमोडीवर मुकाम करणार काही फौज माहुलीकडे राहावयास योजिली आहे त्यास सांप्रत यांच्या मनोदयानुरूप गडचें कार्य घडोन येत नाही तेव्हा फौज गडाभोवती उतरून काय मनसबा करतील हे पाह्यावें आपणास कलावे म्हणोन लिहिले आसे वरकड वर्तमान जगोबा सागतां कलो येईल [नि.*] बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसिर्वाद

३९

गोरा ६६
सु. ११६४ रजब २१ } नकल श्री { श. १६८५ पौष वद्य ७
इ. १७६४ जानेवारी २५

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री मल्हारराव भिकाजी स्वामी गोसावी यांसी

पोष्य माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेषसालमारपासून तुमची बोली स्वार ४००० दर राउती शेरा निवल तैनात रुपये ३०० तीनशेप्रो सालीना आकार बेरीज रुपये १२००००० बारा लक्ष रुपये करार केले यासी माहाल बितपसील तनखा रुपये १०५८५६०॥= ताळूका आथणी वगैरे माहाल रुपये

८८७४७ पो उकली
६९४६६ पा आथणी
९९७७०॥ = पो करजगी
९६५४४ पो जत
८४६१६। पो कोकटनूर
८[३५९८।॥] पो गोटे
[४४२५५] पो मुलवाड
[८१५६२॥] पो होनवाड तनखा रुपये १११५६२॥
पो वजा तिकोटे सोमाजी काले याजकडे आहे
सबब वजा रुपये
३०००० बाकी–रुपये
३५०००० तालीकोट वगैरे ताळुका
१ पो तालीकोट
१ पो नालतवाड
१ पो बाणेसगी
१ पो कोरेकल
—
४
तनखा
६०००० पा बेलगी
———————
१०५८५६०॥=

२६५९६६ पो जालनापूर कमाल सालात आकार कुल ३१२५१२
पौ वजा बा याद बालाजी माहादेव मोडोगण
२६२०४ मोकासी
९०३४२ सरदेशमुखी

४[६५४६]

१००००० पो··· ························क्ष किंवा येक [लक्ष] आगर
नवद हजार

१४२४५२६॥=
ता
१२००००० यैन जागीर
१००००० कर्जास पथकाचे कर्ज वाजबी ठरेल त्यास
१२४५२६॥= जाजती तनखा जाहाला त्यास चवाणांचे ताळुक्यात प्रतिनिधीचे आमल नि [मे]············त असल्यास
१······························
१······························
१············[कोक]टनूर

३

येकूण तीन परगण्यात सदरहू प्रो अंमल आहे त्यास चौकसीमुळे त्यास द्यावयाचे ठरतील ते वजा करून बाकी यैवज राहील तो सरकारात घ्यावा येणेप्रमाणे करार

१४२४५२६॥=

येकूण चवदा लक्ष चोवीस हजार पाचशे साडेसवीस रुपये चवल तनख्याचे माहालपी च्यार हजार राउतांस बारा लक्षांची जागीर व कर्जास येक लक्ष व प्रतिनिधीचा हिसा काही माहाली आहे त्यांस द्यावे जाजती राहातील ते सरकारात घ्यावे ती बेरीज येक लक्ष च्योवीस हजार पाचशे साडेसवीस रुपये चवल येणेप्रो करार केला असे तरी इमाने इतबारे वर्तोन चौकसीने आकार करून सदरहूप्रो वर्तणूक करणे पो {पो} सावदे येथील सरजामाची सनद पेस्तर सा [ली] दिल्ही जाईल याखेरीज कलमे

...३

राऊत चागले बालगावे हजिरी गणती सरकार सिरस्तेप्रमाणें देत जावी कलम येक १

बागलकोट वगैरे ताळुका कमाविसीने तुम्हाकडे आहे तेथील कचा हिशेब आणून सरकारात समजवावा कलम १

.... [ध] र्मादाय व वर्षा[सने] .... [आ]हेत त्याचा भोगवटा पाहून सुदामतप्रो चालवणे दुमाल गाव असतील ते हुजुरून मजुरा दिल्हे जातील येणे प्रो करार .... कलम १

येणेप्रमाणे तीन कलमे करार केली असेत सदरहूप्रो वर्तणूक करणे जाणिज छ २१ रजब सुा आर्बा सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

४०

गोरा ५१
रबिलावल ३

श्री

शा. १७८६ भाद्रपद शुद्ध ५
इ. १७६४ ऑगस्ट ३१

पौ भाद्रपद शुद्ध १ छ १४ रोज रावल

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक राजाराम माहादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता छ ३ माहे रावल मुा पाा सावदे स्वामीचे कृपावलोकने यथास्थित असे यानंतर साहेबी पाा मजकूरचे जप्तीची सनद आमचे नावे राजश्री लक्ष्मणपंत यांजपासी पाठविली त्यावरून पंत माारनिलेनी आम्हास माहाली पाठविले येथे आलियावर वर्तमान श्रीमंत राजश्री [मो. जा.*] दादासाहेबाकडून नाशकाहून कमाविशदार राा चिंतो त्र्यंबक जाले त्यांजकडील दोघे कारकून पौ मजकुरी येऊन आम्ही आल्यापूर्वीच च्यार पांच दिवस गढीत दाखल जाले आपले जासूद पुढे सनदा घेऊन आले होते त्यांचे स्वाधीन गढी याजून कमाविशदारानी केली होती दाहा पंधरा रोज ठाणे खाली पडले इतकियांत यैसे जाले आम्ही आलियावर आमसी त्यांसी कटकट होऊ लागली त्यांची सनद छ ११ सफरची आहे आमची ताजी सनद आहे आम्हास श्रीमंताचे ताकीदपत्र आणाल तेव्हा गढी व अमल देऊ यैसे त्यानी जाबसाल केले आमसी त्यासी बहुतच कटकट होऊं लागली तेव्हा जमीदार व मोकासी मध्यात पडून आम्हास गावात आणोन तह केला कीं मागाहून ज्याजकडील ताजी सनद येईल त्यानी अमल करावा त्यावरून कोा

मजकुरी आलाहिदे राहिलो आहोत आम्हास येऊन दोन रोज जाले तो मौजे फैजपूर पो। मजकूर येथे सोल्हेरचे किलेदार बालाजी बाबूराव यांचा कारकून छ मजकुरी जागिरीची सनद घेऊन आला आहे ठाणियात दाखल जाला यैसियांस मौजे मजकूर परगणियात जागा मातबर तेथील मजकूर याप्रकारे जाला बुऱ्हाणपुराहून राजश्री सुबेदार श्रीमंताची फर्मायेश तोफखाना वगैरे याची येते ते पो। मजकुरी बाणदार व प्यादे पाठऊन रयेतीस नाना प्रकारचे उपद्रव देतात यास्तव रयेत वसवास खाऊन कितेक बाहीर गेली कितेक आणखी जाणार यैसे वर्तमान आहे जप्तीवाले ग्रहस्थ म्हणतात आम्ही तुम्हास श्रीमंताचे पत्र आणोन देतो कीं अज तगीर राजश्री अनंदराव रास्ते व बाहाल चिंतो त्र्यंबक यैसे पत्र नाशकाहून आलियावर सेवकानी कोणे प्रकारे वर्तणूक करावी ते आज्ञा केली पाहिजे नाशकाहून बंदोबस्त कर्तव्य असला अथवा जैसे ध्यानास येईल तैसे रीतीचा बंदोबस्त करून सत्वर आज्ञा केली पाहिजे ते गढीत आम्ही बाहेर दरम्यान जमीदार तोडजोड करून काजिया होंऊ देत नाहीत तथापि माणसामाणसी कितेक कामाकाजावरून कल होते त्याजपासी सेंपनास माणूस आम्हापासीही पनास पाउणसें माणूस सिबंदी आहे परगणियांतून पैसा दोघानी तूर्त न घ्यावासे केले आहे खर्चास सिबंदी वगैरे पाहिजे सनदी मजकूर आहे जुंझावयाचे काम असते तरी स्वामींचा प्रताप समर्थ आहे अमल करावयास इतके दिवस न लागते जाले वर्तमान सेवेसी विनंति केली आहे आज्ञापत्र आलियाप्रो। केले जाईल वरकड वर्तमान राजश्री लक्ष्मणपंत दादा यांचे पत्री लिहिले आहे त्यावरून विदीत होईल फैजपुरी जागीरदाराकडून कारकून आला आहे त्यानी तहसील तलब शुरू केली आहे येकदोन गांवे परगणियांत आणखी मातबर आहेत तेथेही नाशकाहून दिगर जागीरदार येणार म्हणून वदंता आहे त्यास साहेबाचे सरंजामात दरोबस्त माहाल असतां यैसे प्रकारचा चिवडा जाला याचा बंदोबस्त कर्तव्य तो सत्वर करावा आम्हापासी सिबंदी वगैरे खर्च होतो आपली आज्ञा आल्यावाचून आणखी काही मजकूर करिता येत नाही बमै सिबंदी खर्च खात बसलो आहोत विदीत होये जप्तीवाल्याचे सनदेची नकल सेवेसी पाठविली आहे बहुत काय लिहिणे कृपावृधी केली पाहिजे हे विज्ञापना

४१

गोरा ५५
रबिलाखर २ } श्री पो छ २१ राखर { श. १६८६ आश्विन शुद्ध ३
इ. १७६४ सप्टेंबर २८

राजमान्य राजश्री [मो. जा.*] कारकून दिमत अनंदराव भिकाजी रास्ते गोसावि याा

सेवक रघुनाथ बाजिराऊ नमस्कार सुा खमस सितैन मया व अलफ पो सावदे येथील कमाविश राजश्री चिंतो त्र्यंबक याजकडे सांगितली आहे त्यास तुम्ही रास्त्याचे तर्फेने पो मजकुरी येऊन खलेल मारनिलेचे अमलात करिता म्हणोन हुजूर विदीत जाले यैसियांस हे गोष्ट कार्याची नसे पा। मजकूरची कमाविश मारनिलेकडे करार असे तर तुम्ही देखत पत्र उठोन येणे परगणियात खलेल येकंदर न करणे जाणिजे छ २ रालाखर तुम्ही हुजूर येणे आल्यावर आज्ञा करणे ते केली जाईल छ मार आज्ञाप्रमाण

४२

गोरा ५४
सु. ११६५ रबिलाखर ३ } श्री पौ छ २१ राखर { श. १६८६ आश्विन शुद्ध ४
इ. १७६४ सप्टेंबर २९

राजश्रियांविराजित राजमान्य राजश्री मल्हार बहिरव स्वामीचे सेवेसी

सेवक नारो कृष्ण सुबेदार नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिा विशेष पा। सावदे प्रांत खानदेश येथील मामलत राजश्री चिंतो त्र्यंबक याजकडे हुजुरून करार होऊन सनदा सादर जाल्या आहेत रास्त्याकडील कारकून माहाली अमलाकरितां गेले आहेत त्यांजकडे सरकारातून देत नाहीत त्याजला हुजुरच बोलाविले आहे येतील माहाली अमलास हरकत करावयासी रास्त्याकडील कारकुनास प्रयोजन नाहीं या रीतीने पत्र त्याजला सरकारचे आहे त्यावरून हे पत्र तुम्हास लिहिले असे तर तेथील अमलाचा बंदोबस्त राजश्री चिंतो त्र्यंबक यांजकडे सुरलीत चाले ते करावे ये विषई हरयेक साहित्य लागेल त्या रीतीने करून अमलाचा बंदोबस्त करून द्यावा जमीदारास ताकीद करोन अमल सनदेप्रमाणे सुरलीत देवणे रा। छ ३ माहे राखर सुा खमस सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे तुम्ही मामलतीचे साहित्य वरचेवर मन घाळून पुरवीत जाणे अंतर न करणे हे विनंती

४३

गोरा ५२ }
सु. [११]६५ रखर २१ }

श्री

{ श. १६८६ आश्विन शुद्ध १२
{ इ. १७६४ आक्टोबर ६

पौ छ २१ राखर सुा खमस सितैन

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक राजाराम माहादेव कृतानत सां नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ताा छ १० माहे राखर मुा सावदे स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित असे यानंतर येक दोन आज्ञापत्रे जासुदासमागमे पावोन वर्तमान कलले आज्ञेप्रमाणे रा चितो त्र्यंबक यांजकडील कारकुनास व सुबेदाराकडील कारकुनास व फैजपुरकर मोकदमास व परगणेकर जमिदारास ताकीदी दिल्हृया स्वामीनी पत्री आज्ञा केली त्याचप्रमाणे सेवकानी पत्रापूर्वी वर्तणूक केली सुबेदारासी ज्या रीतीने आज्ञा केली त्या रीतीनेच जाबसाल करून तहसील बंद पाडिली कामकाज अगदी अमानत ऐसे आजपावेतो चालले मोकदम आपले हाते बाहेर काढिले ते यावत्कालपावेतो बाहेरच आहेत पत्री आज्ञा कीं रा बाजीपंत यांस नाशकास पाठविले तेथून चितो त्र्यंबकाचे कारकुनास सत्वरीच तगिरीचे पत्र येईल त्याप्रमाणे येथील काम ठांसून राखून मार्गप्रतिक्षा करीत होतो कीं आपली ताजी सनद आली म्हणजे मोकदमास आणून अमल चालता करावा कांही वसूल चाली लावावा याप्रमाणे रयेत व पांढरकर व मोकदम जमीदार इच्छा करीत होते इतकियांत छ ९ रोज शनवारी नाशकाहून चितो त्र्यंबक याचे जासूद श्रीमंत दादासो स्वामीचे ताकीदपत्र जमिदारास व येक आम्हास घेऊन आले त्यात मजकूर की सालमाारी चितो त्र्यंबक याजकडे कमाविश करार असे रास्ते याकडील कारानी अमल न करितां हुजूर उठोन येणे ताकीदपत्राच्या नकला व रा नारोपंत दर्वे सुबेदार यानी आपले कारकुनास साहित्यपत्र लिा आहे त्याची नकल येकूण नकला तीन सेवेसी पाठविल्या आहेत अवलोकनी सविस्तर कलेल हे ताकीदपत्र येताच कारकुनानी आमसी कटकट आरंभीली आम्ही त्यास पहिले कपर्दिकेस सिऊं दिल्हे नाहीं त्या दुखास्तव निपट याजीपणावर आला कीं आमची बाहाली जाली तुम्ही येथे येकंदर न राहाणे त्यासी आम्ही जाबसाल करणे तो केलाच परंतु श्रीमंताची ताकीद आली की हुजूर उठोन येणे उपराला सुबेदार वरवर करीतच आहेत यास्तव उपाये नाही सिबंदी शहरात राहात असता ठेवणे अगत्य येविषई साही आज्ञा की तेथे राहाल तरी सिबंदी ठेवणे बाहेर जाल तर न ठेवणे त्याचप्रो वर्तणूक केली पंनास साठ माणूस दीडसे रुा अधिकच दरमाहा लागतो यासिवाये भोजनखर्च वगैरे खर्च आहेतच यास यैवज येथील येथे जागा करून घयावा

मागील प्रकार सेवेसी विनंति लिा असे दोहींकडे कपर्दीक न घयावी म्हणून तह जाला त्याचप्रो चालले आतां तो ते ग्रहस्थ बाहाल जाले आमसी त्यांसी सरकार-कामामुले वाद जाला होता त्यास्तव वासलात येकंदर पडूं देत नाहीं परगणेकरा लोकाचे वर्तमान स्वामीची जागीर जाली हे करार राहील आणि आमचे पाली-ग्रहण होऊन आबादी होईल हा भरवसा पूर्ण जाणून स्वामीचे सेवकानी सांगितले त्याप्रा वर्तणूक केली दीड महिना बाहेर राहिले दसरा नवरात्रे सर्व बाहेरच केले सुब्यानी आपला कौल पाठविला परंतु न आले निष्टा येकच कीं श्रीमंत (मो. जा.*) रास्तेसा आमचे खाविंद जाले आहेत त्यांचे पायांखेरीज दुसरेयासी गरज नाहीं यैसा पुर्ता निश्चये धरून राहिले यामुलें चिंतोपंताकडील कारकुनासी बध्धवैर पडले कीं रयेत व मोकदम राजारामपंताचे आल्यांत आहेत तरी काये चिंता म्हणून कोणकोणाचे घरादारावर नजर ठेविली तेव्हा मी सिबंदीसुधा येथे होतो म्हणोन काही चालले नाही साहेबाचे प्रतापापुढे कोणाची मर्यादा काहीं न जाली सर्व प्रकारे स्वामीचा बोलबालाच लोकासही मोठे धैर्य स्वामीचे पायांचे या भरव-सियावर सुब्यासी व { व } चिंतोपतासी वईर जाले ते सर्व कबूल करून राहिले सांप्रत यैसा प्रकार जाला चिंतोपंताकडे बाहालीसी जाली यांस्तव रयेत कालकर व पांढरकर व मोकदम जमीदार लाहान थोर परम संकटात पडले म्हणतात कीं कोणेही प्रकार आपले चरण येथे राहावे माहाल सरंजामात जाला तरी उतम न जाला तर मामलत तऱ्ही करावी चिंतोपंतानी रसद दिल्ही असेल ती आपण कबूल करावी अगर निदान दाहापाच हजार अधिक पडले तरी देऊन मामलत करावी लोकामधे कीं श्रीमंत (मो. जा.*) रास्ते यांचे नावावर बाहेर जाऊन मागती फजीत जाले या फजितीकरितां बहुत बजीद होऊन मोकदमानी सेवेसी विनंतिपत्र लिा आहे आम्हास तो कांही क्षित नाही परंतु इतकेच कीं आपले भरवसियावर महिनाभर खराब जाले आपल्यावांचून कोणाच्याने न समजले निजध्यास सर्व प्रकारे करून राहिले असतां सार्थक न जाले म्हणून विज्ञापना केली जाते कीं सरंजामात माहाल फैजपूरसुधा जाला तर बरेंच नाही तर चिंतो त्र्यंबकानी रसद दिल्ही ती आपण कबूल करून वराता माहाली कराव्या चिंतो-पंतानी दाहा हजार रुा दिल्हे म्हणून यैकतों यावर दाहा पांच निदान करावे लागले तरी करून मामला तही करून घयावा यैसे न जाले आणि मामलत लेलें याजकडेच बाहाल राहिली तरी नक्ष राहात नाही लोकास खावंदाचा भरवसा पुर्ता सांगोन दिलास देऊन काम केले त्याचे सार्थक नाहीं ज्यानी आमचे भरवसियावर वर्तणूक केली त्याचे फजितीस वाण नाहीं तरी समर्थाचे आश्रयेकरून राहिल्यास परिणाम ये रीतीचा व्हावा यैसे नाहीं सा सर्व प्रकारे समर्थ सावदे सरंजामात वेणे अवघड नाहीं परंतु राज्याचा व दरबारचा प्रकार विलक्षण म्हणून इतका गुंता पडला पुढे कोणेही प्रकारे पो मजकूर आपणाकडे करुन घ्यावा रसद दाहा वीस

पंचवीस चालीस पावेतो पडलिया चिंता नाहीं राजश्री बाजीपंत सुबेदार नाशकास असतील परंतु त्यानी कांही आम्हास लिहिले नाहीं त्यांजकडेही पत्रे लिहिली आहेत जाले वर्तमान व पुढील मजकूर सुचल्याप्रमाणे विनंती केली सर्व मनन करुन कर्तव्य ते करणार खावंद समर्थ आहेत येथून निघांवे लागेल तेव्हा सिबंदी वगैरे यैवजाचा गुंता उरकेल त्या रितीने उरकोन बनल्यासारखे निघणे जाले तर निघू विदीत होये विज्ञापना मोकदम बाहेर आहेत ते चिंतोपंताकडील कारकुनाची समजावीश घेत नाहीत ग्रहस्थ आम्हास म्हणतात आमची सनद आली आतां तुमचे राहावयाचे प्रयोजन नाहीं उठोन जाणे याचे उतर जे करणे ते केलेच परं[तु] सुबेदाराचे कुमकेमुले उपाये नाहीं निदान सिबंदीची वगैरे खर्चाची वाट होऊन आम्हास निघोन स्वामीचे सेवेसी येणे जाले तरी मोकदम आमच्या समागमे आपणापासी येणार अगत्यरूप येतील यैसेच दिसते खर्चाची वाट न केली आणि केवल याजीपणांवर आले तरी प्रसंग पाहून निघणे लागेल पुढे आपणास तजवीज कलेल त्या रितीने बंदोबस्त करितीलच मोकदमास साहेबावेगले दुसरियाचे हाताखाले राहिल्याने परिणाम शुध होत नाहीं याकरितां केवल आपलेच पायांची आशा धरितात तरी गरिबाचे व जे अनाथ समर्थाचे आश्रयाने असतात त्याचे मनोरथ पूर्ण करणार खाविंदच समर्थ आहेत इतके दिवस काम कारभार ठांसून राखिला आतां श्रीमंताचे आज्ञेपुढे उपाय नाही परंतु आम्हास श्रीमंतासी गर्ज नाही आम्हास श्रीमंत व ईश्वरतुल्य खाविंदच आहेत येथून कोस दोन कोसी निघोन राहावेंसे जाले तर राहूं अथवा मोकदम घेऊन सेवेसी यावयाचे बनले तरी येऊ जैसे अनकूल तैसे करू फैजपूरकर चौधरी व देशमुखाचा गुमास्ता फितूर आहे त्याहीमध्ये फैजपुरकराचे पाजीपण किती लिहू स्वामी सर्वांचे पारपत्य करणार समर्थ आहेत हे विज्ञापना

४४

गोरा ५६ सु. ११६५ राखर २२	श्री नकल पौ छ २१ राखर	श. १६८६ आश्विन वद्य ८ इ. १७६४ आक्टोबर १८

मो अनाम देशमूख व देशपांडे पा। सावदे यासी रघुनाथ बाजीराव सु॥ खमस सितैन मया व अलफ पो मजकुरची कमावीस साल मजकुरी राजश्री चिंतो त्र्यंबक यास सांगितली आहे त्यास अनंदराव भिकाजी रास्ते याजकडील कारकून पो मजकुरी येऊन यांचे अमलास खलेल केली आहे म्हणून हुजूर विदीत जाले

यैसियांस पोा मजकूरची कमाविश मारनि[ले] कडेच करार असे तुम्ही यांसी रुजू होऊन अमल सुरलीत देणे रास्त्याचे कारकुनाकडे वसूल न देणे त्यासही उठोन यावयासी पत्र सादर केले आहे ते उठोन येतील जाणिजे ताा छ २२ राखर आज्ञाप्रमाण

४५

गोरा ६७
सु. ११६८ शाबान ३० } श्री { श. १६८९ माघ शुद्ध २
इ. १७६८ जानेवारी २१

राजश्री राघोपंत किले पाडवगड स्वामी गोसावि यासी विनंति उपरी राजश्री विनायेक माहादेव याजकडील जमावापौ लोक रजेस जाणार त्यास रजा दिल्हे आसे तरी जाऊ देणे

२ जमात हिरोजी आबरे
१ तानाजी घाग
१ धारोजी वाग
२
२ जमात हैबतराव
१ त्रिबकराव विचारे
१ तानाजी जाधव
२
२ जमात बलकोजी पवार
१ हिरोजी सकपाल
१ येसजी संकपाल
२
१ बहिरजी कडू जमात बलकोजी पवार
१ कानोजी जाधव खुद जमातदार
८

१ येसजी कदम जमात संताजी सावत
२ जमात रायाजी नाईक इदुलकर
१ येसजी भोसला
१ कृष्णाजी कोळुगडा
२
२ जमात सजणाजीराव
१ खुद सरदार
१ कानोजी चवाण
२
१ गणोजी कदम जमात गुणाजी यादव
१ भिवजी घाग खुद
२ जमात बाबुराव पवार
१ बावाजी गायेकवाड
१ गोजनाक सुकनाक
२
९

१७

येकून सत्रा आसामीस रजेस जावयासी निरोप दिल्हा असे जाऊ देणे छ ३० माहे शाबान सुा समान सितैन मयां आलफ [नि.*] बहुत काय लिहिणे हे विनंती

४६

गोरा ६० } श्री { श. १६८९ फाल्गुन वद्य १०
सु. ११६८ सवाल २४ } { इ. १७६८ मार्च १४

राजेश्रियाविराजित राजमान्य राजश्री गणोबा नाईक रास्ते भाऊ स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक बाबाजी तुकदेव कृतानेक सास्टाग नमस्कार विज्ञापना मौजे आसेगाव येथील पाटील आपण धरून आणिले सबब मौजे सिरबे हा गाव स्वामीकड आहे त्याचा यैवज राजश्री मोरो माहादेव दिा राजेश्री वासुदेवबाबा यांणी दंगा करूण घेतला मुकरार रुपये ५०७ पाचसे सात त्या यैवजाचा मोबादला पाटिलास यैवज लाविला त्याजवरून राजश्री वासुदेव बावाच्या कानावर मजकूर घातला त्याजवर त्याणी आज्ञा केली जे त्याजकड जाऊन तोडमोड करून यैवज देणे त्यावरुन आम्ही श्वामीपासी रदबदल करून यैवज करार केला आसे पैकी घोडा माघारा तुम्ही घेतला रुपये १०० शंभर बाकी रुपये ४०७ च्यारसे सात त्यापैकी सोडऊन घेतले रुपये ५७ सतावन बाकी रुपये ३५० साडेतीनसे तुम्ही करार केले ते आम्ही देऊन गुता वारिला आणि आसेगावकर पाटील सोडऊन नेले आसेत सुा समान सितैन मया व आलफ छ २४ शेवाल बहुत काय लिहिणे [नि.*] लोभ कीजे हे विनंति

४७

गोरा ६८
सु. ११६८ जिलकाद १५ } श्रीशंकर प्रसन { श. १६६० चैत्र वद्य १
इ. १७६८ एप्रिल ३

राजश्री राघोपंत किले पाडवगड स्वामी गोसावि यासी विनंति उपरी सुा समान सितैन मया आलफ राजश्री विनायेक माहादेव याजकडील लोक रजेस जाणार त्यांस रजा येणेप्रो नावनिसीवर जाऊ देणे

१ तुळाजी नाईक सालवी जमात
हिरोजी आबरे
१ नागोजी सिदा जमात बाबुराव पवार
२ जमात गुणाजी यादव
१ खुद गुणाजी यादव
१ जिबाजी कदम
२
३ जमात सजणाजीराव
१ बावाजी यादव
१ धोडजी पाटा
१ कानोजी आबवला
३
३ जमात बालकोजी सेलार
१ खुद बालकोजी सेलार
१ सोनजी निकम
१ येसजी संकपाल
१०

२ जमात संताजी सावत
१ गगाजी सावत
१ लखमोजी चवाण
२
२ जमात बजाजी कदम
१ खुद बजाजी कदम
१ धाकोजी माहडिक
२
१ सुभानजी सिर्का जमात सुभानजी चवाण
५ जमात खास पथक
१ संताजी सिदे
१ रायाजी सिदे
१ लक्षुमण गुजर
१ताननाक परवारी
१ सुरनाक परवारी
५
१ रायेनाक परवारी { जमा } जमात रायाजी नाईक
१ बलकोजी जाधव
१२

आसामी २२

यो। बावीस आास घरास जावयासी निरोप दिल्हा आसे तरी सदरहू आास नावनिसीवार गैरहजरी घालून निरोप देणे जाणिजे छ १५ जिलकाद [नि*] बहुत काय लिहिणे हे विनंति

४८

गोरा ६९
सु. ११७१ रबिलावल ६

श्री

श. १६९२ आषाढ शुद्ध ८
इ. १७७० जून ३०

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अनंदराव भिकाजी स्वामी गोसावि यासि

पो। माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लिहिणे विशेष पा। बागलकोट वगैरे मांहाल येथील सन सबैनचा हिसेब तपसिलवार व मागील यैनजिनसी हिसेब वगैरें कागद बितपसील

यैनजिनसी हिसेब जकीरा व जंगी सामान वगैरे याचे तपसिलवार जमा-खर्च बाकीसुधा ईा सन आर्बा ता। सन तिसा सितैन सासाला ...... कलम १

देहेझाडा पो। मजकूर वगैरे माहालचे दरोबस्त देहे येकूण तनखापैकीं पाले-गारांकडे वगैरे असतील ते तनख्यासुधा वजा करून बाकी देहास तनखा लाऊन तपसिलवार .... कलम १

हशम व बाजे हशम लोकाच्या हजिऱ्या ठिकाणवार व रोजमरे याचे आकार महिनेमाहाल व तैनातजाबते व कबजे सिरस्ते प्रमाणे नावनिसीवार .... कलम १

राऊत माहालचे देखील कुमकी यांच्या हजिऱ्या व तैनातजाबते व आद्यास तपसिल नालबंदी व रोजमरे व अर्जबाब वगैरे याप्रमाणे सासाला .... कलम १

तोफा किल्यावर आहेत त्यांत बिडी किती व बांगडी व पंचरसी किती व कोणे तोफेस दारूगोला किती सेर लागतो याचा झाडा तपसिलवार ...... कलम १

किले बदामी येथील हिसेब ईा सन सबैन दुसाला जकिऱ्यासुधा तपसिलवार .... कलम १

इमारतीचा हिसेब कोणे ठिकाणी इमारत काये जाहाली त्यास खर्च किती लागला तो तपसिलवार·····कलम १

मोजदाद जाबता ठिकाणवार जकिरा व जंगी सामान वगैरे याचा तपसिलवार ······················ कलम १

सालमजकूरची हजीरी अवल सालची ठिकाणवार ···············कलम १

येणेप्रमाणे नव कलमाचे कागद व सन सबैनचा हिसेब माहितगार कारकुनाबरावर हुजूर पाठऊन देणे विलंब न लावणे [नि.*] जाणिजे छ ६ रौवल सुगा इहिदे सबैन मया व अलफ [नि.*] बहुत काय लिहिणे हे [नि.*] विनंती

४९

गोरा ७०
सु. ११७१ रमजान १६ } श्री { श. १६९२ पौष वद्य २
इ. १७७१ जानेवारी ३

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अनंदराव भिकाजी स्वामी गो पो माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष तुम्हांकडे प्रां विज्यापूरपैकी माहाल फौजेस सरंजामास सन आर्बा सितैनात दिल्हे आहेत त्याचा अज तनखा खो सरदेशमुखी करून बेरीज शाये

८८७४७ पो उकली
६९४६६ पो अथणी
८४६१६॥ पो कोकटनूर
८३५९८॥। पो गोटे
४४२५५ पो मोलवाड
१११५६२॥ पो होनवाड
६०००० पो जालवद कोकटनूर व कसबे सिंदगी

५४२२४५॥।

पैकी वजा दुमाले व हिसेदार तुम्हास सरंजाम देतोसमई वजा घातले ती बेरीज ·····································शाये

१३०२५०॥ दुमाले गाव
६९१६५ तिजाईचा अमल राजश्री पंतप्रतिनिधिकडील सदरहू गाव
दुमाले खेरीज करून
बाकी रुपये
२३६४३ पो कोकटनूर
२५०५३॥ पो गोटे
२०४६८॥ पो होनवाड
६९१६५

१९९४१५॥

यो येक लक्ष नव्याणव हजार च्यारसे साडेपंधरा रुा वजा करून बाकी तनखा रुपये ३४२८३०। तीन लक्ष बेचाळीस हजार आठसे सवातीस रुपये बेरीज तुम्हाकडे सरंजामास लाऊन दिल्ही आहे त्यास सदरहू साता माहालच्या बाबतीचा अमल व पो कोकटनूर व पो गोटे व पो होनवाड या तिही माहालचा तिजाईचा अमल व कसबे कोकटनूर व ठाणे तेलसिग पो होनवाड हे दोन्ही गाव दरोबस्त याप्रमाणे अमल पेशजीपासून राजश्री [मो. जा.*] पंत प्रतिनिधि याचा असता तिजाई तिही माहालची मात्र वजा पेशजी घालून बाकी तनखा बाबती व दोन्ही गावसुधा तुम्हाकडे संरजामास लाऊन दिल्हा आहे त्यास हाली बाबतीचा अमल व दोन्ही गाव तुम्हाकडून दूर करून पेशजीप्रो पंत माारनिलेकडे द्यावयाचे करून तनखा.. रुपये

२१४२६॥। बाबतीचा आमल खो सरदेशमुखी करून तनखा ३४२८३०। यास दर सदे हाली तह करार करून दिल्हा असे रुा ६। प्रोरुपये

१२५९७॥। कसबे कोकटनूर व ठाणे तेलसिगचा तनखा रुपये
१०५०० को कोकटनूर पो माार
९६५६॥ ठाणे तेलसिंग पो होनवाड
२०१५६॥
पौ वजा तिजाई व बाबती रुपये
६७१८॥। तिजाईची बेरीज येकंदरात वजा आले सा
८४० बाबतीचा ऐवज सदरहू येकबीस हजार चारसे पावणेसताविसात आले सा
७५५८॥।
बाकी .... रुपये

३४०२४॥

यो चौतीस हजार साडेचौवीस रुो तनखा याजकडे द्यावयाचा करार करून याचे मुबादला तुम्हास पो हिपरगे पो चौतीस हजार साडेचौवीस रुपयाचे तनख्याचे गाव सरबसर द्यावयाचे करार करून सरकारांतून रा गोविंद अनंत कारकून पाठविले आहे तरी पो मजकुरी दुमाले गाव सरकारसनदी आहेत ते खेरीज करून बाकीचे गाव पो ठाणे हिपरगेसुधा सदरहू तनख्याचे गाव तुम्हास मारनिले नेमून देतील त्याप्रमाणे आपल्याकडे घेऊन अमल करून फौजेच्या बेगमीस ऐवज पेशजीच्या नेमणुकेप्रो खर्च करीत जाणे [नि.*] जाणीजे छ १६ रमजान सुा इहिदे सबैन मया व अलफ [नि.*] बहुत काय लिहिणे हे [नि.*] विनंति

५०

गोरा २५
साबान १४ } श्री { श. १६९३ कार्तिक शुद्ध १५
इ. १७७१ नोव्हेंबर २२

राजश्री गणपतराव स्वामीचे सेवेसी विनंती उपरी चेनपटण लुटलें ते समई गावच्या बाईका व पोरे लोकानी आणिली आहेत म्हणून कळलें त्यास आपण आपलें गोटात निक्षूण ताकीद करून ज्याकडे त्या गावपो बाईका पोरें आली असतील त्याजकडून आणऊन सरकारच्या डेऱ्यास पाठवूस देणे रा छ १४ साबान [नि.*] हे विनंती

५१

गोरा ३६
ज्येष्ठ शुद्ध १० बुधवार } श्री { श. १६९४ ज्येष्ठ शुद्ध १०
इ. १७७२ जून १०

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक विठल चरणावरी मस्तक ठऊन सिरसाां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता जेष्ठ शुद्ध १० बुधवार पावतो श्रीच्या कृपेकरून येथास्थित आसे विशेष स्वामीनी पिलाजी जासूद याजबरोबर वैशाख वद्य १० मुा चित्रदुर्ग येथून पत्रे पाठविली ती जेष्ठ शुध्ध ७ भानुवासर दोन

प्रहरी पावली पाऊन बहुत संतोष जाहला राजश्री त्रिंबकराव मामाचा निरोप वौ शुध्ध सप्तमीस घेऊन निघालो ते मुा मजकुरास आलो येथून दरकूच होनगुद्यास जात आहो होनगुदे घेतल्यातागाईत तेथील बदोबस्त पाहिला नाही याजकरिता तेथे आठ दाहा रोज लागतील उपरातिक श्रीमंताच्या दर्शनास पुणियास येऊ श्री स्वामीच्या बोलण्याचा भाव व श्रीमंताची शरीरप्रकृत व दरबारचे वर्तमान सविस्तर लहू [न] पाठवणे म्हणोन आज्ञा त्यास श्री स्वामीकडे आजतागाईत गेला नवतो त्यास स्वामीचे पत्र रविवारी आले तेच दिवसी निघोन पुणियास जाऊन आजी बुधवारी आलो त्यानी जे वर्तमांन विचारीले ते सविस्तर निवेदन केले हली आपली पत्रे आली हेही वर्तमान निवेदन केले त्यास त्यानी सांगितले की राजश्री त्रिंबकराव यास सोडून येकटे पुढे न यावे त्याच्या बरोबर अलियाने फार उत्तम आहे कदाचित त्यास यैवजाकरिता गुता जाहला तरी ते येत तोपावेतो त्याची वाट पाहून त्याच्या समागमेच यावे पुढे एकटे आलीया आयोग्य गोष्ट आहे ईश्वरे मुख्यास आंयुशाची वृधी केली तर सर्व मनादयानुरूप गोष्टी होऊन येतील याप्रो त्यास ल्याहावे म्हणोन सेवेसी लिा आहे आणि मी तुमचा ज्या गोष्टीने तुमचे कल्याण व्हावे ते गोष्टीची इछा करीतो याप्रा कितीक पुस्कल बोलणी जाहली सारांश बोलण्याचे तात्पर्य राजश्री त्रिंबकराव मामा यास सोडून न यावे पुढे येऊन फळ अधिक नाही यैवज आला म्हणजे लोकांचे देणे आहे ते तिकडील तिकडे वारून यावे गवगवा पुणीयास न आणा [अपूर्ण*]

५२

गोरा ३४ सु. ११७९ सफर ११	श्री नकल	श. १७०० फाल्गून शुद्ध ३ इ. १७७९ फेब्रुवारी २८

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री भाणा मदनजी स्वामी गोसावी यांसी

सेवक गणपतराव भिकाजी रास्ते नमस्कार विनंती उपरी पो बाहादरपुरा प्रांा गुजराथ हा माहाल सरकारातून आमच्या फौजेच्या सरंजामास दिल्हा आहे आम्हाकडील कमाविसदार राजेश्री माणको मल्हार वाघ पाठविले आहेत तरी श्रीमंत पंतप्रधान यांच्या सनदेच्या अन्वये ठाणे हवाली करून देणे छ ११ सफर सुा तिसा सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

गोरा ५० } ५३

श्रीशंकर प्रो { पौ श. १७१० पौष शुद्ध १५
{ पौ इ. १७८९ जानेवारी ११

पौ श. १७१० पौष शुद्ध १५ रविवार

चिरंजीव राजश्री माधवराव यासी प्रति कासिनाथराव गणपत रास्ते असिर्वाद उपरी तुम्ही पत्र वैद्याचे मुलाबा पा ते पावले लिहिला मजकूर कलला त्यास रा विठलभट याची कन्या करावयाकरिता रा बालाराव बाईस येणार तसाच हाही विधि उरकणार त्यास तूर्त चिरंजीव तात्या आल्यासिवाय आपल्यास लग्न कर्तव्य नाही निश्चय करून ठेवावा तर मध्ये कितेक प्रतिबंधक आल्यास प्रतिकूल जाले असे आहे त्यास निश्चय तो करावा परंतु मध्यम प्रतीचा असावा प्रतिकुलाची दिकत नसल्यास लागलाच निश्चय करावा जावई याजकडे वामोरीस संक्रातीचा सण पाठवावा लागतो म्हणून रा गोपालदादा याणी सांगितलें त्यास तेथे कोणास पुसून पा घोडा दुखावला होता तो कांही बरा जाहला की न जाहला हे लिहून पा आम्हाकडील नवल विशेष वर्तमान तर हिंदुस्यानात आलीबाहादर याणी गुलाम कादीर यांसी लढाई देऊन धरला सर्व सलतनत लूटून घेतली कलावे वैद्याकडील वर्तमान तर मलमलीत दिसते इतके दिवस त्याणी गोष्टच काढली नाहीं परंतु आतां अम्हीं आलो हे सांगून अशय काढणार परंतु बोलण्यास पेशजी-प्रा बल दिसत नाही रा हरिपंततात्या यांची भेट घ्यावी तो नारूने पाय सुजला याकरिता भेट घेतली नाही सखोबांचे हती सांगून मात्र पा की आम्हीं अलो चिरजीव विनायकराव यास जलद पा देणे ती नानासाहेब येथे फौज ठेवितात आशात अल्यास काहीं बंदोबस्त जाहल्यास होईल तर जलद पा देणे प्रतिकुलाची दिकत नसल्यास लग्न बलावावे परतु चिरजीव तात्या आल्या उपरांतिक करूं या-प्रो निश्चय करावा पेशजी आम्ही म्हण [अपूर्ण*]

गोरां ६४ ५४
मार्गशीर्ष शुद्ध १३ सोमवार } श्री { श.
{ इ.

सेवेसी विनंती सेवक येशवतराव रघुनाथ देशपाडे दोनी करद्वचे जाडोन सिर-सा नमस्कार विज्ञापना ता मार्गस्वर शुा १३ सोमवार वर्तमान कुशल असे श्रीमंताची स्वारी मागेसर दसमीस यावी परतु श्रीमंत सौ मातोश्री रमाबाई पेसवी दूरसी जाली सिऊ नये याजकरिता स्वारी यावयास दोन दिवस अधिक लागले वरकड मार अधिकोतर नाही नित्येकृते पूर्ववत्प्रा चालेले आहे घरी परामृष

स्वामीकडोन काहीच जाला नाही वर मर्जी आपली आम्ही विशेष स्वामीखेरीज कोणास विनंति करावी चिरंजीव स्वामीकडे येतो की नाही ही सूचना सेवकास असावी अलीकडे सेवकास या महिन्यात पत्र येईनासे जाले यैसे नसावे हे विज्ञापना लिा आहे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

५५

गोरा ६३ | श्रीशंकर प्रसन्न | श.
कार्तिक शुद्ध ५ | | इ.

तीर्थस्वरूप राजश्री तात्या वडिलाचे सेवेसी

आपत्य आतोबाने चेरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम ताा कार्तिक शुध पचमी पर्यंत सुखरूप असो विशेष वडिलाच्या नावे पत्र जासुदाबराबर पाठविले ते पावले तीर्थरूप राजश्री अपा कार्तिक शुध द्वितीया सोमवारी निघोन वाईस गेले येमाजीपंताचा मजकूर लिा तो कलला लस्करचे कूच जाले पुढे आमची जावयाची सोये दिसत नाही पुढे भिकाजीपंतास व जासुदास लाऊन द्यावे म्हणोन लिा त्यासी कारकुनाकारकुनी व माणसामाणसी काम होत आसते की काये पुढे जावयाची सोये बनत नाही म्हणून लिा त्यासी नून्य कोणती गोष्ट आहे रावटी वगैरे सरजाम नसला तरी चिरंजीव राजश्री अणा कार्तिक शुध सप्तमी शुक्रवारी मुहूर्त करून निघाले आहेत दरकूच करून लस्करास जेजो [री] वरून जाणार सर्व सरजाम या समागमे आहे तरी च्यार दिवस राहून येमाजीपंताचा गुता उलगुडुन घ्यावा सरजाम नाही म्हणोन निमित्य ठेऊन न यावे बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती

५६

गोरा ६२ | श्री | श.
आषाढ शुद्ध १४ | | इ.

तीर्थस्वरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

बालके सदासिवाने दोनी कर जोडून सिरसाष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशष येथील वर्तमान तरी आखाड सुध १४ पर्यंत वर्तमान येथास्थित आसे यानंतर माहाराज

...४

[मो.जा.*] राजश्री स्वामीनी आम्हास बोलाऊन नेले होते त्यास तीर्थस्वरूप रा विठोवा नाईक याचे घरी खबुतरे आहेत म्हणोन आज्ञा केली त्यास खबुतराचे लेके जोड तीन आहेत त्यापैकी लेकेजोड १ व मादी १ येकून तीन खबुतरे आणिविली आहे तरी त्यासही पत्र पाठविले आहे ते त्यास देणे कलले पाहिजे संता चाकर आम्हास न पुसत मध्यानेरात्री दरवाजा उघडून पळून गेला त्यास यैसा चाकर कोणत्या कार्यासाठी बालगला आहे तरी आम्हास न पुसत गेला यैसाच येकदोन वेला पळून गेला आणि वडील गै करितात तरी त्यास आपल्या रुबरू आणून पंचवीस जेरबंद मारणे आनमान कराल तरी माझ्या गल्याची आण [आ]से यैसे बेकैदी चाकर काये कामाचे आहेत वडिलीं लिहिले जे श्रीमंतास भरणा केला त्यांची याद पा म्हणून लिहिले त्यास फडनिसाच्या यादी बरहुकुम याद पा आसे ते रुजू पाहून ठेऊन घेणे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति

वडिली धोत्रजोडा आणविला त्यास किंमत रुा ३।। साडेतीनचा पा आसे तो घेऊन पावलियाचे उतर पा देणे बहुत काय लिहिणे हे विनंती

५७

गोरा ६१ }

श्री सेकरप्रसन

{ श.
इ.

सहश्रायु चिरंजोव राजश्री भाऊ यांसी प्रती सदाशिवनाईक रास्ते आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष आमचे गवत तासगांवचे गंजीचे राजश्री गमाजीबाबा यांच्या कहीने झाडियानिसी नेलें सांप्रत वैरण येक काडी राहिली नाहीं याजकरितां कावेरी घोडी सिंगरूसुधा व सारंगी सिंगी पाठविली आहे बरोबर माहादजी पा आहे हा तेथे राहील घोडियाची निगादास्त उतम प्रकारे करवणे वरकड तुम्हांकडील नवलविशेष वर्तमान लेहून पाठवणे कलले पाहिजे [नि.*] बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे असिर्वाद

५८

गोरा ५९ } श्री { श. इ.

श्रीमंती राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक पांडुरंग कृष्ण गोडबोले कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष आपण गेलिया पासू[न] येकदा मात्र पत्र आले त्याआलीकडे पत्र आले नाही तर यैसे नसावे निरंतर पत्रद्वारे सांभाल होत जावा उचित असे विशेष श्रीमंत राजश्री कासीराव येथे आहेत जे आज्ञा करितात त्याप्रो सेवा करीत असतो स्वारी निघावयाचा मजकूर आहे फौजास बालावणी गेली हा मजकूर राजश्री मल्हारपंत आपणास निवेदन करितील सारांश सरकारचे बोलावणे येईलच परंतु आपण सत्वर यावे सेवेसी श्रृत होय हेविनंती

५९

गोरा ६८
मार्गशीर्ष शुद्ध १३ गुरुवार } श्री { श. इ.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक सुबाजी सेंशाद्री कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल मार्गेस्वर शुध १३ गुरुवार प्रहर रात्र जाणून स्वकीये लिहिणे विशेष अपण अजी पत्र पा ते पावले त्यासी रो खंडेराव जाधव याजबा अले रा ते मल्हारना साकरे याजकड दिल्हे वरकड लस्करचे वर्तमान तरी कांही अले नाही अले म्हणजे पाठऊन देतो लस्करांतून म्हलोजी मुठे गोविंदराव गोले याजकडे कुमकेस पाठविले म्हणून वर्तमान आहे आपण लिहिले कीं येक लडाई देऊ तोपरियंत निघत नाही आणि निघालो तरी वाईदेस राहत नाही म्हणून लिहि [ले] तरी बहुत दाटी जाली तरी निघावे यांत उतम आहे आपण वाईदेसचा विडा घेतला नाही यैसा विचार आहे यांत उतम दिसेल ते करावे अपण सेवक आहों बहुत ल्याहावे यैसे नाही वरकड बागडकोटकराकडील यैवज घेतो आणि अपण येऊन चौकसी करावयाचा उजूरही ठेवितो स्वामीची बनात पाठविली अहे हे घेतली पाहिजे अपण लिहिले की मर्जीस येईल पाठवणे त्यासी अमचे मर्जी जुनी येत नाही नवीच कृ [पा] करून देविली पाहिजे हे विनंती लक्ष विनंती १००००० पेर्मासिग व मानसिग यासी रुपयाचा तगादा केला त्यानी चौ रोजाचा वायेदा केला अहे आणि अपली अज्ञा

होईल तरी तिकड पाठऊन देऊ हे विा बाबा फडके रुा देत नाहीत माणसे बैसवावी तरी जनांत वाईट दिसते अणि सराफाची मिती चढती मल्हारनाकडील यै......सात हजार राहिले अहेत सरकारचे पारखीचे श्रम फार आहेत हे विनंती

६०

गोरा ५३
आश्विन शुद्ध १ शनिवार } श्री { श. इ.

श्रीमंत राजश्री भाऊस्वाम स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक सिवराम नाईक दसपुत्रे व दाजी येशवंत कृतानेक साष्टा. नमस्कार विनंति उपर आपले कृपेकरून आश्विन शुध १ शनवार मुकाम पाटण प्रांत मारवाड येथें सुखरूप आसों यानंतर आम्हाकडील वर्तमान तर ज्या कार्यास आलो ते कार्यं कांही सुरलीत होता दिसत नाही काये निमित्ये आपण म्हणतील तर श्रीमंत राजश्री [मो. जा.*] रावसाहेब यांजकडील वराता सवापांचा लक्षाच्या जाल्या आहेत व हिंदुस्तानातून श्रीमंत राा दादासाहेब यांजकडीलही सवापांचा लक्षाच्या वराता जाल्या आहेत यामुले दुचाला जाला आधींच राा दमाजी गायेकवाड वोडगस्त सिवबंदीचा गवगवा आणिखी कितेक सावकारांचा गवगवा त्याच्या मुलकांत कोठे पैसा राहिला नाही त्यामधें या दुचाल्यामुलें आजचें उद्यावर गेले तितकें त्याच्या हिाची गोष्ट जाली आहे राा रामचंद्र बसवंत दमाजीबावाचे दिवाण श्रीमंत राा [मो. जा.*] दादासाहेब याजकडून आले ते बडोद्यात राहिले त्यांस बरें वाटत नाही म्हणून गुंतले त्यांस आणावयास राा कृष्णाजीनाईक कडू यांस दमाजीबावानी रवाना केलें श्रावणी पूर्णमेस गेल त्यास वाटेस कोल्याचा दंगा बहुत जाला वाट चालत नाही यामुले गुतून पडले आहेत ते दमाजीबावाजवल आली-आलियाखेरीज कांही मार्ग होत नाही वराते जितके मिलालों तितके सदैव उपास जाऊन करितों आम्हाबा दमाजीबावाही उपास करितात परंतु कामाकाजाचा मार्ग निघत नाही येथे खर्चासही मिलत नाही याप्रो येथील मजकूर आहे राा आपाजीराव गोडबोले यांस आपण पत्र पाठविले होते परंतु तेही राा रामचंद्र बसवत यांजसमागमे आहेत त्यांची आमची गाठ आद्याप पडली नाहीं रामचंद्रपंत येतील त्याजबो तेही येतील श्रीमंत राा [मो. जा.*] दादासाहेब यांजकडून दमाजी-बावास हिंदुस्तानात न्यावयास राा केसो बहिरव आले आहेत त्याचेंही धरणेपारणे सदैव होतें परंतु कांही येक मार्ग निघत नाही सर्व आवघा मनसुबा कृष्णाजीनाईक

कडूवर व रामचंद्रपंतावर आला आहे ते आलियावर काये होईल तें पाहू या प्रांती कोल्याची धामधूम बहुत जाली आहे वेसीबाहेर येकटें जावयास कामास येत नाही याप्रा मजकूर आहे बहुत काये लिहिणे कृपा वृधी केली पाहिजे हे विज्ञाप्ति

६१

गोरा ४९ } श्री { श. इ.

श्रीमत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनति सेवक जनार्दन रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशष साहेबाची आज्ञा घेऊन निघालो ते श्रीची यात्रा करून मार्गेश्वर शुध पूर्णीमेस बुधवारी आडीच प्रहर रात्री थोरल्या श्रीमंताचा मुहूर्त वाडियात यावयाचा त्यासमागमे श्रीमत् राजश्री येजमानशुधा सुखरूप पुणियास आलो साहेबास विदीत होवे येका दो दिवसानी दर्शनास सेवेसी येतो जिवाजी सिपी याजकडील सेला साहेबानी घेतला आसल नासिकाहून आपले पतक पागा व सिलेदार शुधा चाकरीस जबूसरास गेले रा विठल त्रिबक याची रवानगी केली झाडून लोक रवाना केले सेवेसी श्रृत होये विज्ञापना

६२

गीरा ४८ } श्रीगजानन { श. इ.

आसीर्वाद उपरी चिरंजीव राजश्री बाबाकडील पत्रे आली तेच पत्रे बजिनस तुम्हाकडे पा असेत व सातारा आपाजीस पा होतें त्यास तेथील मजकूर चिरंजी[व] राजश्री सदासि[व] ना यानी लिा आहे ते पत्र बजिनस पा आसे त्याजवरून कलो येईल तर चिरंजीव राजश्री बाबास इकडील फार कालजी लागली आहे याजकरिता चिरजीव रा दादा जात आसले तर सत्वर निघोन जाऊ न देणे येक दो दिवसाचे आवकाशे जातील तर चिरंजीवाचे पत्राचे उत्तर देऊन जासुदाची रवानगी सत्वर करावी वरकड साताराकडील वर्तमान मुखजबानी आपाजी सांगता कलो येईल राजश्री मोरोपंत पटवर्धन व गमाजीबाबा कोण ठिकाणी आले आहे

याची बातमी तुम्हाकडे आली न आली हे कलत नाही तर कितीक फौज घेऊन आले आहेत हे सविस्तर लेहून पाठवावे बहुत काय लिा हे आसीर्वाद आपत्ये गंगाधराने दोन्ही कर जोडून साा नमस्कार विज्ञप्ति तीर्थस्वरूप राा आबाकडील व बाबाकडील पत्रे पाा त्याचे उत्तर देऊन जासूद राा करावे आज बातमीस सातारियास जासूद पाा आहे वर्तमान काय ते लेहून पा। आपाजीस पाा वर्तमान सातारकराचे निवेदन करील हे विज्ञप्ति

———

६३

गोरा ४६
श्रावण शुद्ध ५ } श्री { श. इ.

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक सुबाजी सेशाद्री कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल श्रावण शुध पंचमी जाणऊन आपले कुशल ल्याहयासी आज्ञा केली पाहिजे विशेष आपण कृपा करून पत्र पाा ते श्रावण सुध चतुर्थीस पावले तेथे आज्ञा की नवे खासबारदार पैकी आा १० व बारगीर अवघे पाा सावधे येथे पाठवावयासी पाठवणे म्हणून त्याजवरून तेचक्षणी लोक रवाना केले त्याचे नावनिसीची याद आलाहिदा पाा आहे त्याजप्रो राजश्री बाजी सामराज यासी आपण सनद द्यावी आणि कदाचित थोडीबहुत अर्जबाब {लोका} लोकानी आगर बारगिरानी मागितली तरी द्यावी म्हणऊन आपण आज्ञा करावी आणि हे लोक श्रीमंतानी आपले जवल ठेवावयासी बालगले होते त्यांचे उत्तम प्रकारे चालवावे म्हणऊन बाजीपंतास आपण आज्ञा करावी आणि पागेची घोडी आपण देतील त्याची निगेची ताकीद करावी व तेथील कामकाज चाकरीचे खासबारदाराचे व बारगिराचे राा तुलाजी पवार शाहणा माणूस आहे याजपासून घेत जावे म्हणऊन कमाविसदारास अज्ञा करावी आणि खासबारदार यासी येक येक वस्त्र पागोटे द्यावे म्हणऊन श्रीमंताचे वचन आहे {आहे} तरी आपण कृपा करून बाजीपंतास सांगोन दसऱ्यास वस्त्रे दाहा असामीस द्यावी व बारगीरास वस्त्रे पावली आहेत येक जिवाजी सिदे यासी वस्त्रे पावली नाहीत तरी त्यासी सनगे द्यावयाची याद रो त्रिंबकपंतापासी असेल त्याजप्रा द्यावयासी अज्ञा करावी पाा घेऊन देतील हे अगत्यरूप आपण आज्ञा केली पाहिजे सुलतानजी रणपिसा बारगीर मात्र येक आम्ही ठेऊन घेतला असे इकडील वर्तमान तरी भोरप राजश्री सचिवपंताकडे आहे त्यासी बिगाड जाला आहे त्यानी भोरपकरांनी आपल्याकडील गाव जाळून टाकिले आता पुढे कोणेकड

उपद्रव करितील हे न कले आमचे सेजारी चौकोसावरी दंगा फार माजला आहे यास्तव नवे लोक पाठवावयाचे नव्हते परंतु अपली अज्ञा आली म्हणऊन पा। असेत तरी पांडवगडची चाल होतसी असली तरी तूर्त नामजाद पाठवीत नाही तेच लोक पाठवावे कदाचित तेथील चाल न होये तरी अज्ञा करावी मुबदला पाठऊन देऊ अखेर श्रावण मासी पाठवतो उतर सत्वर पाठवावे हिसेबाचे लिहिले त्यासी पेशजी सुलतानजीबरोबरी पाठविला असे बाजी सामराज यासी कमावीस सांगितली आहे हे कोठील कोण हे लेहून पा। पाहिजे बहुत काय लिहिणे आजी लोक रवाना केले आहेत ते दो चौ दिवसानी पिंगोरीस पावतील त्याची आपण रवानगी करावी कृपा लोभ कीजे हे विनंती आमची टोपी व डगला अद्यापि आला नाही पावसाला जातो तरी कृपा करून अपले जुने पाठविले पाहिजे अम्ही आणिक कोणास मागावे इकडे मिलत नाही कृपा लोभ कीजे हे विनंति.

६४

गोरा ३९, ४० } मार्गशीर्ष शुद्ध ७ } श्री गजानन प्रा { श. { इ.

राजश्रियाविराजित राजश्री त्रिबकपंत स्वामी गो

सेवक गंगाधर भिकाजी नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान ता। मार्गेश्वर सुध ७ पावेतो येथास्थित असे विशेष तीर्थस्वरूप राजश्री बाबांकडील लस्करची पत्रे आली त्यात वर्तमान जे चेनापटणी हैदरनाईक श्रीरगपटणवालीयाचा यांसी जुंज मातबर जाहाले त्यात ईश्वरे यश तीर्थस्वरूपास दिल्हे परंतु जुज जाहालियानंतर दुसरे दिवसी ठाणे मा।रास तोफा तीर्थरूपाही लाऊन दोन प्रहर जाहाले म्हणऊन एका नादरुखीचे जाडाखाले सावलीस उभे राहिले आणि येक माणूस झाडावर चढ–

[पु।। रा। त्रिबकपंत]

विला सा। तोफाचा मार त्याचे लस्करात जातो की नाही म्हणोन पाहावयाबा। इतकियात माणूस चढला आणि खांदीवर उभा राहिला तंव खांदी वालवीने खाली होती ते मोडून तीर्थस्वरूपाचे अंगावर पडली तेव्हा [घोडी] समेत खाली पडिले आणि आंग बहुत चेचले व अंगास येक दोन ठाई खणपुसे लाकडाची रुपली तेणेकरून नाकातून रगत फार गेले मग तैसेच पालखीत बसून गोटास आणिले आता औषधे वगैरे अंग सेकितात अता काही चिंता नाही तेच वेलेस ईश्वरे खैर केलो परंतु महिनीया पंधरा दिवसाची दुखापत जाहाली आहे ईश्वर आरोग्य

सत्वरच करील दुसरे वर्तमान तीा राजश्री दादा श्रीरंगपटणास फौजेसुधा गेले होते सबब पटण मारची कुमक चेनापटणास येईल त्यास न यउ द्यावी याजकरिता गेले होते यसियांसी श्रीरंगपा फौज चेनापटणास येत होती ते तीा मोडून सेसवासे माणूस त्याचे जाया करून काही घोडी पाडाव करून त्यास माडून श्रीरंगपटणांत पोहचऊन मागती फौजसुधा तीर्थरूप बाबाचे लस्करात येऊन दाखल जाहाले अता येकत्र जाहालियावर वर्तमान काये जाहाले तें कलत नाही वर्तमान अले म्हणजे लिा पा खाा वर्तमान तीा सौ रमाबाई सावित्रीबाई यास विदीत करणे काही चिता न करावी बहुत काय लिहिणे हे विनंती

सेवेसी नारो शकर जोसी याचे नमस्कार खाा पत्रे येस्थास्थित सौ [स] वाचून दाखवणे

६५

गोरा ३८ }
रमजान १८ }

श्री

{ श.
{ इ.

श्रीमत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक पाडुरग चिमणाजी कृतानेक साां नमस्कार विज्ञापना ताा छ १८ रमजान पर्यंत येथास्थित आसे विशेष गुजरात प्रांती ठाणी बसली याचे वर्तमान कळले राजश्री सखो दादाजी पोा सुपे येथे गेले चिरजीव राजश्री आंबाजी-पंत स्वामीजवळ पुण्यास येऊन आपली आज्ञा घेऊन घरास गेले त्यास तिकडे पाठवावयाचे त्याची रवानगी जाहाली की कधी करावयाची त्याप्रो आज्ञा जाहालीच आसेल तूर्त घरी जावे म्हणून सांगितले परंतु तिकडून ठाणी बसल्याची पत्रे आली याजकरितां चिरजीव आबाजीपताची रवानगी करावी लोक फार नकोत यैसे आसल्यास जे पाहिजेत तितकेच सागावे आगर त्यास तरी पाठवावे आम्ही स्वामीच्या पायांची इच्छा फार करितो जे आपण पोटास देतील त्याप्राच घेऊन चाकरी करावी हेच मानस आहे स्वामीचे आभये मजला पहिलेच त्याजवरून मेहे[न]त करीत आहो आमचे कोणे गोष्टींची आड नाही स्वामीचे पदरी आसावे हेच लक्ष आहे तरी चिरंजीवाची रवानगी तिकडे करावी आगर इकडे हर कोठेतरी सोय व्हावी परतु तिकडे आजपर्यंत रिकाम्या खपा घालून मेहेनतच केली आहे याजकरिता त्यास तिकडे पाठवायची आज्ञा होऊन सेवकास उत्तर आले पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

६६

गोरा ३७ } श्री { श. इ.

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनती सेवक कृष्णाजी माहादेव साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील कुशल जाणौन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे यानंतर श्रीमंत राजश्री बाबासाहेबाचा मुा कुडलवाडीनजीक होता मोगलावर जात होते बाजरी वर्तमान जुज जाहाले येसे आले आहे तहकीक नाही श्रीमंत थोरले इदुरास मालवियात दाखल जाहाले या प्रांते चोराचा उपद्रव बहुत जाहाला आहे पारनेरात दरवडा पडला चिटकोपंत मातबर होता दाहावीस हजारांची मालियत नेली आमचे न्हावरियातही कुलकर्णी याचे घरी चोरी मातबर जाहाली यैसेच जागाजागा चोरी होत आहे याजकरिता दाहावीस माणूस हमेशा वाडियात स्वामीनी ठेवावे बरकंदाज दहा पाच असावे रात्री गस्त फिरवावी याप्रो स्वामी करीतच असतील परंतु सूचनार्थ लिहिले आहे बागडकोटाहुन चालीस पन्नास प्यादे आणुन ठेवावे उत्तम आहे जवलियाचे बिगारी त्यांचेच मुबादला नेमणूक केली आहेत येतील सुतार व कुंभार आठ चौ दिवसी मुबादला सेवेसी पाठवितो म्हणजे त्यास निरोप द्यावा गवत कापायाचे बिगारी वरसास गवत कापून गवत उतरून दोन महिनीयात निरोप होत असतो सालमजकुरी बिगारीमुले रयेत अजुर्दा फार आहे कितेक गाव टाकून उठोन गेले डोंगराचे नाव घेता हीव माणसास येते यैसी दहशत घेतली आहे कृपा करुन सर्वास निरोप द्यावया आज्ञा करावी किरकोली हरभरे याची दाल व कातडी सामान आणखी व कापूस येसे आठ चौ रोजा सेवेसी पाठवून देतो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

६७

गोरा ३२ } श्री { श.
जिल्हेज २३ } { इ.

[डाव्या हाताचे समासात खंडोजी माणकर याचा शिक्का*]

राजश्री भिकाजी नाईक आपा गोसावी यांसि

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो खंडोजी माणकर सुभेदार मो तलागड रामराम विनंती येथील कुशल छ [मो. जा.*] जिल्हेज जाणोन स्वकीयें लेखन करीत असले पाहिजे विशेष बहुत दिवस आपणाकडून पत्री

परामृष होत नाही ऐसे नसावें निरंतर पत्रपाठऊन संतोषवीत जावे आम्ही स्वामीचे कृपेचे म्हणावितो तदनुसार कृपा करीत असावे उचित आहे यानंतर राजपूर सुभाचे फडनिसीचा धंधा आपणाकडे आहे येथे सांप्रत मुतालिक ग्रहस्त योजून पाठविले त्याचे स्वरूप फडनिसीयोग्ये येथास्थित म्हणावें इतकेच मात्र मग योग्यतेस स्वामीने कसे लक्षिले न कले वरकड हा धंधा आपणाकडें होतेंसमई राजश्री पुंडलिकनाईक यांचे आमचे बोलणे जाले याचा खुलासा आपणास निवेदनच असेल हा प्रांत हबशाकडे असतां आम्ही त्याजकडील काबीजात करून मुळीक सरकारी सर केला ते वख्ती या मामलेयासी कोण्ही फडणीस जाले नव्हेत उपरांत आम्ही हुजूर गेलीयावर खुसूस या कामाचा दरकनीस मागावा लागला कारण आमचे ममतेचा आणी सरकारकीफायेती असावा यास्तव तेथें राजश्री पुंडलीकनाईक प्रसंगी होतें यासी येविशी स्नेहाच्या ठायी आम्ही कीतेक अन्वये सागोन फडणीसी तुम्ही करून घ्यावी आपले निसबतीने शाहाणा कारकून आमचा अगत्यवाद धरून सरकारचे नुकसान होऊ न पावें आमचे कहेमाफक चाले असा असावा तो आम्ही सांगतो त्यास द्यावे त्यावरून नाइकानी श्रीमंत कैलास-वसा [मो. जा.*] रावसाहेब स्वामीजवळ विनंती करून आपणाकडे धंधा करून घेतला त्याजवर कारकून शाहाणा काबिली पाहिजे याजमुळें कृष्णाजी गणेश कार-कून माारनिलेचे मते श्रीमंत राजश्री [मो.जा.*] भाऊसाहेबाजवल उभे करून त्याचे नावें पत्र घेऊन सुभां आणिले त्याचें हातोन पंधरा वीस वर्षे आम्ही फडणीसीचा कारभार घेतला तदनंतर येजमानस्वामीनी आमची रवानगी अन्नेत्र स्थळी करून येथे राजश्री त्रिबक विनायेक याची योजना केली त्याचेही अमलात तेच होते अलीकडे दोन साले कृष्णाजी महादेव याजकडे अमल होऊन धंध्यावर आपण सदाशिव कृष्ण टिलक पाठविले होते सांप्रत श्रीमंतानी कृपा करून आमची योजना पूर्व ठीकाणी केली आपणास निवेदनच आहे प्रस्तुत आमचे पैवस्तेस सदाशिव कृष्ण मना होऊन गोविंद विष्णु आले उतम परंतु पाहाता योग्यतेस अश्लाघ्य निमित्य हा धंधा कसा याजवर मनुष्य असावा कोणे रीतीने याचा रंग कोणें प्रतीचा हें आपण ध्यानातच आणीले नाही यांस फडणीसाचा धंधा सजावार काये पडे नित्य तोतिया तुफाने बोलोन कजिये करावे येव्हडे मात्र जाणतात येणे करून धंध्याचे रूप राहून आमचे युक्तीस पडोन सेवट लागणें व त्याचा आमचा बनाव राहणे परम संकट याकरिता स्वामीस विनंती लिहिणें कारण जे दुसरा शहाणा माणूस आपले तर्फेने योजून योग्यतेस सामावें अैसा पाठवितील तरच फडणी [सी] चे व आमचे कारभाराचे स्वरूप नाहीतर लटकी फूट आणि पुंडलीकनाईक याचा आमचा फडणीसीसमई करार हाच की गैरपायाने कारकून चालल्यास परिछिन दूर करावा दुसरा पाठऊ याप्रो। तेव्हाचीच बोली आहे तसेच सांप्रत घडोन आले याजमुळे मुजरद कागदी रवाना करून त्याहावें लागलें कृपा करून कारभाराचा आब राखणे

असिल्यास आधी कारकून येथील दरकावर पाठऊन द्यावा गोविंद विष्णूस दूर करावे नाहाक कजिया कामाचा नाही तथाप दुसरा कारकून पाठवावयासी सोईस न ये तर आमचे निसबत काम सांगावे आम्ही कबूल आहो जो [करार] त्याजवळ जाला असेल तोच आम्हास मान्य आहे आम्ही देऊ चिंता नाही परंतु आपण पूर्वस्नेहावर नजर देऊन लिहिले गोष्टीची उपेक्षा न करितां कृपा करून विनंती उदास न करावी आम्हास मागणे आपणाजवळ हेच आहे इतके द्यावे आपला लोभ लक्षोन निदानी लिहिले आहे ऐसे असोन आमचे पत्राची उपेक्षा करून आहेत यासच राखीतील तर उपाय नाही मग मामलाच धन्यास निरवावा यैसे जरूर होईल इतके स्वामीने करू नये आपा आम्ही तुमचे कृपेची जोड केली आहे आम्हास जे भारी तें आपण हलके करावें उचित आणि करीतील हा पूर्ण भरवसा या उपरी स्वामीची मर्जी येविशीचे खातरदास्त उतर येऊन पोहचें ते केले पाहिजे रा छ २३ जिल्हेज बहुत काये लिहिणें लोभ करावा हे विनंती अगोदर कैलासवासी [मो.जा.*] बाबा फडणीस यानीच फडणीसीविसी अक्षप केला होता परंतु आपण आमचे ममतेचे आणि घण्याचे आप्त आपली कृपा असावी याकरिता त्याजकडे होऊ न देतां आपणाकडे करार धंधा व्हावयाची युक्त केली याउपरी कृपा आपली जरूर जाली पाहिजे [नि*] हे विनंती मोर्तब सूद

६८

गोरा २३ श्रावण वद्य ११ सोमवार	श्रीशंकर प्रसन	श. इ.

तीर्थरूप राजश्री आपा वडिलांचे सेवेसी

आपत्ये मल्हारीने दोनी कर जोडून सिरसां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत श्रावण वद्य येकादसी सोमवार जाणौन मुा पेडगाव भीमातीर येथे वडिलांच्या आसीर्वादेकरून सुखरूप आसो विशष इकडील वर्तमान तरी श्रीमंत् भीवरा उतरून पलीकडे चालिले पुढे मजल दरमजल गंगेवर जाणार रा जानबा निंबालकर व सरलस्करखा सागाती आहेत वडिलास कलावे म्हणौन लिा आसे बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती

तीर्थस्वरूप राजश्री तात्यांस सिरसां नमस्कार विनंती उपरी तुम्हास श्रीमंताची दोन च्यार पत्रे आली त्यास जाबसालही येत नाही अगर आपणही येत नाही याजवरून श्रीमंत बोलत होते रा मानाजी निकमाचे रसदेसाठी पत्रे येतात आणखीही मामल्याची घालमेल होणार आहेत तरी यावयाचे असेल तरी यावे

नाहीतरी जाबसाल काये तो लेहून द्यावा बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती

सेवेसी गणेश कृष्ण सां। नमस्कार विनंती लिा परीसीजे आपणास श्रीमंत भाऊसाहेब फार शब्द लावितात जे वीस कागद गेले येत नाही व उतरही देत नाही याजकरिता येणे असेल तरी यावे अगर पत्र उगऊन लिहोन देणे ये समई आला तरी जे मामलत म्हणाल ते होऊन येईल आमचे फौजेची निमे समजाविसी जाली निमे राहिले त्याचे होत आहे निमे थोरली फौज उतरोन गेली वरकड उतरत आहे अमवशा जाहलियावरी सारेच पलीकडेस जातील रा। होलकर सिंदे बराणपुरास आले म्हणोन बातमी आहे कलले पा। लोभ असो दीजे हे विनंती

६९

गोरा ७१ } श्री { श. इ.

सेवसी आनंदराऊ निबाजी सां। नमस्कार विज्ञापणां

बागेवाडचे मूकामीहून विनतिपत्र पाठविले होते मागाहून तोफा येत होत्या त्याची वाट पाहात दोन रोज राहिलो मागाहून वर्तमान आले की तोफा मागेच आहेत त्यासी रविवारी तोफाच्या खबरीस मुजरद मानसे पाठविली आहेत त्याउपरी वर्तमान आले कीं श्रीमंत राजश्री नानासाहेब याचा मुकाम आज रविवारी मौजे येरनोल पा। बागेवाड येथे आहे उदईक श्रीमंतासमागमे दर्शणात येतो [नि*] तोफाकरिता मुकाम केला तोफा न आल्या आज माणसे बातमीस पाठविली आहेत श्रीमंत राजश्री [मो. जा.*] नानासाहेबही मनगोलीस आले भोजन करून येरनहल प्रा। बागेवाडी येथे मुकामास येणार उदईक तालीकोटास येणार मी समागमेच येतो हे विज्ञाप्ति

संकीर्ण पत्रे

७०

१
जु. ३७ जिल्काद १० } श्री { श. १६१५ आषाढ शुद्ध १२
इ. १६९३ जुलै ४

दस्तक बो मोकदमानी व रियानी मौजे जेजूरी ताा कन्हेपठार पाा पुणे माळू [म] दानद की जमेत स्वार व प्यादे वगैरे मसाला बहुत कांही किले अजमगड उरूफ पुणेधरास पाठविला आसे व खान रफीअलनिशान महमद अमीखान व तिरंदाज-खान यासीही तेथे मोकरर ठेविले असे जे हमेशा गस्त किल्याभोवती करीत जातील तरी तुम्ही खबर मकहूराची करारवाकै हजूर पाठवणे व किलेमाारीच्या किलेदारासीही देत जाणे पयेदरपै पाठवीत जाणे अगर वीस कोसी या तीस कोसी खबर प्यादे वगैरें गनिमाची जरी न पावे आणि किलेमाारास नेकबद जाली तरी तुम्ही जन-बच्या समेत कापिले जाल व आमची स्वारीही येत आहे दरीबाब ताकीद असे छ १० जिलकादी सन ३७ जलूसवाला

७१

२
फाल्गुन शुद्ध २ } श्री { श. १६४८ फाल्गुन शुद्ध २
इ. १७२७ फेब्रुवारी १२

तीर्थरूप मातुश्री उभयतां बाई वडिलांचे सेवेसी

अपत्ये खंडेराव दाभाडे सांा दंडवत विज्ञापना ताा फाल्गून शुा २ मुा कृष्णातीर वडिलांचे आसिर्वादे समस्त सुखरूप असो विशेष पहिले इकडील साद्यांत राजश्री दादा दिवाणजी यांणी विदीत केले असेल हाली कर्नाटकची मोहीम प्राप्त जाहाली माघ वद्य ११ राजश्री निलकंठराव आबा पांचा कोसांवर गेले सर्व फौजेस आज्ञा केली कीं त्यांबाा जावें राजश्री नारो शंकर यांसी हिंदुस्थानास रवाना केले तो मागाहून माघ वद्य १३ यवनाकडील वकिला [ने अ] र्ज केले...कीं यवन सडे जाहाले भोसले त्या...त्या...तीसपसतीस हजार आहे...प्रतिनिधीस...विला येका दो दिवसा...[जवल ठेऊन सडा] होऊन त्याजवर जाणार पुढे...काये करील [ते] न कले आमची खर्चाची आबाल आहे म्हणून राजश्री दादाकडे माणसे पाठविली

आहेत बेगमी होऊन आली तरी राहाणे होईल नाहीतर उठोन येऊ मग जें कपाली आसेल तें होईल वरकड घोडी माणसें सर्व क्षेम आहेत सेवेसी श्रुत होईल हे विज्ञापना

सेवेसी सदासिव विठल कृतानेक विज्ञापना ऐसीजे साहेबाचे कृपेकरून समस्त क्षेम असो वरकड साद्यांत भेटीअंती श्रुत करीन जे गोष्टीने सरदारी संसाराचा बंदोबस्त राहून कोण्हाचा उपर न होय दादाचे मनोदयानरूप घडे ते करणार धणी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

७२

३ }
रबिलावल १८ }   श्री नकल   { श. १६४९ कार्तिक वद्य ४
{ इ. १७२७ आक्टोबर २३

[डाव्या हाताचे समासात शिक्का*]

राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति गोसावि यासी

* सकलगुणालंकरण आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नेहपूर्वक नारो राम कृतानेक रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष सांप्रत आपणाकडील कागदपत्र येऊन कुशलवृत न कलोन चित सापेक्ष आहे तरी सदैव कुशलवृत लेखन करून चित सानंदित केले पाहिजे यानंतर राजश्री कान्होजी भोसले व राजश्री सदासिवपंत यास विज्यापूर प्रांते रवाना केले दोन मास पोट भरावे भाद्रपद मासी कोल्हापूर प्रांते यावे ऐसी आज्ञा जाली ते समई आपणाकडील महालची रदबदल त्याणी केली त्यास चिरंजीव राजश्री भास्करबावा खासगी होते त्याणी राजश्री [मो. जा.*] स्वामीसी रदबदल केली आणि मागा वसूल घेतला होता त्याविसीही विनंति केली त्यास आपण आसता माहुलीसंगमी सर्वांच्या पैक्याविसी आज्ञा जाली होती तोच जाब जाहाला पेस्तर येक रुका वसूल न होणे स्वामी भीड धरणार नाहीत असे राजश्री [मो. जा.*] स्वामींनी स्वमुखे सांगितले राजश्री कानोजी भोसले व राणोजी भोसले याचे राजश्री स्वामींनी सख्य करून दिल्हे हे साद्यंत वर्तमान चिरजीव राजश्री भास्करबावानी लिहिले आहे त्याजवरून कलो येईल बहुत काय लिहिणे छ १८ शौवल हे विनंति मोर्तब असे

७३

४ } [श्रीनिवास] { शके १६७१ भाद्रपद वद्य ७ नंतर
इ. १७४९ सप्टेंबर २१ नंतर

पुरवणी मातुश्री [मो. जा. *] बाई यासी

विनंती उपरी राजश्री [मो. जा. *] स्वामीस सावकाश नाहीसे [जाहाले] शाहारात गडबड जाहाली बरें आहे वाईट आहे फौज आसावी म्हणून धणि [यानी] राजश्री [मो. जा. *] पंतप्रधान यास आज्ञा केली जे फौज आणवणे [त्यास] त्याणी धणियाच्या आज्ञेप्रमाणें फौज सातआठ हजार पर्यंत आणविली श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईनी येथील सर्वत्र [सर]दारास आज्ञा केली जे फौज आणवणें त्यावरून सर्वही फौज जमा करितात [अद्या]पि येतच आहेत राजश्री [मो. जा. *] पंतप्रधान यांचे बंधू जनार्दन [पंत] बहूत शाहाणे त्याख होते त्यास ज्वरबाधा जाहाली त्यानंतर आरोग्यहि जाहाले मागती पचाव जाहाला किंवा काये जाले काही न कले ज्वरबाधा विशेष जाहाली त्यांत वात निर्माण होऊन भाद्रपद वदी सप्तमीस निधन पावले त्यामुले राजश्री [मो. जा.*] पंतप्रधान बहुत श्रमी जाहाले त्यांचे ठाई वाछल्य बहुत होते या दुखेकरून सांप्रत त्यांस ज्वर येतो उपायही नानाप्रकारचा होत आहे संतापज्वर आहे उपशम होईल जिलेदारानी धण्णीच्या विचारे कांहीं नवे लोक गडावर पाठवावे यैसी तजवीज करून दोनसे मनुष्य पाठविले त्यांस त्यांनी गडावर घेतलें नाहीं यामुलें जिलेदार परम श्रमी आहेत धणी आरोग्यस्नान करून बाहेर आलियानंतर जिलेदारास काये म्हणतात गडकरी याचें पारपत्य करितात किंवा बरे म्हणतात काहीच कलत नाहीं सारांश गडकरी धणियांस हाजीरच आहेत यैसें दिसतें धणी बाहेर आलियानंतर काये वृत्त होईल ते ते लेखन केले जाईल [नि.] बहूत काय लिहिणें कृपा लोभ असो दीजे श्रीमंत सौ मातुश्री [मो. जा.*] बाईसोबाी आर्ज करून राजश्री सिवाजी हरीस बोलावून आणावयांस्तव हातरोखा माहा आग्रहें करू घेतला त्याणीही दिल्हा आता वाडियांतच तदाधिन वृतीत आहेत पुढें पाहावें त्यांची मरजी कळत नाही कळावे म्हणून लिहिलें आसे हे विनंति

७४

५ } श्री निवास { श. १६७१ इ. १७४९

पुरवणी मातुश्री [मो. जा. *] बाईयांसि

विनंति उपरी सौभाग्यवती आंबिकाबाई धणीच्या विचारें [येथे] आली धणीनी त्यांस आणावयास राजश्री प्रतिनिधि व राजश्री यमाजी [पं]त व राजश्री घनबामंत्री यांस सामोरे पाठविलें होतें आले दिवसीं धणीचे दर्शन जाहालें दुसरे दिवसी त्यानीच राजश्री [मौ. जा. *] स्वामींचे दर्शन करविलें धणी बोलिले जे बाई कोठें आहे मुख्य ते कोणी आले तरी काय यैसा भाव श्रेष्टानी दर्शविला आपणावर ममता विशेष आहे यैसें दर्शविलें सौ आंबिकाबाईसमागमे स्वार दोनसे आहेत खर्चाविचास रेवापुरी कर्ज काहाडून देतो वीसपंचेवीस हजार पर्यंत कर्ज दिलें आपणास कर्ज मिलेल तोपर्यंत देतच आहे न मिले तेव्हा कलतच आहे सर्वत्र सामादिकाचेथें रेवापुरीस पाठविले होते जे तुम्ही साहित्य करावें व आपणही राजश्री प्रतिनिधीचेथे गेली होती मंत्री याचेथें व राजश्री गोविंदरायाचेथे गेली होती आम्हाकडे कोणास न पाठविलें आम्हास त्याचें येणें नलगे ही आमची प्रकृति असी आहे जे येकाचे म्हणविलियानंतर लक्ष प्राप्ति जाहली तरी दुसरीया कार्यभागात मन घालणार नाहीं हे आपणही जाणतातच आमचें लक्ष आपले ठाई आहे हे येथें आले परंतु याचें कार्यही चित्तानरूप होत नाहीं मुख्य गोष्टी आपलें पुण्य समर्थ आहे राजश्री यशवंतरायाकडे रेवापुरीस पाठविलें होतें जें तुम्ही वडील सर्वविशी साहित्य करावें त्यास त्यानी उतर दिलें जे तुमचें आगत्य श्रीमंत सौ मातुश्री [मो. जा.*] बाईस आहे यैसें असतां आमचें काये आगत्य आहे ते धणी ते करतील त्यांत सर्वही आहोच यैसें उतर दिलें मुख्य राजश्री येशवंतरायाचें लक्ष आपणाकडे विशेषात्कारें आहे आपणाकडील कार्यभागास बहुत झोबतात आपलीही ममता त्यावर तसीच आहे सांप्रत त्यांस समाधान नाहीं पायास कायेकी डसलें दुख जाहालें आहे बरें होईल धणी बाहेर आलियानंतर तेही दरबारास जातील सर्व प्रकारें राजश्री यशवंतराव राजश्री गोविंदरावजी येथें आपले आहेत चिंता नाहीं सांप्रत उभयतानी लिहिलें आहे त्यावरून कलो येईल लोभ असो दीजे हे विनंति

७५

६ } श्रीनिवास { श. १६७१ / इ. १७४९

पुरवणी मातुश्री [मो. जा.*] बाई यासी

विनंती उपरी तुमच्या शेरीरी वेथा फार जाली म्हणून वर्तमान यैकिले वेथेचें वर्तमान लिहिणें म्हणून लेखन केलें यैसियांस ज्वरानें बहुत [श्रमी] पाच महिने जाहाले उपाय बहुत बहुत केला सांप्रत किंचित समाधा[न] आहे यानंतर सत्वरच आरोग्य निशेष होईल शरीरी त्राण किमपि रा[हिले] नाहीं केवल शक्तीहीन शरीर जाहालें आहे अश्यामध्य राजश्री [मो. जा.*] स्वामीस सावकाश नाहीसें जाहालें त्यामुलें द्विगुण दुखणें जाहालें श्री [मो.जा.*] कृपेने येजमानास निशेष आरोग्य जाहालें म्हणजे त्यांत आमची सहस्त्राव [धी] आरोग्यें आलीं सांप्रत येजमानासही समाधान आहे या संतोषास्तव....सही किंचित सावकाश जाहालें धणी आरोग्यश्नान करून बाहेर [आलि]यानंतर आम्हीही दरबारास जाऊं तेथील हरयेक कामा-काजास तुम[च्या] भरवसियावर बेफिकीर आहो ज्याप्रमाणें भाऊ म्हणाले बोललेत त्याप्रमाणेंच माया करीत जाणें म्हणून लेखन केलें यैसियांस आपण भाऊ म्हट[ले] त्यावरच कृतार्थ होऊन आम्हापासून जीवाभ्य श्रमसाहास जे [होणे] ते करितो आपण येथे आलेत म्हणजे आमचे श्रम दृष्टीस पड[तील] सारांश आम्ही आपली जोडी केली आहे आपले होऊन येथें आहो आप[ण] भाऊ म्हटलें त्याचा आभिमान पूर्ण असो द्यावा [नि.*] बहुत काय लिहावे कृपा पूर्ण आसावी हे विनंती

७६

७ / सु.११५० जिल्काद २५ पूर्वी } श्री { श. १६७१ आश्विन वद्य १२ पूर्वी / इ. १७४९आक्टोबर २६ पूर्वी

अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बनाजी माधवराव गोसावी यांसि

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा खमसैन मया व अलफ तुम्हीं विनंतिपत्र छ २५ जिलकादचे पाठविले ते पावले लिहिला मजकूर कलला नवाबाचे मनसुबियाचा भाव सप्तरुषीकडून प्रेष जाहाले तदविषई बहुत संतोषी होऊन आमच्या पक्षी विकृत भाव चितात आणलियाचे व रघोजी भोसले व [उ]माबाई इत्यादि यास बोलविलियाची व मुजफरजंगाची शेना सिछील पडलियाचा मजकूर लिहिला तो कलला अत:परही तेथील अतरबाहय मजकूर निरंतर

...५

लिहीत जाणे तुम्ही दरबारात पईस बरा केला व रा मोरोपताची दया संपादिली म्हणोन तर हेही मोठी गोष्ट केलीत सारांश वर्तमान तहकीक सर्वदा लिहीत जाणे राजश्री [मो. जा.*] स्वामीच्या वेथेस उता[र]...श्रीकृपे आविलंबेच आरोग्य... [चि]टनिवीस यास लिहिला त्यानी [सविस्तर] अवगत केले त्याजवरून कलो आले ऐशास तुम्ही पदरचे सर्व प्रकारे तुमच्या मनसुबियाची पुष्टता करून सिधीस पावावी हे अगत्य आहे प्रस्तुत आम्ही राजश्री [मो. जा.*] स्वामीसंनिध असो येथील गुंता उरकिलियावर पुण्यास येऊन गोविंदरायास बराबर घेऊन येऊन तुम्हीही भेटीस यालच तदोतर तुमच्या मुखे [स]र्व अर्थ मनास आणून गोविंदरा[या]चे विचारे उचित {त} मनसुबा क[र्त]व्य तो केला जाईल येविसीचा कितेक गोविंदराव यास सांगितला असे हे तुम्हास लिहितील त्याजवरून कलेल तुम्ही आपले समाधान असो देणे

७७

८
रबिलाखर २९ } श्री { श.
इ.

श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाचे शेवेसी

आइःयाधारक मलार धोंडदेऊ आसीर्वाद विज्ञापना प्राथना यैसी जे साहेबाचे कृपाद्रुस्टी करून परगणे मजकुरचे व सेवकाचे वर्तमान ता छ २९ माहे राखर [पर्यं]त येथास्थित असे विशेष साहेबानी कृपाळू होऊन आइःयापत्र सादर केले की परगणे मारची लावणी करून हजूर येणे यैसियास लावणीबदल गावगण्या[चे] करार रयेतीने ज्या ज्या प्रमाणे जो जो मुदा घा[तला] त्या त्या प्रमाणे कोठे...चा व नगदी दिल्हा परंतु सर्व प्रज्जन्याचे हाती आहे प्रजन्य जालिया-[वरला]वणी होईल यानंतर राजकी वर्तमान मोगलाई[कडील] नवाब नासरजंग यानी मुतवसलखान दूर करून नवा[ब] फतियाबखान यास पूर्वतर बागलाण प्रांत धंदा सांगितला व लोहनेर व वाखारी वगैरे परगणे त्याजकडे जाले असेत व किले मोळहेरच्या किलियाच्या सनदा दिल्हया आहेत कळहो मोठासा निर्मान जाला असे यावरून नवाब मुतवसलखान यानी किलियाची व ठाणियाची तमाम बंदोबस्ती केली किलियाचे माचीस खंदक खानावयास माणसे लाविली आहेत व गैरे सरंजाम दारूगोळा वगैरे गले जिनस चढवितात...[कि]लाची मजबुती फारसी केली आहे व दलपत[राव] देसमुख वगैरे साहुकार गडावर नेले यैसी [धा]-

मधूम आहे व ठाणे लोहनेरही बलकटी केली आहे गावात कोन्ही राहादारीचे माणूस वगैरे राऊत गावात उतरू देत नाहीत यैसियास नवाब फतियाबखान औरंगाबादेस दाखल जाले त्याचे कुमकेबदल नवाब मखबुलआलम त्यासही हुकूम आहे की किला कायेम करून याचा अमल शुरू करून देणे मुतवसलखा तो इत-राजीखाली आहेत सुदामते किला देत नाहीत युध्यप्रसंग आहे या[मुले] रयेती तजा-वजा आहे पुढे कैसा निभाव होतो धामधूम तो मोठीसी होणार यावर फौज औरं-[गाबा]देहून आठ दाहा दिवसात बागलाण प्रा[तात] येणार आहे त्यास त्याचा विचार आहे [की आ]धी लोहनेरची गढी कायेम करावी यात मोळहे[रक]राचा निश्चये आहे की किला येकंदर न द्यावा आ[णि] सिबंदी ठेऊन जेथवर हात पोह-चल तेथवर धामधूम करावी यैसा प्रसंग येऊन लागला आहे त्यास आइःयेप्रमाणे आपण सेवेसी येत होतो तो हा दगा यैसा जाला त्यास आपलियास खबरदारीने आसलिया उतम आहे प्रसंगामुले दाहावीस माणसे व सिबंदी असली पाहिजे या समयात प्रसंग देखोन कामकाज केले पाहिजे व परगणेकरी मोकदम कोन्ही भेटत नाहीत आपण येथून निघालिया लोकाचे चित ला[ग]न्हार नाही कितेक वर्तमान संताजी जासूद सागता [विदी]त होईल पुढे जैसे वर्तमान होईल तैसे लेहोन पाठऊन [बहुत का]ये लिा हे विइःयाप्ति

७८

९ सु. ११६९ रजब १	श्री	श. १६९० कार्तिक शुद्ध ३ इ. १७६८ नोवेंबर १२

राजश्री कमाविसदार वर्तमान व भावी मामलत वतनी तलेगांव वगैरे गोसावी यांसी

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो सयाजीराव गायेकवाड समसेर-बाहादर दंडवत व रामराम सुा तिसा सितैन मया व अलफ दाभाडे यांजकडील वतने तलेगाव वगैरे आमचे तसलमातीस आहेत याजकरिता श्रीमंत मातुश्री सगुणा-बाईसाहेब दाभाडे यांस खासगत व मुदबख वगैरे खर्चाबाा नेमणूक श्रीमंत राजश्री माधवराव पंडित प्रधान यानी राजश्री गोपालनाईक तांबवेकर यांचे विद्यमाने सालाबाद रुा १०००० दाहा हजार करार करून आम्हांकडून देविले आहेत तरी तुम्ही या यैवजात काही वतनीबाब व गावखेडे व बागमले व सेतेकुरणे वगैरे व नख्त यैसा दाहा हजाराचा भरणा करून देण्याविसी नाईक यासी आलाहिदा पत्र

लिा आहे ते सांगतील याप्रो लाऊन देणे याखेरीज राजश्री बालाजी गणेश गोन्हे मातुश्रीसमीप कारभार करून आहेत यास दरसाल नेमणूक रुपये १५०० दीड हजार करार करून तुम्हाकडून देविले आहेत येंकूण साडेआकरा हजार सालदरसाल मामलतीचे हिसेबी लिहीत जाणे मजग पडतील दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न करणे तलेगांवी थोरल्या वाड्यात मातुश्री राहतील त्यांचे आज्ञेप्रों वर्तणूक करीत जाणे जाणिजे छ १ माहे रजब मोर्तब सुद

बार

७९

१०
सु. ११६९ जिल्हेज १२ } श्री { श. १६९१ चैत्र शुद्ध १५
इ. १७६९ एप्रिल २०

गगाजल निर्मल मैनाबाई यासी

प्रती माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी येंथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जाणे विशेष तुम्ही आपले चिरंजीव त्रिंबक बाबूराव यासी कजिया करून वेघली राहातो आपल्या पोटाची बेगमी करून देणे म्हणोन मारनिलेस अडऊन त्या[ज]पासून तह करून घेतला कीं सरं[जाम]पैकी चौथाई म्हणून रुपये ६५० साडेसाहासे याचा करार करून घेतला म्हणोन हुजूर विदीत जाले त्यास येंकत्र राहावे हें उतम ते ज्या पक्षी न बने म्हणोन सरकारातून तुम्हास पोटाचे बेगमीस तुमचे पुत्र त्रिंबक बाबूराव यापासोन दरसाल रुपयें २५० अडींचसे देविले असत तरी मारनिलेपासून सदरहू यैवज घेऊन स्वस्त असणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ १२ जिल्हेज सुग तिसा सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणे लेखनसीमा

८०

११ आश्विन वद्य ११ } श्री { श. इ.

श्रीमंत राजश्री दादा दिवाणजी स्वामीचे सेवेसी

पोष्य सदासिव विठल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता आस्विन वद्य ११ पर्यंत धारावाडावर क्षेम असो विशेष बहुत दिवस पत्र येत नाही यैसी निष्ठुरता न कीजे सदैव सांभाळीत गेले पाहिजे विशेष इकडील वर्तमान पूर्वी साद्यंत लिा आहे सांप्रत सवा महिना जाहाला धारवाडास मोरचे लाविले सुरंग तयार जाहाले आहेत आठाचौ दिवसां हला होणार पुढे कोठे जातील हा निश्चय नाही हैंदरनाईक सावनुरापलीकडे विसा कोसांवर आहे आद्याप सळूक नाही कारभाराचा मजकूर येकावर नाही क्षणभंगूर आहे श्री उतमच करील चिंता काये परंतु माहागाई फार सात सेर जोरी आहेत रायाकडे रोज दाहाबारा रुा लागतात व नवसाजीकडे पांचसाहा लागतात यैसा खर्च आहे मी तो स्वामीचे वचनावर बिनपोटी सैन्यात सेवा करीत आहे पायउतारा उर्जित करणार स्वाम समर्थ आहेत गुदस्ताचे व यंदाचे वेतनपैकी कांही चिरंजीवास खर्चांस द्यावें व बाकी राहेल ते आपले कर्जात घ्यावे आणि मजला मुक्त करीत जावे माझे सर्व प्रकारें स्वामीस अगत्य आणि आभिमान आहे हें मनात गांठ घाळून निश्चित आसे सर्व आश्रा मजला स्वामीचा आहे वरकड आर्थ सर्व परिणामी कलेल मजला आश्रा स्वामीच्या म्हणूनच पार पडेन कुटुंबवछल आहे आजी तीन वर्षे कांही कमाविसदारानी तलेगावचे कारकुनीबाबत दिल्हे नाही देवावयाचे आसल तर त्याजपासोन घेऊन आपले कर्जात घ्यावे आगर चिरंजिवाजवल देवावें सुज्ञाप्रति विस्तार काय लिहूं सेवेसी श्रृत होये हे विज्ञा{प}पना हो ती राजश्री मामा स्वामीचे सेवेसी सां नमस्कार प्रविष्ठ कीजे येजमानास माझे आसिर्वाद विज्ञापना प्रविष्ठ करावी वोासपन्न राजश्री भटजीस साा नमस्कार प्रविष्ट करवावे वाो राजश्री बाबा जोसी यांसी साा नमस्कार व राजश्री आबास आसिर्वाद सांगावा मामा मजवर कृपा करावी विहीत आसे हे विज्ञापना तीा सौासंपन्न मातुश्री बाई वडिलाच सेवेसी साा नमस्कार लोभ कीजे हे विनंती

८१

१२
सु. ११७२ रबिलाखर ४ } श्री { श. १६९३ आषाढ शुद्ध ६
इ. १७७१ जुलै १७

[माधवराव बल्लाळ पेशवे याचा भुतालिकी शिक्का*]

यादी बिदनूरचे संस्थानिकाचे प्राचीन बसवंतआया व सिवलिंगापा दलवई व सिकरापा सुभेदार व आपाजीराव रामरा[व] गुरुव कारभारी हे नागापुरीपटणचे मुकामी रा। नरसिंगराव जनार्दन धायगुडे व मादाणा कोयमुतुरकर यांचे बिद्यमाने येऊन भेटले आणि विनंति केली की आमचे संस्थान पहिलेपासून सरकारात रुजू राहून दरसालची खंडणी दरबारखर्चसुद्धा रुाये १५००००० पंधरा लक्ष रुाये देत होते त्यास हैदरनाईक याणे संस्थानावर चढाई करून दरोबस्त संस्थान घेतले आणि आम्हा सर्वांस परागंदा केले राज्याचे वसीचें जे कोणी आहेत तेही जीव वाचऊन आहेत साहेबी हैदरनाइकावर मौहीम करून पारपत्य करावे या अर्थ श्रीमंत राजश्री त्रिंबकरावमामा यास फौजसुधा कर्नाटक प्रांती छावणीस ठेविले यांनी साल गुा। हैदरखानास फौजसुधा श्रीरंगपटणानजीक मोतीतलावावर लुटून पस्त केले यामुले आम्हासही उमेद जाली की दाहावीस हजार पायेदल मेलऊन बिदरूरचे कार्यास पुढे हरोल होऊन जागाजागां प्राचीन संस्थानिकाचे आत्मिक व चाकर लोक आहेत त्यांच्या सूत्रे भेदभाद करून व माहीतगारीने कुल आसपासची ठाणी घेऊन द्यावी बो। सरकारची फौज दाहापांच हजार व तोफाही आसाव्या बिदरूरचे झाडीस व चोरवाटास आम्ही माहीत बंधल्याकणव्यास लढाई पाडून चोरवाटानी आम्ही पुढे सिरावे व सरकारची फौजही न्यावी आणि संस्थान फते करावे सरकारचे निशाण किल्यात चढवावे त्याउपरी साहेबी कृपा करून सालाबादची खंडणी पूर्वीची आहे त्यापेक्षा दरसाल ज्याजती रुाये ५००००० पाच लक्ष येकूण दरसाल खंडणी बेदिकत रुाये वीस लक्ष द्यावे याची निशा सालबसाल साहुकारी करून द्यावी व पहिले साली संस्थानावर संस्थानिकाची स्थापना केली म्हणजे सरकारची नजर रुाये ५०००००० पंनास लक्ष व दरबारखर्च रुाये ५००००० पांच लक्ष येकूण पंचावन लक्ष रुाये दरसालचे खंडणीसिवाये सदरहू पंचावन लक्षाची साहुकारी निशा तीही हत्फयानी येके सालात ऐवज सरकारात पावे आसी करून द्यावी याविसीची [नेम]णुकेची कलमे बितपसील सुा। इसन सबैन मया व अलफ

बिदनूर तालुक्याची ठाणी सर होतील ती आमचे स्वाधीन करावी त्यात सिबंदी आम्ही आपले लोक ठेवावे ठाणे जुमस खाऊ न देता जतन करावे जकीरा दाणा व दारूगोली सर्व सरंजाम आम्ही करून जागा राखाव्या कलम १

ठाणी बसऊन जीं ठाणी आमचे जिमेस होतील त्या मुलकाची लावणी जालियाउपर त्या गांवखडचास सरकारचे फौजेचा उपसर्ग न लागावा ताकीद आसावी कलम १

संस्थान आम्ही पुढे होऊन सरकारांत सर करून दिल्हयानंतर संस्थानि-[काची] स्थापना संस्थानी साहेब करणार त्यापक्षी नजरेचे पैक्याची निशा वशर्त काम साहुकारी करून देऊ येविसीचा रुजू मोझ्या सरकारात निशा पडे ऐसा करून आगोदर देऊ कलम १

संस्थानिकास संस्थानी बसविल्यावर ज्या समई खासा स्वारी आगर कोणी सरदार सरकारची फौज घेऊन येईल ते समई आज्ञा होतांच दाहा पांच हजार प्यादासुधा बरोबर राहून पदरचा पैका लाऊन साहाच्यार महिने राहाणे पडले तर राहून चाकरी करून दाखऊ या गोष्टीस आंतर पडो देणार नाही कलम १

संस्थान हस्तगत होये तोपर्यंत लस्करामुळे ळूट पायेमाली होईल ते होईल परतु ठाणे बसल्यावर खंडणी ज्या ठाण्याची जी बेरीज होईल ते बेरीज येकंदर नजरच्या ऐवजात आखेर हत्प्यांत मजुरा द्यावी कलम १

बिदनूर प्रांतातील आमलदार व ठाणेदार व पाटील व शानभोग सरकारात रुजू होऊन मुलकाची आबादी करू म्हणतील त्यास आमचे जिमे करावे एक साल प्रथम .... ची .... कारा .... आमल बसोन पैका [वसू]ल होईल तो आम्हास सिबंदी खर्चाकरिता द्यावा सरकारात घेऊ नये कलम १

संस्थानिकाचे वंसीचा कोणी येक संस्थानावर साहेब कृपा क[रून] स्थापितील त्या साली तरी नजरेची बेरीज वर लिहिली आहे त्याप्रो आधी साहुकारी निशा करून देऊन मुददीप्रो ऐवज पावता [तरी] त्याचे दुसरे साला[पासू]न दरसाल सरकारची खंडणी द्यावयाची वर बेरीज करार लिहिली आहे त्याप्रो सावकारी निशा होऊन दरसाल ऐवज देण्याची सोये न होये तर कराराचे बेरिजेचा वसुली सरंजाम मुळुक सरकारात तोडून देऊ कलम १

संस्थानिक येऊन बजीद होऊन सरकारचे {सरकारचे} स्थापित होतसाते संस्थानी राहू आणि वरता खुलासा मजकूर सदरी लिा आहे त्याप्राा व त्याच अन्वये खाली निराली कलमे सात लिहिली आहेत त्याप्राा आम्ही वर्तणूक करू निभाऊ तर

विनंति लिा प्रो आम्हावर कृपा करून संस्थान घे[ऊन] संस्थान घेण्याविसी ज्या प्रकारे लिहून दिल्हे आहे त्याप्रो मेहनत तरतूद माणूस मेलऊन आम्हाकडून चाकरी न जाली तर संस्थानासी आम्हासी संमध नाही हे आम्ही आपले रजावंदीने कबूल करून लिहून दिल्हे त्याप्रो साहेबी करार करून सरकारचा सिका मोर्तब करून दिल्हे असे जाणिजे छ ४ माहे रविलारवर आज्ञाप्रमाण लेख । न सीमा

[या खाली कानडी लिपीच्या सुमारे दहा ओळी* ?]

८२

१३ } [पहिले तीन बंद गहाळ*] श्री { श. इ.

न मनसबा करून फेर मतगडावर जावोन मतगड तेच क्षेणी सही केला रात्री चांबरेलीचे आगाकडोन सिड्या लावोन आत लस्करसुधां मतगडावर चढले दोन तीन वर्षे दौलत केली सिदी मुर्जन यासी किलेदारी देऊन किलेयावर ठेऊन आपण लस्करसुधा दिघीस येऊन काहीयेक दिवस दिघीस राहोन फेर राजपुरीस गेले तेव्हा जजिरकराची व खानजादे यांची बोलीचाली इगरेजाकडोन सीदी जमरूद जावोन भेटाभेट खानजादे व खानसाहेब याची पीरसाहेब जंजिरे याचे तेथे भेट खानजादे व खानसाहेब यांची भेट तेच जागा करावी असा करारमदार जाला होता सीदी जमरूद यासी खानजादे यांही बोलविले लस्करसुधा जजिरेयांत जावोन खानाचे भेट घेऊ तो खान कबूल नाही दाहा आदमी याजसु येणे तेव्हा खानजादे याही कबूल केले नाही तसेच खोकरीत बैसलें दाडे याचा दरवाजा व गणेशदरवाजा आबवलीकडील खानजादे याजकडे होता मुरडाकडील दरवाजा जजिरकर खानसाहेब याजकडे होता जजिरेयाचे शाकाराचे सामान वगैरा जजिरेयाचे शाकारणीचे नेले हे देत त्याचे ह्याचे लोक येकत्र चौकीपाहारेयांसि होते इतकियामध्ये जजीरकराने कल खावोन लढाईचा मुकदमा मुळक ओस करावा आणि खानजादे यासि दाणा मुलकात न मिले ऐसे केले तेव्हा दांतार खानजादे याजकडे वकिलीस आला की खानजादे यासि बोलले की तुम्ही उठोन मतगडास जावे रयेत दुवा देईल त्याजवरून खानजादे याही रयतेवर नजर देऊन [**तुम्ही**] मतगडास...आणि दातार म्हणाले की तुम्ही तीन तपे साडेतीन घेऊन मतगडास बैसावे व त्याही दोन तपे नादगाव व माडले घेऊन असावे ऐसा करार करून उठोन मतगडास गेले ते...आणि बेरलीस हवेली बांधोन दोन वर्षे दोलती तीन

साडेतीन तपे यावर केली आजलग सन सबैन पावेतो सन {स} मजकुरी मार्गसीर मासी सरसुभाची आज्ञा रा गोविंदराव माणकर सुभेदार तलागड यासि नेमून मसलत दिल्ही की तुम्ही जावोन खानजादे यासि मतगड घेऊन खानजादे यास घेऊन आम्हाकडेस यावे त्यावरूज गोविंदराव माणकर याही कबूल करून पुणियाहून [अपूर्ण]

८३

१४ } श्री { श. १६९६–९७ इ. १७७५

सेवेसी विनंती विषस अपण कृपा करून होनाजी जासूद व सटवाजी दाभाडे याजबरोबर पत्रे पाठविली ती पावली लिहिला मार ऐकूण चित्तास समाधान जाले मी सरकांर कामास जातो न जातो याची हाजरी देवास आहे गाईकवाड याजकडील वर्तमान तर का[नो*]जी गाइकवाड याणि गोविंदराव यास पत्र पाठविल की तुम्ही दक्षेण राहाव या प्राती येऊ नये तेथच पेसवे याजकड पाच [ह] जार फौजणसी चाकरी करावी यास पैका लागल तो अल देऊ तुम्ही विकड येऊ नये तुम्ही इकड अल्यास {तुम्ही इकड अल्यास} तुमच अमच बननार नाही कदाचित अला तर......याव तिकड त्याणी शावाराम याजबरोबर पाच हाजार फौज देऊन व इंग्रजाची पलटण देऊन सुरत अठाविसीत पाठऊन बदोबस्त केला अहे पुढ जैं[स] अढलल तैंस लेहीन राजश्री मोरो राम यास मसाला झाला सबब फजीत पत्र लेहील त्याते अम्हास न कलत जां जे समई रा राघोपंत गडबाले याच घरी ऐकल तेच समई गारिदी खोलबून घेतल मसाला याचा विस्ता[र] अम्ही उघडा ल्यहवा ऐस नाही परभार समजल अपल्याकडील बोलन बोलतच अहे कार्य {कार्य} होऊन येईल तो सुदीण बहुत काये लिहिण सेवेसी श्रुत होव विनती

८४

१५ } श्रीवरद { श. इ.

श्रीमंत राजश्री बापू स्वामीचे शेवेसी

पोा पुरुषोतम माहादेव सांा नमस्कार विनंती उपर येथील कुशल ताा छ २९ जौवल मुाा दिली जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पोा विशेष इकडील वृत्त

सविस्तर पूर्वी सो। लिहिले हाली नवलविशेष इंग्रेजानी कालपी[हून] तीन कोस कूच झासीकडे केला सेवकाने वजिरा .. .. साहेब आहे त्यास लिहिले होते [की काल]पीकडे फौज किमर्थ पाठविली त्याचे उतर विस्तारे त्यानी लिहून स्नेह दर्शऊन पुढे दक्षणेस यावयाचे उदेगात फौजा वरचेवर कलकत्याहून कालपीकडील कंपूचे कुमकेस रवाना जाले आहेत बालाजी गोविंद रघुनाथास सेवकाने सूचनार्थ लिहिले त्याचे उतर न पाठविले उलटी वलगना करितात की आपले नेमणुकीकरिता दबाव लिहितात आता प्रत्यास आले व येईल झासीत येक महि-नियाचे भक्षावयासि नाही याप्रोाच बालाजी गोविंदाकडील बंदोबस्त आहे तिकडे श्रीमंताचा येकोपा होणे दुस्तर त्यांत कितीक भेद आहेत ते आपण जाणतात थोर कारस्ताने सेवकास आपली गुजराण होणे व हजूर येऊन पोहचणे दुस्तर सलाह असेल व मर्जीस आल्यास येक पत्र इंग्रेज वजीरापासी आहे त्यास श्रीमंत स्वामीचे पाठवावे की प्राचीन तुमचे कंपनीसी कौल आहे त्यांत आम्हाकडून आंतर होत नाही तुम्ही आपले इमानावर कायम राहून वृथा जेरबारी होईल ते आम्ही देणार नाही मुमईकरासी करार आहे त्याप्रो तुम्ही आम्ही वर्तावे सविस्तर सेवकाचे नावावर हवाला देऊन लिहावे की सरकारची फौज व सरदार ये प्रांती येत तोवर प्रयेत्न करून झासी बुधेलखंडाचे संरक्षण होये ते तदबीर करावयासी सेवक लागेल याहीवर सलाह असेल तेच सरदार [नि*] आपण करावयासी समर्थ आहेत सेवकाची चाकरी समयोचित सूचना करावी कृपा करून पालन करावे दर्शन लाभ होये तो सुदीन हे विनंती

८५

१६ }
सवाल २१ }

श्री

{ श.
{ इ.

श्रीमंत राजेश्री [मो. जा.*] राऊ सेनाखासखेल साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक खंडेराव गायेकवाड रामराम वि[ज्ञा]पना येथील क्षेम तागायेत छ २१ शवाल कु[शल] जाणोन स्वकीये क्षेम लेखन करावयास ले[खनाज्ञा] केली पाहिजे विशेष साहेबी............ज बरोबर पत्रें व वस्त्रें पाठविली तें पावली [आज्ञा] केली की तुम्ही चांदखेडास येणे त्यासी [आम्ही] यावे हेही खरे परंतु पूर्वी आपले शेवेसी [पत्र पाठविले] त्यामधे कितीक विचार लिहिणे तो लिहिला [आहे] आपणही स्वार होऊन रायेपुरास बाहणा करून......लो की मजलदरमजल आप-णापासी यांवे ह निश्चये करून स्वार होऊन रायेपुरच्या मुकामास आलो [पुढे]

देशच वर्तमान ध्यानास अनितां प्रज्यन्य नाही त्याजकरितां महर्गता विषेश अण त्रुण उदक देखील नाही आपणासमागमे खर्च विशेश दुसरे या प्रांतीही प्रज्यन्य नाही सोनगडापासून [येथ]पर्येत नाही उदक देखील प्राशणास वाटसरास न मिले त्याजकरितां देश सर्व उद्वस जाहाला जुजबी वस्ती कोठकोठ आहे आण मनसुबी-याच्या विचारास तर प्रज्यन्याचे साहित्य पाहिजे साद्यंत विचार तर या प्रकारचा वरकड फौजचं साहित्य तर अनकूल आहे आश्रये तर आपला सर्व प्रकारे के[ला] आहे सर्व काही होऊन येईल यामधे संदेह नाही त्यावर सुरतकर आविंध शात जाला त्याजकरिता [या] स्थलास पेशव्यांकडील अंत्र लागले आहे ......फौजाही रामनगर प्रांते येत आहे म्हणोन [बातमी] आहे त्याजकरितां तीर्थस्वरूप राजेश्री स............यानी बहुत अतिशये केला की तु[म्ही]............जाता आणि परकी फौज या मुलकात............येक होये न होये जालिया उपरांतीक...... जिकडे जावयाचे असेल तिकडे जावे......म्ही सुरत प्रांतास जाऊन त्या फौजास शह........ निमित्य अतीशये करून सुवर्णचळास......फौजच वर्तमान तहकीक अलियावर येथून स्वार होऊन सुरतेवर जाव लागते आणि तुरुत पागेस चंदी रोजमुरा मिळत आहे च्यार दिवस गुजराण...ती आणि यांचाहो अतिशयें विशेष आण कारभारसमधे करूनही पाहतां कीं परकी फौज आपल्या [प्रां]तास येती आण आपण तिकडें यावे कदांचित त्यानी स्थळ हस्तगत केले तर सर्व देशास उपद्रव होऊ सके निमित्य च्यार दिवस राहणे जाले आणि आपली आज्ञा कीं येणे तर आपलीही सर्वोतमणा मानस कीं यावे परंतु विचार पाहतां शुध दिसत नाही कीं तुम्हीच शब्द ठेवाल आणि त्याही उपर स्वार होऊन यावे तर तेथही महिना दोन महिने कारभारसंमधे लागतील तो उस्णकाळ अला याजकरिता च्यार महिने येथे राहूं उपरांतिक आपल्यापासि येतो हा निश्चये कलला पाहिजे हली चिखलीहून रो। माहदजी......यानी पत्रे लिहिले की रो। देवजी ताकपीर...... पलें समाधान जाले या उपर आपण चांदखेड.........न साहेबाची समजावीस करून आपण......न येतो तर आपण त्याची मार्गप्रतीक्षा......त्यानी आपले समाधान करून याप्रा......ते आलें म्हणजे उतम जालें आपलें येणेही......भेटी अंती सर्व होऊन येईल कदांचित न जाले तर आपण साहेबापासी चौ..... उपरा-तिक क्षेपनिक्षेप येतो यासि अंतर कोन्ही हितशत्रुत्व लेहू अथवा प्रमाण लेहू याज-उपर आपल्यावेगली दुसरी जोड नाही आण प्रस्तुत न आलो म्हणोन रागे भरले न पाहिजे सर्व प्रकारे आश्रये आपला आहे आपण धनी सिरावर असता चिंता आम्हास काये पत्रीं विस्तारे करून काये ल्याहावे जे दिवसी समक्ष भेट होईल ते दिवसी सर्व वृत विदीत होईल तर काही आपण चितात दुसरी कांक्ष्या आणिली न पाहिजे आम्हास बंधुत्व आथवा धनी मिळोन येक आपणही आम्हानिमित्य दुसरा अर्थ {अर्थ} चितांत आणिला न पाहिजे आम्ही सर्व प्रकारे आपले पदरचे असो बहुत

काय लिहिणे उभयेता जबानी शेवेसी विदीत करतील त्यावरून श्रुत होईल हे विज्ञापना

८६

१७
सु. ११९० रमजान १२ } श्री { श. १७११ ज्येष्ठ शुद्ध १५
इ. १७८९ जून ७

[माधवराव नारायण पेशवे याचा खासा शिक्का*]

करारनामा सरकार राजश्री माधवराव नारायण पंतप्रधान बहादर व नवाब निजामअलीखां आसफज्या बाहादर व कंपिनी इंग्रज बहादर या तिही सरकारामिलोन टिपूवर मोहीम करावयाचा ठराव मारफात मेस्तर च्यारलिस वार मालीट वकील मुख्तार दिा रइट अनरबल च्यारलिस कारनवालिस गवरनर जनराल बाहादर कलकता सुाा तिसैन मया व अलफ....................कलमे

[४ ओळी फार्सी मजकूर*]

पूर्वीचे अहदनाम्यांत दोस्ती व मोहबत आहे ती या लिहिल्यावरून जाजती होईल
कलम १

[एक ओळ फार्सी मजकूर*]

तिही सरकारांसी व टिपूसी तह आहे त्यास टिपूने तिही सरकारांसी बदमामली केली सबब तिन्ही सरकारा येक होऊन मोहीम करून होईल तितकी तंबी करावी की पुढे असी बदमामली करावयास जोर राहाणार नाही कलम २

[३ ओळी फार्सी मजकूर*]

[३ मसलतींचा नक्षा ठरला आहे त्यास टिपूसी व इंग्रजासी लढाई सुरू जाल्याची बातनी मेस्तर मालीट सरकारात सागतील व किनवी नवाबास सागतील त्यासमई पंतप्रधान व नवाब यांजकडील फौज पंचवीस हजार टिपूचे मुलकांत जाऊन बरसाती आगोधर व बरसातीत जितका मुळूक व किले येतील ते घ्यावे पंचवीस हजार फौजेत कमी नसावी पंचवीस हजारांवर फौज सामान जाजती होईल तितके चांगले बाद बरसात पोख्त सरंजाम घेऊन मोहीम करावी]

[४ सरकार कंपणीची दोन पलटणे नवाब यांस कुमकेस दिल्ही आणि राव पंतप्रधान याणी गरज लागल्यास या मोहीमेस मागितल्यास द्यावी पलटणाचे दरमाहाचा करार नवाबानी कंपणी इंग्रजासी केला आहे त्याप्रो राव पंतप्रधान यांचे सरकारातून द्यावा]

दोन पलटणे पंतप्रधान यांचे लश्करांत दाखल जाल्यावर पंतप्रधान याणी दोन हजार स्वार पलटणाजवळ ठेवावे ज्या कामास पलटणाची गरज नाही आणि फौजच पाठविणे लागेल तेव्हां येक हजार चाकरीस फौज जाईल व येक हजार हमेषा पलटणाजवळ राहील पलटणाचा दरमाहा द्यावयाचा करार ठरला आहे त्याप्रो दरमाहाचा पैका लश्करांत अगर पुण्यात मेस्तर मालीट मागील तेथे द्यावा

कलम ५

[६ ओळी फार्सी मजकूर*]

[६ दोन पलटणे राव पंतप्रधान यांचे सरहदेत दाखल जाल्यावर पंतप्रधान यांजकडील कारकून पलटणांचे सरदाराजवल कामकाजास राहावा]

[७ इंग्रज याणी आपल्या फौजेत दाखल व्हावयास दाहा हजार फौज मागितल्यास सरकार व नवाब मिलोन द्यावी ज्या समई स्वार मागतील तेव्हा-पासून येका महिन्यात तयारी करून रवाना करावे ज्या वाटेने जलद निभाऊन पोहोचू सकत त्या वाटेने ज्या मकाणी जावयाचे ठरेल तेथे जाऊन पोहोचावे कंपिणीच्या जमयतीचे सामिलातीने फौज काम करील स्वारांचा दरमाहा जो ठरावात येईल तो दरमाहा द्यावयाचा जिमा कंपीणीचा दरमाहाचा दरमाहा देत जावा अगर स्वारानीच जाऊन कामकाज करावयाजोगे असेल तेथे हमराहाची तकरार करू नये]

[८ ती तर्फा लढाई ज्यारी होईल त्यास त्रिवर्गातून येकावर टिपू गालब पडल्यास दुसऱ्यानी त्याची आपले जोराप्रो। कुमक करून नतिजा करावा]

[९ त्रिवर्गानी मिलोन मोहिम करावी असा करार त्यास त्रिवर्गाची लढाई सुरू जाली म्हणजे मुळुक व किले कोट वगैरे जे त्रिवर्गाचे सरकारांत मिळेल ते त्रिवर्गांनी बराबर तीन हिसे वाटून घ्यावे राव पंतप्रधान व नवाब याच्या फौजा टिपूच्या तालुक्यात दाखल होऊन लडाई सुरू होईल त्यापूर्वी इंग्रजानी मुलुक सोडविला तर त्यांत वाटणी उभयतांस नाही मुळुकाची व किलेकोटाची वाटणी आपले आपले सोईने व सरहदीने करावी]

[१० पालेगार व जमीदार मुतवसील राव पंतप्रधान व निजामअलीखान यांचे आहेत त्यांचा मुळुक त्रिवर्गाचे तसरूफांत येईल तो त्रिवर्गांनी त्याजकडे मुळुक व किलेकोट बाहाल करावा बाहाल करतेसमई नजराणा ठरावां येईल तो त्रिवर्गानी बराबर वाटून घ्यावा पेस्तर खंडणी व पेशकस राव पंतप्रधान व निजाम-दौले हरसाल घेत आले असतील त्याप्रो घेत जातील पालेगार व जमीदार मजकूर राव पंतप्रधान व नवाब यांसी फंद फितूर करतील व खंडणी पेषकस वगैरे रुजू

आणण्यात खलेल करतील त्यास हरदो सरदार त्यांचा बंदोबस्त पाहिजे तसा करण्यास मुख्त्यार आहेत सावनूरकर याणी राव पंतप्रधान व नवाब दोहो सरकारांत चाकरी करावी अगर दोहीतून येका जागी नोकरी न करतील तर त्याचे बंदोबस्तास दोन्ही सरकार मोख्तार मुनासब पाहातील तसे करतील पालेगार व जमीदार याचा ताा

१ चित्रदुर्ग	१ केंचनगुंड
१ आनेगोंदी	१ कन[क]गिरी
१ हरपनली	१ कितूर
१ बल्हारी	१ हावनूर
१ रायदुर्ग	१ अबदुल हकीमखान सावनूरकर याजकडील तालुका]
—	—
५	५

१०

११ मसलत मोठी आहे याजकरतां परस्परे वकील लस्करात असावे त्यांणी अखबार बातनी व मर्जी परस्परे कलवीत जावी परस्परे जी मसलत सुचेल ती कलवीत जावी त्याची दर्याफ्त करून मुनासब बरवक्त अहदनामा मनात आणून अमलात आणीत जावे

[१२ अहदनाम्यावर दसकत व मोहोर करण्यांत येईल नंतर कोणीही अहदनाम्यात कसाही बहाणा करून अगर कोणाचे सांगितल्यावरून व लिहिल्यावरून अहद सोडू नये अगर सळूक करण्याचा दरकार पडल्यास त्रिवर्गाचे विचारे] सलाह ठरून सळूख करावा त्यांत मुनासब हरकत आणू नये कोणी येका शरिकापैकी कोणताही सवाल जवाब अलाहिदा टिपूसीं न करावा बलकी जो काही पैगांम टिपूकडून कोणांहीकडे आला तर त्याचा इतला दुसऱ्याकडे द्यावा कलम १२

[५ ओळी फार्सी मजकूर*]

टिपूवर मसलत करार जाली आहे त्यास लडाई होऊन कदाचित तह जाला आणि पुढे टिपूने करारांत तिही सरकारांतून येकासी अंतर केल्यास तिही सरकारांनी येक होऊन टिपूस नतिजा पोहचवावा नतिजा करण्यास पुढे मोहीम करणे पडल्यास तिही सरकारांनी कोणे तऱ्हेने करावी याची शकल पेस्तर तिही सरकारचे सलाहने ठरावांत आणावी

कलम १३

[४ ओळी फार्सी मजकूर*]

दसखत व मोहोरेनिसी अहदनामा मेस्तर मालीट याजवल दिल्हा व सालिटानी आपले दसकत मोहरेनिसी अहदनामा चौदा कलमाचा तूर्त सरकारांत

दिल्हा सरकारचा अहदनामा कलमबंदीचा जाला आहे त्याप्रो कलकत्यास मालीट याणी लिहून पाठऊन त्याप्रो कलकत्याचा अहदनामा पंच्याहातर दिवसांत आणून सरकारांत द्यावा नंतर मेंस्तर मालीट याचे मोहरेचा अहदनामा घेतला तो मार-निलेस माघारा द्यावा कलम १४

[५ ओळी फार्सी मजकूर*]

यकूण कलमे चवदा करार असेत विद्यमान बालाजी जनार्दन छ १२ रमजान

लेखन सीमा

[१ ओळ फार्सी मजकूर*]

८७

१८ फाल्गून वद्य ६ } श्रीगज्यानन प्रा. { श. १७१६ फाल्गून वद्य ६ इ. १७९५ मार्च १२

तीा मातुश्री [मो. जा.*] बयासाहेब वडिलाचे सेवेसी

अपत्य येशवंतराव दाभाडे चरणावर मस्तक ठेऊन सिरसााग दंडवत विनंति विज्ञापना ताा फाल्गूण वाा ६ शष्टीपरियेत वडिलाचे आसिर्वादेकरून मुकाम लशकर नजीक वाकी मानभावाची येथे वडिलाचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशष इकडील माार तर राा पंत प्राा याचा मुकाम तो येथेच आहे पुढे फौज ग ल्या आहेत याची व त्याची गाठ रोज पडती नवाब तो घाट मोहरीचा उतरून खरडेअलीकडे च्यार कोस अला श्रुाा ४ सोमवारी होलकराची व त्याची काहीसी लढाई जाली अहे त्याजकडील मीर जुमला याचा जावई लढाईत ठार पडला सेदोनसे तटे व बैल होलकर याणी काही अणली आहे सिदे याणी तेच दिवसी तोफ अणिली परंतु नवाब {ब} कूच दरकूच पराड्यास जाणार वाटेणे याची व त्याची लढाई होत जातच अहेत तो तैसाच लढाई करीत कूच करून जात अहे याचीही खासा स्वारी वगैरे सडे होऊन गुरुवारी अथवा शुक्रवारी पुढे जाणार अहेत समागमे अम्हासही जावे लागते वरकड इकडील नवल विशेष माार लिहावा यैसा नाही सर्व बदोबस्त येथास्थितच होईल अम्हाविसी चिंता न करावी अपलेकडील अज पधरा दिवस काही येक वर्तमान कलत नाही त्यास पत्रे सत्वर पाठवीत जावी तेथे पुण्यात दगा जाला

असेल म्हणून आपण डगागू नये व रयेतीसही ताकीद असावी कोणेविसी कालजी न करावी आपलेकडील कुशल व्रत लिहवीत जावे येथून सिव्हावरील कमळ ळुटीचे अले होते त्यापैकी कमल गेले सिव्ह हती लागला तो पाठविला अहे व ताडपत्री पासोड्या जुन्या दोन पाठविल्या अहेत काही उपयोगी नाहीत परतु जामदारखान्यात असू द्याव्या उत्छाहाचे कामास पडतील हाजारीचे तो उपयोगी नाही परतु मर्जीस पडल्यास त्यासही द्यावी वरकड मार सविस्तर वरचेवर लिहीत जावा भाऊ परचुरे याजकडील यैवज घेऊन देवडीवाले व चावडीवाले याचा बदोबस्त करवावा अजमासे रुा सातसे परियेत वसूल घ्यावा येथे भाऊसीही बोलून ठीक केले आहे अपण बेफिकीर वसूल घ्या[वा] अपलेकडील दरबारी मार तर याद नानापासी गेली अहे मखलसी जाली म्हणजे खर्चाचा यैवज हातास येईल मुत्छदी जड खरा परंतु कामे मनोदयानरूप करून देईल चिंता नाही च्यार दिवस कमपेश लागलियास लागोत परतु कामे लवकरच चागली होतील येथे लढाईचा प्रसंग सनिध्ध लागला आहे व यंथे यासही तूर्त मनुश्याचे प्रयोजन अहे यैसियात कामे लवकरच होतील सर्व अर्थ अपले आसिर्वादे मनोदयानरूपच घडतील अपलेकडील पत्र येऊन वर्तमान कलत नाही तेणेकरून चित सचित असते याजकरिता लवकर पत्र पा जावे म्हणजे येथे आम्हास कामे सुचत जातील नाही तो दुसरे काही कामे सुचत नाही याजकरिता पत्रे लवकर पाठवावी व पाणी लागू नये याचे अवशध अपण करून पाठविती म्हणून अज्ञा जाली होती परंतु अद्यापि न अली त्यास लवकर करून पाठवावी व होनाजी जासूद याजलाही लवकर पाठऊन द्यावे

८८

१९
चैत्र वद्य १३

श्री

श. १७१८ चैत्र वद्य १३
इ. १७९६ मे ५

पौ छ २७ सवाल चैत्र मास सुा सीत तिसैन मया व अलफ शके १७१८

श्रीमंत राजश्री [मो. जा.*] बाबासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक केशवराव सुदर व नीलकंठ खंडेराव कृतानेक साष्टाग दंडवत विज्ञापना ऐसी जे येथील कुशल ताा चैत्र वद्य त्रयोदसी गुरुवासरपर्यंत.... जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावोन परम समाधान जाहाले ऐसेच निरंतर पत्र पाठऊन संतोषविले पाहिजे यानंतर श्रीमंत थोरले माधवरावसाहेब दर्शनास आले तेव्हा श्रीमंत

मातुश्री [मो. जा.*] आईसाहेब होती त्यास प्रथमदर्शनी दाहा मोहोरा नजर केल्या त्याणी आंगावर भरजरी चादर घातली तदोतर पेशवाईची वस्त्रे दिल्ही जातेसमई निरोपाची वस्त्रे दिल्ही मातुश्री [मो. जा.*] आईसाहेबास कैलासवास जाल्यानंतर श्रीमत दादासाहेब थोर[ले माधवराव] साहेबास घेऊन आले तेव्हा माहाराज राजश्री [मो. जा.*] रामराजे यास दाहा मोहरा नजर केल्या त्याणी यांचे आंगावर भरजरी चादर घातली पदाची वस्त्रें दिल्ही निरोपाची वस्त्रे दिल्ही श्रीमंत नारायणरावसाहेब याणी प्रथम दर्शनास आले तेव्हा दाहा मोहरा नजर केल्या माहाराज रामराजे याणी भरजरी चादर आंगावर घातली मार्गसीर वद्य चतुर्थीस रात्रौ पदाची वस्त्रे दिल्ही तदोतर श्रीमंतानी डेऱ्यात मेजवानीस नेले पांच हती पाच पोशाख जवाहीर जेगा परखाना व सिरपेंच व मोत्याची कंठी व मोत्याचा तुरा व मोत्याचा चौकडा ऐसे जवाहीरही फारच दिल्हे सोन्याचा चौफुला व अतरदानी दिल्ही रुप्याचे येक ताट व सोला वाटया व येक तबक व येक गुलाबदाणी दिल्ही व तख्ताचे सामान किनखापी लोडे तीन व गादी व माडतकिये दोन व बासिंगी तकिया येक व.........याप्रो सारे सामान किनखापी दिल्हे ज्या डेऱ्यांत मेजवानी केली तो डेरा दिल्हा व बिछान्याची जाजमे कनाथा सुधा

श्रीमंत राजश्री [मो. जा.*] बाबासाहेबाचे सेवेसी

दिल्हा घोडा जिनसामानसुधा दिल्हा येक हती अंबारीसुधा दिल्हा माहाराजानीही हती घोडा जवाहीर दिल्हे निरोपाची वस्त्रे दिल्ही तो समारंभ आपण पाहिलाच आहे तदोतर श्रीमंत [मो. जा.*] दादासाहेबास वस्त्रे न्यावयास श्रीमंत भवानराव प्रतिनिधी व अमृतरावसाहेब व बज्याबा पुरधरे आले त्याणी प्रथम पांच मोहरा नजर केल्या आंगावर चादर घातली पदाची वस्त्रे प्रतिनिधीची भवानराव यास दिल्ही पेशवाईची पाठऊन दिल्ही जवाहीर दिल्हे त्याची याद अलाहिदा पाठविली आहे श्रीमंत माधवरावसाहेब यांस वस्त्रे न्यावयास सखारामपंत बापू व नाना फडणीस आले त्याची याद तपसिलवार लेहून पाठविली आहे त्यावरून सर्व विदीत होईल सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति

...५

८९

२०
वैशाख वद्य ७

श्री

शा.
इ.

श्रीमंत राजश्री [मो. जा.*] राव सेनापति साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक सदासिवराव श्रीपत कृतानेक आसिर्वाद विनंती ऐसी जे येथील कुशल ताा वैशाख वद्य ७ सप्तमी मुकाम शहर बुऱ्हाणपूर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा जाली पाहिजे विशेष तानाजी कालोखा व नंदराम यासमागमे पत्रे पाठविली आहेत त्यात इकडील मजकूर सविस्तर लिहिलाच आहे व आपण इकडे यावयाचा उद्योग करावा तेथे आरण्यात राहून दुरलौ[कि*]क मात्र वरकड आर्थ तूर्त काहीच साध्य होत नाही इकडे यावयाचा उद्योग आसलियास लिहावे येथेही बोलणी करून लिहितो अथवा बोलणी करून मीच येतो ऐसे लिहिले आहे त्या उतराची वाट पाहत पारोलियात होतो परंतु लस्करे बाहीर सहरापासून निघाली खासाही दोन मजली गेले भोसलेही नागपुराहून निघाले उभयेता होलकर यास आनकूल होऊन जलवासी याचा उपमर्द करावा राज्यातील मातबर सरदार तितके येकत्र जाहाले नामी सरदार या मस[ल*]तीत आव्हे तेव्हा आपणही आनकूल व्हावे हे स्लाघ्य आहे आपण राज्य संरक्षण करण्याचा अधिकारी हा पूर्वीपासून विशये आहे आन्यत्र राज्याचा आपकर्श करू लागलियास करू देऊ नये त्यास आनकूल होऊ नये सांप्रदाय आहे त्या सिलसिल्यास इकडे यावयाचा बेत करावा याच्या पोटात मनोदये आहेत ते श्रीशंभूवरद राज्य आहे तोच सिधीस नेईल कुटुबसुधा आले पाहिजे याजकरितां सत्पश्रृंगनिवासिनीच्या दर्शनाचा उद्योग करून मातुश्री बाईसाहेब व सौावती राधाबाईसाहेब व बापूसाहेब यासमागमे कोणी शाहाणा माणूस देऊन पुढे रवाना करावी मागाहून खासा स्वारीही यावी नासिक सत्पश्रृंग या रोखे स्वारी आलीचे वर्तमान आल्यास येयूनही सरंजा[म*] येईल सर्वास पुढे रवाना करून आपण मागून यावे हे मर्जीस न आलियास समागमेच यावे परंतु आहा ते स्थली राहावे हे ठीक नाही सर्व सरदार एकत्र जाले आहेत या फौजेत सामील व्हावयाचो मर्जी नसलियासी खानदेश बागलाण प्रांती आपले माहाल ठाणी आहेत कोठेही राहून दोनी संधाने रक्षून मसलतीचा परिणाम होये तोवर दिवस काढावे हे मसलतीस युक्त आहे सारांश कुटुबसुधा तेथे राहावे हे माझे बुधीस येत नाही इकडे यावयाचे करून पत्रें इकडे पाा मातुश्री बाईसाहेब सितोले याणीही आपल्यास लिहिले आहे दरबारीही बोलणी केली आहेतच व पुढेही नित्यशा करीत आहेत यास केवल सुचवावे आण करावे हा आर्थ नाही आपणापेक्षा बाईच्या चित्तात या दौलतीचा जिर्णोधार होऊन पूर्ववतप्रो व्हावी हे मानस बहुत आहे प्रसगानरूप

पर्यायेकरून घडेल त्या प्रेत्नास आलस होत नाही पुढेही व्हावयाचा नाही बहुत काये लिहू हे विनंती

---

२१ जमादिलावल १० } ९० श्रीगजानन { श. इ.

आज्ञाधारक माहादाजी चिमणाजी कृतानेक विज्ञापना येथील कुशल ता छ १० जावलपर्यंत सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीकडील आज्ञापत्र आले ते पावले पत्री आज्ञा की श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडील जरीपटका व लगी व आफतागीर याचे जुने सामानाचा सांप्रदाय कसा आहे तो शोध समजोन ल्याहावा व तोफखाना वगैरे कारखान्याचे पूजेचे सांप्रदाये कसे आहेत त्याचा जाबता पाहून ल्याहावा त्याजवरून येथील दरबारचे दरोगे दरकदार यास पुसून येथील चालीचा शोध समजला तो लिा आहे

जरीपटका हुजूरपागेकडे असतो त्यास दसरा व वर्षप्रतिपदा दोन वेल पटका नवा चढतो जुना पटका पागेकडील सरनोबत आहेत ते घेतात याप्रो येथे चाल आहे आपल्या दरबारचा पूर्वीपासून सांप्रदाय चाल असेल त्याचा शोध जालाच असेल १

जरीपटके सालास दोन चढतात त्यास येक सरनोबतास देऊन येक सिलकेस पागा मारी जामदारखान्यात लिटता ठेवितात याचे कारण समयास प्रयोजन लागल्यास प्रसंगास उपयोगी असावा याजकरिता ठेवितात परंतु तोही सरनोबतासच देतात याप्रो चाल आहे १

भगवे निशाण पटक्याचे पागेकडील जामदारखान्यात सिलकेस राहते सरकारचे कारखान्यास चिलखतास वगैरे खर्च होते कोणास द्यावयाची चाल नाही १

आफतागिराचे सामान जुने आफतागीर धरणार आहे त्यास द्यावयाची चाल आहे तोच घेतो दुसरेकडे नाही १

लगीही दसरा व वर्षप्रतिपदा दोनवेल नवी होते त्यास जुनी लगी खास जिलीबीचे कारखान्याचा नाईक आहे त्यास देतात येथे तानाजी पडवल हुजरे आहे तो घेतो तो आपलेकडून लगी वागविणारास देईल तर घ्यावे वरकड त्याजकडे काही नाही नाईकच लगी घेतो याप्रो चाल आहे १

सदरहू लिाआन्वये येथील चाल आहे तोफखान्याचे दरकदारास व वरकड कारखान्याचे कारखानदारास पुसून मागाहून ताा लिहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

९१

२२ जमादिलावल ११ } हु पौा छ १४ जमादिलावल { श. इ.

अजम वामनाजीपंत सुभेदार प्रां वसई अफियेत बासद

मोहबत व मवदत पन्हा खुलत मवालात दस्तगाहा अजिदिल येखलास दुवाइत फरांक देवोडत गोवर्नदोर कोट दवण बादज दुवा अंकी येथील खैर अफियेत जाणून आपली खैरखुसी हमेशा कलमे करीत गेले पाहिजे दिगर इजतमाब त्रिंबक शंकर कारकून याजबराबर खत इरसाल केले ते नेक समई परसूल होऊन लिहिला मजमू अया जाहाला प्रा नगरहवेली दरोबस्त जकात व चावढी सुधा दौलतपन्हा श्रीमंताचे सरकारातून हज[रतप]न्हा बाछासाहेब याचे सरकार इस्तादीकडेस दिल्हा त्यापासोन प्रा मारचे अमलाची वहिवाट चालत आली आहे त्याजमधे नवीन जाहाले नाही व अथपर होत नाही हे मोहिबास इंजानेबाकडोन लिहिले होते त्यामधे तफावत नाही अमला[ची वहि]वाट पुरातनपासून चालत आहे तीच चालेल इंजानेबाकडून कमपेस होणार नाही ही खातरजमा असो द्यावी बाजद मोहबतपन्हाकडोन घटकेघटकेस चावढीबावत येकुणीस हजाराचा जाबसाल लिहिता तो ठीक नाही ज्या दिवसी श्रीमंताचे दरबारच्या सनदा होऊन प्रा जकात व चावढी यैसे सरकार इस्तादीकडेस दिल्हे त्या दिवसी दोलतपन्हा आपण स्वता धनी त्याही बाछासाहेब यांचे येखलाशीअनवये जे करावयाचे ते विचारोनच केले असेल कोणाचे खोटे खरे यैकोन केले नसेल व धन्याच्या सनदाही खातरजमा होऊन प्रा मारचे अमलाकडेस जे मामलेदार होते त्याही सदरहू सनदा मान्य करून अमल इस्तादीकडेस स्वा[धी]न केला इजानेबाकडोन उगाच [मो. जा.*] घेतला नाही वरकड आपण जाबसाल लिहिला त्याची परवानगी हशामतपन्हा कपितान जनराल गोवेकर त्याजकडेस लिहून पाठवो तेथोन पुणियास दोलतपन्हाचे दरबारी जाबसाल लिहितील त्याचा काये बंदोबस्त होणार तो होऊन हश[मतप]न्हाकडोन आज्ञा येईल त्याप्रो इंजानेबाकडून उतर करावयास येईल आपण प्रा मारी जफती बसवावयाची लिहिता हे दोस्तीदरम्यान लाजम नसे सरकारचे जाबसाल हरदू दरबारी धन्याकडोन जाबसाल होणा तो होईल हमेशां दोस्तीचे जागा इजानेबासांरिखे कामकाज लिहून खुसवत्खी हासल करीत जावे रा छ ११ जावल ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत

पत्रांवरील टीपा

(१) इ. १९७६ च्या मे महिन्यात मी वाईस गेलो असता तेथील सुप्रसिद्ध नागरिक श्रीमती अन्नपूर्णाबाई कृष्णराव उपाख्य माईसाहेब (गोशाळा) रास्ते यांजकडे संशोधनार्थ जाण्याचा योग आला. कित्येक वर्षांपूर्वी माझे अनदी जवळचे एक सहकारी कै.शं.ना जोशी हे त्यांजकडे गेले होते. त्या वेळी त्यांनी तेथून आणलेली दशावतारादि काही जुनी चित्रे भारत इतिहास संशोधक मंडळात प्रदान म्हणून दाखल आहेत. पण काय झाले कुणास ठाऊक. त्यांनी श्री. माईसाहेब यांजकडे असलेले जुने कागदपत्र मंडळाकडे आणल्याचे दिसत नाही. मी त्यांजकडे गेलो असता त्यांनी मला त्यांजकडे असलेल्या जुन्या हस्तलिखित व छापील पोथ्या, पत्रव्यवहाराचे कागद, तसेच हिशेबी कागद दाखविले. त्यांपैकी पोथ्या व पत्रव्यवहाराचे कागद त्यांनी भा. इ. सं. मंडळास तात्काल देऊन टाकले आणि हिशेबी कागद इ. १९७७ मध्ये दिले.

(२) मी रास्त्यांकडून पत्रव्यवहाराचे म्हणून सुमारे आठशे कागद आणले. त्यांतून विशेष श्रम न करता ऐतिहासिक महत्त्वाचे आढळलेले सुमारे सत्तर कागद मी निवडून काढले. नेहमीप्रमाणे हे कागद इतिहासदृष्टचा महत्त्वाचे आम्हास वाटत असले तरी तत्कालीन लेखकांना ते महत्त्वाचे वाटत नसल्याने त्यावर कालांचा संपूर्ण तपशील दिलेला नाही. तसेच पोच तारखाही घातलेल्या नाहीत. यामुळे त्यांवर पहिला संस्कार करावा लागला तो कालनिश्चयाचा. या कागदांतील बहुसंख्य पत्रे भिकाजी नाईक उपाख्य आप्पा यास त्याचा थोरला मुलगा मल्हारराव याने लिहिलेली आहेत. भिकाजी नाईक इ. १७६८ व मल्हारराव इ. १७६५ मध्ये वारले अशी आजची समजूत आहे. यामुळे मल्हाररावाने भिकाजी-नाईकास पाठविलेल्या पत्रांचा काल इ. १७६५ पूर्वीचा आहे असे सध्या धरले आहे. भिकाजी नाईक व त्याचे सात मुलगे यांच्या निश्चयात्मक मृत्युतिथी समजल्या तर या पत्रांचे काल ठरविणे सोपे जाईल. भिकाजी नाईकाच्या सात मुलांपैकी प्रत्येकास दादा, नाना, बाबा, भाऊ इत्यादींपैकी एखादे टोपण नाव होते. कोणास कोणते टोपण नाव होते हे समजले तरीही या पत्रांचे काल ठरवि-ण्यास मोठी मदत होईल. याबाबत माझ्या लक्षात आले आहे ते असे– आप्पा= भिकाजी, तात्या=सदाशिव, नाना=गंगाधर, बाबा=रामचंद्र, दादा, आण्णा, भाऊ, नाना, हे मल्हारीहून लहान. चिरंजीव, तीर्थरूप, तीर्थस्वरूप हे शब्दही अल्पसे साह्य करतील. असो. मी निवडलेल्या सुमारे सत्तर पत्रांपैकी निम्मी पानिपत पूर्वकालीन असून बाकीची पानिपतोत्तर आहेत. पानिपतपूर्वकालीन पत्रे मुख्यतः सावनूरची स्वारी, अहमदनगरचा वेढा, सिंदखेडची स्वारी आणि पानिपत या प्रसंगांची असून पानिपतोत्तर पत्रे मुख्यतः थोरल्या माधवरावाच्या कारकिर्दीत

झालेली राक्षसभुवनची लढाई व कर्नाटकातील स्वाऱ्या यांसंबंधी आहेत. ही सर्व पत्रे ज्यांनी त्या प्रसंगात प्रत्यक्ष भाग घेतला त्यांनीच लिहिली असल्यामुळे पुराव्याच्या दृष्टीने ऐतिहासिक लेखसंग्रहातील पत्रांइतकीच किंवा त्याहूनही काकणभर अधिक महत्त्वाची आहेत. पण ही संख्येने फार थोडी आहेत हेच इतिहासाभ्यासकांचे दुर्दैव आहे.

(३) येथे रास्ते (यांचे मूळ आडनाव गोखले) व सामान्यतः कोकणस्थ यांविषयी चार शब्द लिहिणे अस्थानी होणार नाही. भा. इ. सं. मंडळाचे ' सप्तम संमेलनवृत्त ' या पुस्तकात 'फार जुनी मोडी पत्रे' या मथळ्याखाली म. म. पोतदार यांनी काही पत्रे वाचून छापिली आणि त्यांचेच सुधारलेले वाचन कै. पां मा चांदोरकर यांनी त्याच पुस्तकात दिले आहे. त्यांतील पहिली दोन पत्रे इ. १४८८-८९ मधील आहेत. त्या पत्रांत वतनाची खरेदी-विक्री केल्याची हकीकत आहे. यात केसभट बिन वीसभट गोखले वेळणेश्वरकर व म्हैसळ्याचे जोशी आणि इतर तिघे बहुधा गोखले यांनी केस जोशी गोखले याजकडून जोसकी, उपाध्येपण व धर्माधिकारीपण अठ्ठावीसशे लाऱ्या देऊन विकत घेतल्याचे सांगितले आहे. तेव्हा असे दिसते की, केसभट बिन वीसभट गोखले हे म्हैसळ्याचे जोशी तर होतेच; पण त्यांनी आणखी काही वतने विकत घेतली. याच केसभट बिन वीसभट गोखल्याला वेळणेश्वरकर म्हणून म्हटले आहे. याचा अर्थ कोकणामध्ये वेळणेश्वर गोखल्यांची वस्ती जवळ जवळ ५०० वर्षांपूर्वीपासून होती. कोकणस्थांचे कोकणातील सतराव्या शतकातील उल्लेख पुष्कळ मिळतात. पण गोखल्यांविषयीचा हा उल्लेख मला आज तरी सर्वांत प्राचीन वाटतो. वेळणेश्वरचे गोखले देशावर आल्यावर रास्ते बनले की कोकणात असताच हा प्रश्न आहे. वाईच्या इ. १७०६ च्या एका कागदात हरबा रास्ता असे नाव आले आहे. वाईकर खरे कोकणातच गोखले वेळणेश्वरला असता त्यांचे उपाध्ये असावे. वेळणेश्वरचे गोखले देशावर आले तेव्हा आपल्याबरोबर आपले उपाध्ये खरे यांनाही देशावर घेऊन आले. तेव्हा कोकणातील खऱ्यांची वस्तीही गोखल्यांइतकीच प्राचीन असण्याचा संभव आहे. वाईचे बहुतेक खरे आजही रास्त्यांचे उपाध्ये आहेत. या पत्रांसारखीच आणखी फार जुनी पत्रे कोकणात मिळाल्यास कोकणातील कोकणस्थांच्या वास्तव्याविषयी काही अधिक प्रकाश पडू शकेल. ही पत्रे कोकणामध्ये नेमकी कोणापाशी मिळाली हे म. म. पोतदार व कै. चांदोरकर दोघेही सांगू शकले नाहीत. ही ठाण्याचे वकील अप्पासाहेब भट यांजकडून कै. वि. ल. भावे यांजकरवी म. म. पोतदारांस मिळाली येवढेच नमूद आहे. पण ज्या अर्थी या पत्रांत परगणे श्रीवर्धन, मामले तळे, तपे म्हैसळे व त्यात समाविष्ट असणाऱ्या पाच पंचवीस गावांचे निर्देश आले आहेत, तेव्हा ही पत्रे कुलाबा जिल्ह्याच्या मध्य व दक्षिण भागांतून मिळाली असली

पाहिजेत. त्या भागात किंवा रत्नागिरी जिल्ह्यात शोध केल्यास अशा प्रकारची आणखीही पत्रे मिळण्याचा संभव नाकारता येत नाही. मात्र पद्धतशीर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(४) या घराण्यातील पुरुष कोकणातून देशावर नेमके केव्हा आले ते समजत नाही. तसेच ते प्रथम सातान्यास आले की वाईस याचाही निश्चय नाही. गोखले व वैद्य (लावगनकर) ही दोन्ही घराणी प्रथम सातान्यास व नंतर वाईस आली अशी कल्पना केली आहे. पण देशावर आल्यानंतर त्यांनी वाई येथे कोकणा-प्रमाणे सावकारीचा धंदा सुरू केला. नारबा व हरबा नाईक आणि भिकाजी व सदाशिव अशा आपल्या दोन मुलांसह शामजी नाईक असे तिघे बंधू देशावर आल्याचे दिसते. पैकी भिकाजी नाईक यास सात मुलगे व दोन मुली होत्या. त्यांची नावे आजच्या समजुतीप्रमाणे वयाच्या उतरत्या क्रमाने अशी : १. गोपिका २. मल्हारी, ३. आनंद, ४. गणपती, ५. लक्ष्मण, ६. गंगाधर, ७. रामचंद्र, ८. जीवन ९. सगुणा. यांपैकी एका मुलीचे म्हणजे गोपिकाबाईचे लग्न तिसरे पेशवे बाळाजी बाजीराव उपाख्य नानासाहेब याशी झाले होते. आणि धाकटी मुलगी पुढे अक्कलकोटकर भोसल्यांचे दिवाण झालेले गाडगीळ यांजकडे दिली होती. गाडगीळही वाईस आरंभी सावकारीच करीत.

(५) रास्त्यांना जात व फौजेचा एकंदर सरंजाम किती होता ? तो सुमारे पंधरा लाख रुपयांचा असावा असे पुढे दिलेल्या पत्रांवरून वाटते. हा सरंजाम महाराष्ट्र, कर्नाटक व गुजरात या तीन प्रदेशांत होता. हा सरंजाम मुख्यतः भिकाजी नाईक रास्ते यांच्या सात मुलांत जवळजवळ प्रथमपासूनच वाटला होता. इंग्रजी अमलात फौजेचा सरंजाम सामान्यतः जप्त होऊन जात सरंजाम मात्र चालू राहिला. तसेच रास्ते मंडळींनी वाईस व इतरत्र जी धर्मकृत्ये केली त्यासाठी दिलेली इनामे चालू राहिली. कालक्रमाने यांतीलही काही उत्पन्ने आता गेली आहेत.

(६) भिकाजी नाईक, त्याचे पुत्रपौत्र व भाऊबंद यांनी वाईत केलेल्या सांस्कृतिक कामगिरीचे थोडेसे वर्णन करणे आवश्यक आहे. वाईची शिवकालीन वस्ती ब्राह्मणशाई, रामडोह, भीमकुंड, रविवार इत्यादि पूर्वेकडील भागात होती ब्राह्मणशाईच्या पश्चिमेस शक्कर बिबीचा बाग, मुसलमानांचे स्मशान, ईदगाह (आताचा निमजगा) व शेतजमीन होती. ही सर्व जमीन भिकाजी नाईकाने विकत घेऊन तेथे नव्याने वस्ती केली. त्या वस्तीच्या गंगापुरी, मधली आळी, गणपति आळी अशा क्रमाने त्याने पेठा बसविल्या. स्मशानाची जागा व शक्कर बिबीचा बाग साफसूफ करून व तीवर घरे बांधून ती वर्षासनांसह ब्राह्मणांना दान केली. अशा तन्हेने वाईच्या अर्ध्या वसाहतीचे किंवा विस्ताराचे श्रेय रास्त्यांकडे जाते. त्यांना

आणखी एका गोष्टीचेही श्रेय दिले पाहिजे. त्यांनी वाईतील बहुतेक सर्व घाट आपल्याच पैशाने बांधले. एवढेच नव्हे तर उमामहेश्वर, गंगारामेश्वर, काशी-विश्वेश्वर, ढोल्या गणपति, विष्णू, लक्ष्मी यांची देवळेही उभारून त्या देवळांच्या व निरनिराळ्या घाटावरील कृष्णाबाईच्या उत्सवांचीही व्यवस्था लावून दिली. ती व्यवस्था पुण्याअधिक प्रमाणात अजूनही चालू आहे. याशिवाय खांबटकीचा घाट प्रथम त्यांनी फोडून वाई-पुणे रस्त्याचा पाया घातला. खेरीज वाईच्या उत्तरेस व दक्षिणेस कित्येक धर्मआंब्यांची झाडे चाविली ती निराळीच. यासाठी पन्नास लाख रुपये खर्च सहज आला असेल.

(७) ज्यांनी एवढी मोठी धर्मकृत्ये तत्कालीन समजुतीप्रमाणे परलोकसाधनार्थ केली त्यांच्या सावकारीचा व्याप केवढा मोठा असेल हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. तेव्हा त्यांनी स्वतःसाठी गंगापुरी, गणपतिआळी व धर्मपुरी यांत तीन लहानमोठे वाडे बांधले असल्यास व मोतीबागेत एक सुंदर आरामगृह तयार केले असल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. त्यांची पहिली वस्ती गंगापुरीत झाली. तेथे सुरक्षिततेसाठी त्यांनी चारही दिशांस वेशी बांधून तो भाग बंदिस्त केला होता. त्यांपैकी काही वेशी अजून शिल्लक आहेत आणि काही वेशी सुमारे ५० वर्षांपूर्वी सुस्थितीत असताना वाईच्या नगरपालिकेने रस्तारुंदीसाठी त्या पाडून टाकल्या. सुस्थितीत असलेल्या वेशी पाहिल्या म्हणजे रास्त्यांनी या नवीन वसाहतीच्या सुरक्षिततेसाठी किती अमाप पैसा खर्च केला हे सहज लक्षात येते. वाईचे शेती उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी असाच एक प्रयत्न केला असावा. वाईच्या उत्तरेस किवरा नावाचा ओढा आहे. त्याचे जुने नाव कीचकविहिरा. त्याला बारा मास पुष्कळ पाणी होते. त्याला बऱ्याच उंचीवर एकाखाली एक धरणे बांधून त्याच्या उजव्याडाव्या बाजूने दोन मोठे पाट काढले. वाईची निदान अर्धी बागायती या दोन पाटांवर समृद्ध बनली आहे. त्यास चौडया पाट म्हणतात. त्यांच्या या कृत्यासाठी लाख दोन लाख रुपये खर्च सहज आला असेल.

(८) वाईच्या रास्त्यांनी तेथे केलेल्या सांस्कृतिक व आर्थिक समृद्धीच्या प्रयत्नांविषयी वर थोडक्यात सांगितले. त्यांची सरदारकीची परंपरा पटवर्धनांप्रमाणे पुष्कळ वर्षे चाललेली किंवा विस्तार पावलेली दिसत नाही. तथापि वाई-प्रमाणेच कर्नाटकात पटवर्धनी सरंजामाच्या पूर्व सीमेवर रास्त्यांना सरंजाम मिळालेला होता. त्या सरंजामाची व्यवस्था पाहाण्यासाठी रास्त्यांनी वाईकडील अनेक कुटुंबे त्या बाजूस नेली. ती अजूनही विजापूर जिल्ह्यातील बागलकोट, जालीहाळ, तालीकोट इत्यादी भागांत वस्ती करून आहेत. असे दिसते की, पटवर्धनांना नाणी पाडण्याचा हक्क मिळाल्यामुळे ज्याप्रमाणे त्यांनी मिरज, चिक्कोडी, हुकेरी इत्यादी ठिकाणी स्वतःची नाणी पाडली त्याप्रमाणे रास्त्यांनीही नाणी पाडण्याचा हक्क

मिळवून बागलकोट, वाई इत्यादी ठिकाणी नाणी पाडली. पटवर्धनांनी मिरजेस पाडलेले रुपये आता अत्यंत दुर्मिळ झाले आहेत. तसेच चिक्कोडी, हुकेरी रुपये नेमके कोणते हे समजत नाही. पण रास्त्यांचे बागलकोटी [नाण्यांवर व कागदात याचे नाव बागदकोत किंवा बागडकोट असे येते] रुपये आजही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यांना त्यांवर असलेल्या अंकुशाच्या आकृतीवरून अंकुशी रुपये असे आम्ही म्हणतो.

(९) त्यांची जरुरीपुरती वंशावळ संक्षेपाने खाली दिली आहे–

१. गंगाधर		२५. धोंडबा	(१३ चा मुलगा)
२. गणोबा	(१ चा मुलगा)	२६. सीताबाई	(१३ ची मुलगी)
३. विठ्ठल	(२ चा मुलगा)	२७. काशीबाई	(,, ,,)
४. हरबा	(३ चा मुलगा)	२८. विनायक	(१५ चा मुलगा)
५. नारबा	(,, ,,)	२९. खंडेराव	(,, ,,)
६. शामजी	(,, ,,)	३०. काशीराव	(१८ चा मुलगा)
७. विठोबा	(४ चा मुलगा)	३१. यशवंत	(,, ,,)
८. धोंडबा	(,, ,,)	३२. माधव	(,, ,,)
९. कृष्णाजी	(,, ,,)	३३. महिपती	(१९ चा मुलगा)
१०. भिकाजी	(६ चा मुलगा)	३४. माधवराव	(१९ चा दत्तक मुलगा)
११. सदाशिव	(,, ,,)	३५. कन्या	(१९ ची मुलगी)
१२. महादोबा	(७ चा मुलगा)	३६. शामराव	(२० चा दत्तक मुलगा)
१३. वासुदेव	(८ चा मुलगा)	३७. व्यंकटराव	(२१ चा मुलगा)
१४. येसाजी	(,, ,,)	३८ विश्वासराव	(,, ,,)
१५. नीलकंठ	(,, ,,)	३९. अमृतराव	(२२ चा मुलगा)
१६. गोपिकाबाई	(१० ची मुलगी)	४०. वासुदेव	(२५ चा दत्तक मुलगा)
१७. मल्हारराव	(१० चा मुलगा)	४१. कृष्णराव	(२८ चा मुलगा)
१८. गणपतराव	(,, ,,)	४२. गोपाळ	(२९ चा मुलगा)
१९. आनंदराव	(,, ,,)	४३. विश्वास	(,, ,,)
२०. लक्ष्मणराव	(,, ,,)	४४. मल्हारराव	(३० चा मुलगा)
२१. गंगाधरराव	(,, ,,)	४५. गणपतराव	(३१ चा मुलगा)
२२. जीवनराव	(,, ,,)	४६. बळवंत	(३४ चा मुलगा)
२३. रामचंद्रराव	(,, ,,)	४७. गंगाधर	(,, ,,)
२४. सगुणाबाई	(१० ची मुलगी)	४८. यशवंत	(,, ,,)

१

या पत्रात 'सालगुदस्त, सु॥ सन खमसैन रजब व ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशी' असे तीन कालोल्लेख आहेत. पैकी पहिल्या उल्लेखावरून हे पत्र इहिदे खमसैना (११५१) मध्ये (इ. १७५०–५१) घातले पाहिजे हे उघड आहे. तसेच हे पत्र रजब महिन्यात लिहिले असून त्यात 'ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशीस सुरंजेस पावलो' असे लेखक म्हणतो. त्यावरून हे पत्र ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशीनंतर घालावे लागेल. या वर्षी रजब व ज्येष्ठ हे एकमेकांशी जुळते आहेत तेव्हा याची अधिकात अधिक उशिराची तारीख इ. स. १७५० जून २४ ही येते.

नारो शंकर राजेबहादरचा भाऊ लक्ष्मण शंकर याजकडे माळव्यातील ताल-उनारसी हा परगणा सरंजामास दिलेला होता. तो त्याजकडून दूर करून मल्हार-राव रास्ते यास सरंजामास दिला. रास्त्यांचा तेथील कमाविसदार लक्ष्मण काशी हा सदर परगण्याची चतु:सीमा, ग्रामसंख्या, लोकवस्ती, पाण्याची सोय, यार मुहम्मद खान (बाजीराव व बाळाजी बाजीराव यांचा समकालीन रोहिला सरदार) याने बांधलेली गढी इत्यादी माहिती रास्त्यांना कळवीत आहे. लक्ष्मण शंकर याची सदर परगण्यातून येणे असलेली बाकी वसूल करण्यासाठी त्याच्या कमाविसदाराने परगण्यातील पाटील मंडळींना कैदेत टाकले होते. त्यामुळे परगण्याची लावणी बंद पडली. तेव्हा होणारे नुकसान टाळण्यासाठी रास्त्यांच्या कमाविसदाराने त्या बाकीची हमी घेतली असून तो लावणी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

२

या पत्रात 'श्रीमंत करनाटकात जाणार, सप्तरूसीकडील पूर्वस्थिती आहे त्याप्रमाणेच आहे व फालगुन शुद्ध पंचमी मंगळवार' असे कालदर्शक उल्लेख आहेत. फाल्गून शुद्ध पंचमी, मंगळवार हा योग इ. १७५१ मध्ये येतो. यावरून हे पत्र इ. १७५१ मध्ये घातले पाहिजे. मितीचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळे पत्राचा काल निश्चित केला आहे. नासिरजंगास मारून औरंगाबादेकडे येऊ लागलेल्या सलाबत-जंगाच्या मुकाबल्यास बाबापे निघाला असून बेदरजवळ त्याचा मुक्काम आहे. दमाजी गायकवाड व बाबापे यांचा समझोता झाल्यामुळे सातारची राजकीय परिस्थिती आहे तशीच असल्याचे सांगितले आहे.

बाबापे व गोपिकाबाई यांच्या आग्रहावरून पुंडलीकनाईक रास्ते (फाटक) याचे लग्न कृष्णाजीनाईक (बाजूजीनाईक बारामतीकराचा चुलता) याच्या मुलीशी वाई येथे झाल्याचे मल्हारराव रास्ते आप्पास (भिकाजीनाईक रास्ते यास) कळवीत आहे. आप्पा त्रिस्थळी यात्रेस गेला असून त्याने कार्तिक मासात परत यावे अशी विनंती त्यास केली आहे.

३

या पत्रात 'दाभाडे यांचे तलेगावी जप्ती आली. पुण्याभोवते गाव दाभाड्याचे फौजेने जाळले, पुण्याची अवस्था काय होईल पहावे' असे कालदर्शक उल्लेख आहेत. दमाजी गायकवाड याने मार्च १७५१ मध्ये पुण्यावर स्वारी केली त्या वेळी त्याचे धनी सेनापती दाभाडे हे त्या स्वारीत आहेत. दाभाडे यांच्या सरंजामाची जप्ती त्याच वेळी पेशव्याने केली आहे (रा २।१२९). यावरून या पत्राचे वर्ष इ. १७५१ ठरविले असून पत्रात मितीचा उल्लेख असल्यामुळे त्याचा काल निश्चित केला आहे.

दंग्याची परिस्थिती असल्याने सर्व (मुलेमाणसे व मालमालियत) पांडव गडावर पाठवून वाईत सडे होऊन रहावे अशी सूचना पत्रलेखक रास्त्यांना देत आहे.

४

मूळ पत्रात संपूर्ण तारीख दिलेली आहे. रास्त्यांकडून पेशवे सरकारात घ्यावयाच्या कर्जाच्या रकमेपैकी हिणकस रुपये परत करून बाकीच्या रकमेची पोहोच या पत्राने त्रिंबकराव विश्वनाथ (पेठे) रास्त्यांना देत आहे.

५

या पत्रात 'मोगलाचे श्रीमंतांचे युद्ध जाले, वाईत चौक्या बसऊन बंदोबस्त करणे व मार्गशीर्ष शुद्ध,' असे तीन कालदर्शक उल्लेख आहेत. इ. १७५२ मध्ये सेनापति व गायकवाड यांच्याशी समझोता करून बाबापेने सलाबतजंगास भालकी येथे गाठले. तेव्हा झालेले युद्ध म्हणजेच मुघल–श्रीमंत युद्ध असे धरून तदनुसार या पत्राचा काल ठरविला आहे. त्या वेळची अस्थिर परिस्थिती ही वाईचा बंदोबस्त करण्यास कारण झालेली दिसते.

६

या पत्रात 'पो॥ (पौष) बहुल प्रतिपदा रविवार' असा कालाचा उल्लेख आहे. याशिवाय श्रीमंत उदईक थेवरास जाणार तेथून कुरकुंबास जाणार व तेथून वडुथास येणार असे सांगितलें आहे. पौष वद्य १ रविवार हा योग इ. १७५१ व इ. १७५६ या दोन वर्षांत येतो. पैकी इ. १७५१ वर्ष धरले तर या कालाला अनुरूप अशी इंग्रजी तारीख २२–१२–१७५१ येते. या वेळी बाळाजी बाजीराव (बाबापे) कुकडीच्या लढाईत गुंतला असून त्याचा मुकाम मांडवगण नजीक कान-गाव याच्या आसपास आहे. आणि येथे श्रीमंत उद्या थेवरास जाणार असे लिहिले

आहे. तेव्हा इ. १७५१ हे साल येथे बसू शकत नाही. आता या पत्राचे इ. १७५६ साल धरले तर त्या दिवशी बाळाजी बाजीराव रोजनिशी भाग २।२५६ प्रमाणे त्याचा मुक्काम लक्ष्मेश्वर परगण्यातील आकेगुंद गाव असा दिला आहे. आणि या पत्रात तर या दिवशी बाबापे पुण्याहून थेवराकडे जात आहे असे नमूद आहे. तेव्हा या पत्राला या दोन्ही तारखा जुळत नाहीत. हे पत्र भाऊस उद्देशून लिहिलें आहे. येथे भाऊ म्हणजे आनंदराव भिकाजी रास्ते आहे.

७-१०

या चारही पत्रांत सामान्यत: एकच विषय आहे. चारही पत्रे भिकाजीनाईक रास्त्यास पाठविलेली आहेत. यापैकी ७,९ व १० यांत लखमोजीराव खानविलकर यास दोनशे माणसांसह नारायणराव (बहुधा बाबापेचा पुत्र) याच्या संरक्षणासाठी वाईस पाठविल्याचे लिहिलें आहे. त्यानंतर आणखी शंभर माणसे पाठविली आहेत. या लोकांच्या रोजच्या पोटगीसंबंधी या चारही पत्रात चर्चा आहे. यावेळी नानासाहेब पेशवा स्वारीत आहे. ही इ. १७५६ मधील सावनूरची स्वारी असावी. या वर्षी पौष व रबिलाखर हे एकत्र येतात. हे लक्षात घेऊन यांच्या तारखा ठरविल्या आहेत. पत्र क्र. ८ व ९ यांत काल नाहीत. परंतु विषय एकच असल्यामुळे ती श. १६७७ (इ. १७५५) च्या पौष महिन्यातील असावीत.

११

या पत्रात 'माघ वद्य १४ रविवार व सावनूरकर मोगल, मुरारजी (घोरपडे) व मुजफ्फरजंग (गाडदी) हे सावनूरच्या आश्रयाने भांडत आहेत' असे दोन कालदर्शक उल्लेख आहेत. इ. १७५६ मार्चमध्ये निजाम व मुरारजी यासह सावनूरकराशी पेशव्याचे युद्ध झाले. त्यावरून हे पत्र इ. १७५६ मध्ये घातले. पत्रात मिती व वार आहे तो योग इ. १७५६ मध्ये येतो.

सावनूरकरास मराठ्यांनी वेढले आहे. सावनूरकडे पेशव्याच्या मदतीस येणारा सलाबतजंग हा आपल्याच मदतीस येत आहे असे समजून सावनूरकर दम धरून आहेत असे पत्रलेखक आप्पास कळवीत आहे.

१२

या पत्रात 'फाल्गून वद्य १० व सावनूरचे युद्ध' असे कालदर्शक उल्लेख आहेत. पत्र क्र. ११ च्या मितीवरून काल निश्चित केला आहे. सावनूरच्या लढाईचे वर्णन व सलाबतजंग येत असल्याचा मजकूर मल्हारराव (रास्ते) आप्पास कळवीत आहे.

१३

पत्रात संपूर्ण काल आहे. हे पत्र म्हणजे सावनूरकरांकडून घेतलेल्या प्रदेशातील बागलकोट परगणा पेशव्याने मल्हारराव रास्त्यास कमाविसीने दिल्याची सनद आहे.

१४

या पत्रात ' मार्गशीर्ष वद्य ६ मंदवार आणि विश्वासराव व मोगल यांच्या भेटी परवा झाल्या ' असे दोन कालोल्लेख आहेत. सिंदखेडची लढाई इ. १७५७ अखेरीस झाली. पत्रात दिलेला कालाचा योग यावर्षी जमतो. यामुळे या पत्राचा काल निश्चित होतो.

या लढाईच्या प्रसंगी मोगलास (निजामअलीस) मदत करण्यासाठी बुसी हैद्राबादेहून निघाल्याची बातमी आल्यामुळे मराठ्यांनी तह केला. मराठ्यांचे सैन्य बरेच जमा झाले होते. त्यांपैकी काही गुजरातेत व काही कर्नाटकात पाठविण्याचा पेशव्याचा बेत आहे.

१५

सिंदखेडच्या लढाईचा पत्रातील आशय व दिलेल्या कालाचा योग यावरून काल निश्चित केला आहे.

सिंदखेडच्या लढाईनंतर बाबापे व निजामअली यांच्या भेटी होऊन तह पक्का झाला. परंतु तत्संबद्ध सनदास सलाबतजंगाची मान्यता येईपर्यंत मराठ्यांचे सैन्य तेथेच थांबले. निजामअलीने स्वतःच्या अधिकाराबाहेर जाऊन केलेला तह बुसीस मान्य नसल्याने त्याला व मराठ्यांना बुसीची भीती वाटत असल्याचे मल्हारराव रास्ते आप्पास कळवीत आहे.

१६

पत्राचा आरंभ गेल्याने ते कोणी कोणास लिहिले हे निश्चित नाही. पण बहुधा ते मल्हारराव रास्त्याने आप्पास लिहिले असावे. या पत्रात ' दहा दिवसांपूर्वी सोमवारी (पेशवे व मोगल) यांच्या भेटी झाल्याबद्दल गोपाळरावा (पटवर्धना) चे पत्र काल आले, ' असा कालदर्शक उल्लेख आहे. पत्र क्र. १५ चा काल मार्गशीर्ष वद्य ३० सोमवार असून त्यात बाबापे व निजामअली यांच्या भेटीचा उल्लेख आहे. त्यानंतर अकरावे दिवशी हे पत्र लिहिले असे धरून दिवस निश्चित केला

. पटवर्धन व रास्ते यांची पथके कर्नाटकात आणि विश्वासरावाबरोवर त्यांना गुजरातेत पाठविण्याचे ठरत असल्याचे लिहिले आहे.

१७

हे मल्हारराव (रास्ते) याचे सिंदखेड मुक्कामाचे पत्र असून त्यात माघ शुद्ध १ मिती आहे. सिंदखेडच्या लढाईच्या कालावधींतील ही मिती धरून याचा दिवस चित केला आहे.

पेशव्याने रास्त्यांना दिलेल्या शिवनेरी किल्याचे सबनिशीवर बाबाजीपंत भ्यंकर) यास ठेवावे असे मल्हारराव (रास्ते) आप्पा (भिकाजीनाईक रास्ते) ात्या (सदाशिवनाईक रास्ते) यांना सुचवीत आहे.

१८

या पत्रात ' भाद्रपद शुद्ध ९ व पेशव्यांचे सैन्य श्रीरंगपट्टणकरांची ठाणी घेत ूरास चालले आहे. ' असे दोन कालोल्लेख आहेत. इ. १७५८ त पटवर्धन व ो यांची सैन्ये श्रीरंगपट्टणकरांनी घेतलेला प्रदेश सोडविण्यासाठी बंगलूरास ली होती, त्यावरून हे पत्र इ. १७५८ त घातले व पत्रातील कालोल्लेखावरून स निश्चित केला.

करारप्रमाणे श्रीरंगपट्टणकर खंडणी व बाकी देईना म्हणून रास्त्यांचे सैन्य ूरवर चालले आहे असे पत्रलेखक भिकाजीनाईक आप्पास कळवीत आहे.

१९

हया पत्रात 'भाद्रपद शुद्ध ९' असा कालोल्लेख आहे व मुक्काम कनकनहळ्ळी . पत्र क्र. १८ चा काल व मुक्काम हया पत्राशी जुळतो व ग्राहकही आप्पा हाच म्हणून या पत्रास पत्र क्र. १८ ची तारीख दिली.

२०

या पत्रात 'भाद्रपद शुद्ध ९ व पेशव्यांचे सैन्य श्रीरंगपट्टणकरांची णीठा त बंगलूरास चालले' असे कालदर्शक उल्लेख आहेत पेशव्यांना दिलेला प्रांत गपट्टणकरांनी परत घेतला तो सोडविण्यासाठी इ. १७५८ त पटवर्धन व रास्ते सैन्ये बंगलूरकडे चालली होती. त्यावरून हे पत्र इ. १७५८ त घातले व ील कालोल्लेखावरून दिवस निश्चित केला.

श्रीरंगपट्टणकर ठरविलेली खंडणी देत नाहीत. त्यांच्याकडून खंडणी घेण्याचा करार न करता त्यांचा मुलूखच घ्यावा असे पेशव्याचे धोरण असल्याचे मल्हारराव (रास्ते) आप्पा (भिकाजीनाईक रास्ते) यास कळवीत आहे

२१

या पत्राची तारीख छ १६ साबान आहे व पैवस्ती शक ८२ चैत्र वद्य १० आहे. शक ८२ म्हणजे शक १६८२ समजला पाहिजे. यात चैत्र व साबान एकमेकाशी जुळतात त्यावरून ह्या पत्राचा दिवस निश्चित केला.

उद्गीरच्या लढाईनंतर झालेल्या तहात मोगलाकडून पेशव्यांना विजापूर मिळाल्याचा उल्लेख व इलकलचे ठाण्यावर हणमसागरकरांनी चढाई केल्याचे बालाजी कृष्ण देसायाने बाबासाहेबास कळविलें आहे.

२२-२४

या तीन पत्रांचा मुख्य आशय इ. १७६० च्या शेवटी सदाशिवरावभाऊ व अब्दाली यांचे झुंज चालू असता भाऊस इकडून साहृय पोचविण्याचा प्रयत्न करणे हा आहे. यामुळे या पत्रांचे काल ठरविणे सोपे गेले. ती इ. १७६० च्या शेवटी घातली पाहिजेत. त्या कामासाठी इ. स. १७६० च्या आरंभी झालेल्या उद्गीरच्या लढाईनंतर काही महिन्यांनी बाबापे बाहेर पडला. या तिन्ही पत्रांचा लेखक मल्हारराव रास्ते प्रथम पुण्याहून निघाला तो बाबापे खडर्यास असता त्यास जाऊन मिळाला. तत्पूर्वी बाबापेने करमाळ्यास जानोजी निंबाळकर आणि खडर्यास व्यंकटराव निंबाळकर यांची भेट घेतली आणि त्यांजकडून त्यांची काही फौज पेशव्यांच्या चाकरीस देण्याचे मान्य करून घेतले. खडर्यास असता बाबापेस भेटण्यासाठी आलेल्या निजामअलीखानाच्या वकिलास त्याने सुचविले की, आम्ही उत्तरेत सदाशिवरावभाऊच्या सहाय्यास जात आहो, निजामाने आमच्या सहाय्यास यावे. निजाम व आम्ही मिळून अब्दालीचे पारिपत्य करू. याच हेतूने त्याने रघुनाथरावास (दादा) बीड येथे मुक्काम असता निजामाकडे पाठविले व त्यास सांगितले की, तो तात्काल येत असेल तर त्यास घेऊन उत्तरेत जावे. त्याप्रमाणे दादा निजामाकडे जावयास निघाला. नंतर बाबापेने पत्रलेखक मल्हारराव रास्ते यासही दादाकडे रवाना केले. निजाम येईल न येईल याजविषयी मल्हाररावास शंका आहे. त्याचे मत असे की, ' आमचेकडे (बाबापे दादा व मल्हारराव) फौज थोडी आहे हे पाहून निजाम सहाय्यास येण्याबाबत टाळाटाळ करील. तसे झाले तर कदाचित् निजाम व आम्ही यांमध्ये बिघाडही होईल. आमचेकडे पुष्कळ फौज असती तर बरे झाले असते, ' या तीन पत्रांत निरनिराळ्या व्यक्तींचे पुढीलप्रमाणे मुक्काम आले आहेत.

बाळाजी बाजीराव	रघुनाथराव	मल्हारराव	निजाम
१ करमाळे	बीड	पुणे	निर्मळ
२ खर्डे		खर्डे	कुंडलवाडी
३ बीड		मनरथ	
४ राक्षसभुवन		रामपुरी	
५ मुंगीपैठण			

या तीन पत्रात मिळून भाऊसाहेबाविषयी काही किरकोळ माहिती आली आहे ती अशी : अब्दाली (यमुना) नदी उतरून दिल्ली व भाऊसाहेब यांमध्ये आला. एकदा मराठ्यांच्या तोफखान्याने त्याची फौज मारून काढली. तथापि रोज भाऊसाहेब व अब्दाली यांची तोफांची लढाई होत आहे.

२५

या पत्रात पानपतच्या तिसऱ्या लढाईसंबंधी काही माहिती आल्यामुळे या पत्राचा काल त्या लढाईच्या सुमाराचा आहे हे ओघानेच आले. त्याप्रमाणे या पत्राला काल दिला आहे. आपाजी राम (गाडगीळ) आपा (भिकाजी नाईक रास्ते) यास वऱ्हाडातील बाळापूर परगण्यापैकी घाट उंदरी नजीकच्या मुक्कामावरून हे पत्र लिहीत आहे. यात कार्तिक वद्य ३० (इ. १७६० डिसेंबर) या दिवशी सदाशिवरावभाऊ आणि अब्दाली यांमध्ये जी लढाई झाली व जीत बळवंतराव मेहेंदळे गोळी लागून मेला, तिचे काही वर्णन आले आहे. आज अशी समजूत आहे की बळवंतराव मेहेंदळे मेल्यावर त्याचे डोके अब्दालीचे लोक कापून घेऊन गेले. पण येथे दिलेल्या माहितीवरून दिसते की, भाऊनी निकड करून मेहेंदळ्याचे मस्तक सोडवून आणले. याच लढाईत नजीबखान रोहिल्याच्या दंडास गोळीची जखम झाली व अब्दालीचा बक्षी जहानखान ठार झाला. असेही नमूद आहे. २२ ते २४ या पत्रांत बाबापेने निजाम मराठ्यांच्या मदतीस यावा म्हणून दादास त्याजकडे पाठविले होते, त्यावर दादाचे पत्र आले की, निजाम यावयाची टाळाटाळ करीत आहे. तेव्हा बाबापेने त्यास लिहिले की तो येत असेल तर ठीकच, नाही तर तो नीट वागत नाही म्हणून त्याचे निर्मूळ करावे. या वेळी वऱ्हाडातील जानोजी भोसले हा नागपुराकडे जाण्यासाठी ५ ६ हजार फौज घेऊन आला होता. पण बाबापेच्या सूचनेवरून तो बऱ्हाणपुराकडे येऊ लागला. बाबापेचा बेत आहे की, आवश्यकतेप्रमाणे त्यास दादाकडे रवाना करावे. पण निजाम साहचार्थ आला तर दादा, भोसले व निजाम यांनी भाऊच्या मदतीस जावे. क्र. २२ च्या पत्रात बाबापे लग्न करून काशीस जाण्याचा बेत करीत आहे असे नमूद आहे. या पत्रात त्याप्रमाणे त्याने लग्न केल्याचे सांगितले आहे.

२६

हे पत्र मल्हारराव रास्ते यानें आपले वडील आपा यास लिहिले आहे. यातही पानपतच्या तिसऱ्या लढाईचे अखेरचे वर्तमान आहे. यामुळे याचा काळ ठरविणे सोपे गेले. या वेळी मल्हारराव विजापुरास आहे. तेथे येण्यापूर्वी व उद्‌गीरच्या लढाईनंतर निजामाकडे येणाऱ्या दादाच्या आज्ञेवरून मल्हारराव भालकी चिटगोप्याची खंडणी वसूल करून पंचमहालात गेला आणि त्याने गुणमटकल, लोकापल्ली नारायणपेठ, धनवाट इ. ठाणी घेऊन ती कमाविसदारांच्या हवाली केली. तेव्हा दादाने यास व सखारामपंत बोकील यास कोल्हापुरचे काम उरकण्यास पाठविले. पण पुन्हा पत्र आल्यावरून ते विजापुरास आले. तोवर दादाही विजापुरास आला होता. एवढ्यात बाबापेकडील पानिपतच्या वाताहतीचे मोघम पत्र आले. ताबडतोब बाबापेस जाऊन मिळण्यावद्दल त्यात दादाला लिहिले होते. पण पत्रलेखकाच्या मताने रघुनाथरावास बाबापेचे अगत्य नाही त्याचे तिकडे काहीही होवो, आपण जाऊ नये, असा त्याचा बेत आहे. कोणी सांगितले तर ऐकत नाही. भाऊसाहेब मेले असतील तर या राज्याचे काय होईल ते सांगता येत नाही असेही मल्हाररावास भय वाटले. दादा त्यास फौज घेऊन तुम्ही बाबापेकडे जा असे सांगत होता. पण मल्हाररावाने त्यास स्वतंत्रतेने जाण्याचा अनुभव नसल्याने ते ऐकले नाही. आता दादाचा बेत आहे की त्याची काही फौज आबाजीनाईकाबरोबर कर्नाटकात पाठवावी आणि काही फौज कोल्हापुरच्या कार्यासाठी पाठवावी. काही झाले तरी हिंदुस्थाना जावयाचे नाही असा पक्का निश्चय दादाने केला असल्याचे या पत्रात नमूद आहे.

२७

पानपतच्या वाताहतीची बातमी समजल्यावरून निजामाने थोडा जोर धरल्याचे या पत्रांत दिसत आहे. म्हणून या पत्रास पानपतच्या लढाईनंतर लगतचा काल दिला आहे. तथापि यातील हकीकत नीट समजण्यास अधिक पत्रांची आवश्यकता आहे.

२८

क्र. २७ मध्ये निजामाने पेशव्यांविरुद्ध थोडा जोर केल्याचे सांगितले आहे त्याच्या पुढचा तपशील या पत्रात आहे. निजाम पुण्यावर चालून येण्याच्या बेताने निघाला होता. तथापि मराठ्यांकडील दादा, मल्हारराव रास्ते, व गोपाळराव पटवर्धन, जानोजी भोसले, इत्यादींची फौज एकत्र होत आहे असे पाहून तो औरंगाबादेस गेला. याच सुमारास निजामाच्या मदतीस आदवानीहून २–३ शे स्वार व २ हत्ती येत होते. त्यावर गोपाळराव पटवर्धनास पाठविले. तो २०० तट्टे व २ हत्ती लुटून घेऊन आला. नंतर दुसरे दिवशी दादाने मल्हाररावास, नाबाजी जाधव व खंडागळे निजामास मिळण्यासाठी येत असता त्यांवर पाठविले. पण हे लोक

मल्हाररावाने प्रयत्न करूनही त्याच्या तावडीत सांपडले नाहीत. ते पळून औरंगाबादेत दाखल झाले. दादाचा कारभार विचित्र होता. त्याने गोपाळराव पटवर्धन रात्रीच्या पहाऱ्यास गेले असता त्याचा व नागोराम भागवत यांचा गोट अंशतः लुटला. यामुळे गोपाळराव रूसून निघून जात होते. पण थोरल्या माधवरावाने त्याची समजूत घातली. मल्हारराव एकंदरीत दादाच्या कारभाराविषयी अत्यंत नाराज आहे असे या पत्रावरून दिसते.

२९

या पत्रात मिरजेच्या वेढ्याचा निर्देश आहे. दादा व गोविंद हरि पटवर्धन यांमध्ये काही बेवनाव झाल्यावरून दादाने थोरल्या माधवरावासह इ. १७६३ च्या आरंभी मिरजेस वेढा घातला होता. त्या दृष्टीने याची तारीख ठरविली आहे. त्याच वेळी निजामाच्याही काही हालचाली चालू होत्या. नागपूरचा जानोजी भोसले हा त्या सुमारास नीरा–नरसिंगपुरावर आला होता. पण तो निजामास मिळणार नाही असा पत्रलेखक मल्हारराव रास्ते याचा अंदाज आहे. त्याप्रमाणे पेशव्यांनी त्यास बोलावणे पाठविले होते. कर्नाटकच्या स्वारीवर जाण्यासाठी रामचंद्र गणेश (कानडे) याने प्रस्थान केले असेही या पत्रात आहे. या वेळी रामचंद्र गणेश या एकटचालाच पेशव्याने कर्नाटकच्या स्वारीवर पाठविले होते की काय हे समजत नाही.

३०-३२

इ. १७६३ च्या पहिल्या सहामाहीत एका बाजूने निजाम, दुसऱ्या बाजूने प्रतिनिधीचा मुतालिक गमाजी यमाजी व तिसऱ्या बाजूने हैदर यांचा दंगा चालू होता. या उलट दादा व थोरला माधवराव हे निजामाच्या प्रदेशात दंगा करून निजामाला आपल्या प्रदेशात परत आणण्याचा प्रयत्न करीत होते. महाराष्ट्रातील दंग्यासंबंधी या ४ पत्रात उणी–अधिक माहिती आली आहे. आणि तिच्या आधाराने या पत्रांना इ. १७६३ हे साल दिले आहे. क्रमांक ३० मध्ये पक्की बातमी नाही. पण क्रमांक ३१ मध्ये पत्रलेखक मल्हारराव इ. १७६३ मार्च २२ (वैशाख शुद्ध ८) या दिवशी वऱ्हाडातील मलकापूर गावी श्रीमंताजवळ गेल्याचे लिहितो. नंतर पेशवे व पत्रलेखक उंदरीचा घाट चढून आले. त्या वेळी पेशवे व निजाम यांत चौदा कोसांचे अंतर होते. तेव्हा पेशव्यांनी निजामाशी लढाई दिली नाही. ते फरदापूर (अजिंठे) च्या घाटाने औरंगाबादेकडे आले आणि त्यांनी इ. १७६३ मार्च ३० या दिवशी पाथर्डीजवळच्या नागतळे या गावी मुक्काम केला. हे पाहून निजामही पेशव्यांच्या मागे आला. तो जर महाराष्ट्रात आला तर मोठे संकट आहे; कारण पेशव्यांच्या घरात फितुरी फार झाली आहे; कोणाचा विश्वास कोणावर नाही;

...७

मात्रागमनी लोक निजामास जाऊन मिळाले; तथापि परमेश्वरी इच्छा व पेशव्यांचे दैव यामुळे काय होईल ते होवो; इत्यादी विचार पत्रलेखकाने नमूद केले आहेत. क्र. ३२ च्या पत्रात निजामाने नगरास वेढा घातल्याचे नमूद केले आहे. या मूळ पत्राचा काल १७६३ एप्रिल २६ असा ठरविला आहे. या वेळीही नगराचा वेढा चालू होता, एवढे म्हणता येते. या पत्रात महाराष्ट्रात जो दंगा उसळला आहे तो लक्षात घेता वाईजवळच्या पांडवगडावर, तो आपल्या ताब्यात असल्यास तेथे स्वसंरक्षणासाठी जावे असे मल्हारराव रास्ते आपल्या वडिलांस सुचवीत आहे. त्याचबरोबर रघुनाथराव पेशव्यांच्या चंचलतेबद्दलही नाराजी प्रकट करीत आहे.

३३

या पत्राच्या कालाबद्दल प्रथम लिहिले पाहिजे. हे पत्र इ. १७६३ मधील आहे. हे निश्चित. पण या वर्षी जंत्रीत अधिक ज्येष्ठ महिना दिला आहे आणि येथे कालाचा योग अधिक ज्येष्ठ महिन्यात जुळतो म्हणून या पत्राची तारीख देताना अधिक ज्येष्ठ घातला आहे. महाराष्ट्रात जी पंचांगे चालू होती त्यात ज्येष्ठ महिना अधिक नसून आषाढ महिना अधिक दाखविला आहे. तेव्हा येथे ज्येष्ठ शु. ५ मंगळवार असा काल दिला असला आणि हा योग जंत्रीप्रमाणे अधिक ज्येष्ठात जुळत असला तरी त्यावर्षी अधिक ज्येष्ठ नव्हता; अधिक आषाढ होता. तेव्हा या महिन्यापुरता येथे अधिक ज्येष्ठ समजू नये. या पत्रात कर्नाटकात हैदराने व त्यास मिळालेल्या इतर लोकांनी दंगा उत्पन्न करून गोपाळराव पटवर्धनाकडील वंकापूर ठाणे घेतले, तसेच याच वेळी पेशव्याकडून विजापूरचे ठाणे हस्तगत करण्यासाठी निजामाची ५००० फौज विजापुरास आल्याचे सांगितले आहे. शिवाय बागलकोटाखेरीज पेशव्यांची विजापुराकडील इतर सर्व ठाणी निजामाच्या हातात पडली असे नमूद केले आहे. मागील क्र. २५ च्या पत्राचा धागा धरून येथे भिकाजीनाईकास, हाती आलेल्या पांडवगडावर जमेल त्या वस्तू व मनुष्ये घेऊन जावयास सांगितले आहे. याच पत्रात नगरचा मराठ्यांचा अधिकारी नारो बाबाजी (अभ्यंकर) आणि पाराजीपंत या दोघांस निजामाने पकडल्याचे, त्यांजकडून ८ लाख रु. खंडणी मागत असल्याचे आणि पेशव्यांचे सैन्य भागानगर येथे असल्याचे सांगितले आहे.

३४

या पत्रात संपूर्ण कालाचा निर्देश आहे त्यात गमाजी यमाजो (मुतालीक) याने चालू केलेल्या दंग्यात त्याची स्वारी शिरवळवर झाल्याचे या पत्रात नमूद आहे. क्र. ३८ च्या पत्रांत गमाजी यमाजीचा मुक्काम म्हसवे (जावली-सातारा) येथे असून मुधोजी भोसले त्यास मिळण्यासाठी येणार असल्याचे सांगितले आहे.

३५

या पत्रात 'आषाढ वद्य दशमी गुरुवार व हैदरखानाचा सावनूरास वेढा' असे दोन कालोल्लेख आहेत. इ. १७६३ त हैदरखानाने सावनूरवर स्वारी केली होती त्यावरून हे पत्र त्या वर्षात घातले. पत्रात मिति आहे त्यावरून तारीख निश्चित केली.

या पत्रात भिकाजीनाईक रास्ते याचा एक मुलगा बाबा याची बायको मेल्याचे, तसेच मराठी लष्कर नगरच्या सुमारास आल्याचे आणि हैदरखानाने सावनूरच्या नवाबास लुटून बंकापुरास वेढा घातला आहे व अजून बंकापूर विरोध करीत आहे असे सांगितले आहे. क्र. ३३ च्या पत्रात बंकापूरच्या ठाण्यावर निजामाचे निशाण लागले असे सांगितले आहे. ते पत्र इ. १७६३ मे १८ चे आहे. तर प्रस्तुतचे पत्र इ. १७६३ ऑगस्ट ४ चे आहे. तेव्हा क्र. ३३ च्या पत्रातील बातमी चुकीची होती असे दिसते. या पत्रात निजाम व हैदर हे एकमताने वागत असल्याचे ही सांगितले आहे.

३६

या पत्रात 'श्रावण वद्य १२ रविवार, मोगलाकडून मुरादखान तह करावयास आला व माहादजी निंबाळकरांचे स्वाधीन केलेले जाधवराव तेथून पळोन गेले' असे कालदर्शक उल्लेख आहेत. इ. १७६३ त राक्षसभुवनचे लढाईचे वेळी मोगलाकडून मुरादखान मध्यस्ती करीत होता व त्याच सुमारास रामचंद्र जाधवराव मोगलास सोडून पेशव्याकडे आला. त्यावरून हे पत्र त्या वर्षात घातले व पत्राचा काल निश्चित केला.

या पत्रात इ. १७६३ ऑगस्ट १० रोजी राक्षसभुवनच्या लढाईत पेशव्यांचा जय झाल्यानंतर निजाम व पेशवे यांमध्ये तह करण्यासाठी निजामाकडून मुरादखान आला असता झालेल्या वाटाघाटी नोंदल्या आहेत. त्यात निजाम साठ लक्षाची जागीर द्यावयात तयार झाला, पण पेशवे जाधवरावाच्या जागिरींसह एक कोटीची जागीर आणि अंतुर वगैरे दोन-तीन किल्ले मागत आहेत. शेवटी पेशव्यांच्या इच्छेप्रमाणे सल्ला होईल असे पत्रलेखकाचे मत आहे. तसेच पेशव्यांच्या दरबारात चिवडाचिवड करणारे किंवा बोटे घालणारे बारभाई सरदार पुष्कळ जमले आहेत, त्यामुळे कोणाचे वजन केव्हा जास्त होईल किंवा कमी होईल हे सांगता येत नाही. तथापि भोसले व होळकर म्हणतील तसे होण्याचा रंग आहे. राक्षसभुवनची लढाई जिंकल्यावर निजामचे जे सरदार कैद झाले होते त्या सर्वांना सोडून दिले आणि जे महादजी निंबाळकर याच्या स्वाधीन केले होते ते पळून गेले अशी माहिती या पत्रात आहे.

३७

या पत्रात ‘ सासवडचा वाडा जुंजतो, पुणे शहरचा पैसा दिला दिला नाही, व श्रीमंत धारूरावर ’ असे कालदर्शक उल्लेख आहेत. पानिपत लढाईनंतर इ. १७६३ त मोगलानी पुणे प्रांतावर स्वारी केली व त्याच सुमारास पेशवा मोगलाच्या मुलखात शिरला त्या वेळचे हे पत्र असावे, त्यावरून ते वर्ष या पत्रास दिले. सासवड, पुणे या भागात झालेल्या गडबडीची माहिती सदाशिवनाईक रास्ते दादा (रास्ते) स कळवीत आहे.

३८

या पत्रात ‘ गमाजीबाबा व मुधोजी भोसले फौज घेऊन साताऱ्याचे जवळपास मुक्काम करणार ’ असा कालदर्शक उल्लेख आहे. पानिपतयुद्धानंतरच्या पेशव्याच्या धोरणामुळे काही मराठे सरदार रुसून मोगलाकडे गेले. मोगलाने इ. १७६३ त मराठी राज्यावर स्वारी केली त्यावेळी त्या सरदारांपैकी गमाजीबावा (मुतालीक) व मुधोजी भोसले हे सातारकर छत्रपतीस हस्तगत करणेसाठी सातारा किल्याभोवती फौज घेऊन उतरण्याचा विचार करीत असावेत. त्यावरून हे पत्र त्या वर्षांत घातले आहे.

३९

या पत्रात संपूर्ण तारीख आहे. माधवराव बलाल पेशव्याने मल्हारराव रास्ते यास चार हजार स्वारांचे पथकासाठी कर्नाटक प्रांतात बारा लक्ष रुपयांचा सरंजाम दिल्याचे हे पत्र आहे.

४०–४४

पत्र क्र. ४० व ४२ यांत फक्त महिना व तारीख आहे. वर्ष नाही. पण क्र. ४१ मध्ये वर्ष (श. १६८६) आहे. तथापि क्र. ४०–४४ हीं पत्रें एकाच विषया-संबंधी असल्याने तीं श. १६८६ (इ. १७६४) मध्ये घातली आहेत. या पाचही पत्रांत सावदे परगण्याचा अमल हा एकच विषय आहे. क्र. ४० व ४३ या पत्रांत सावदे परगणा एकाच वेळी, पेशव्यांनी रास्त्यांना सरंजाम दिला व रघुनाथराव-दादाने चिंतो त्र्यंबक लेले यास कमाविशीने दिला. त्यामुळे रास्ते व चिंतो त्र्यंबक या उभयतांच्या कारकुनांची आपसात कटकट झाली. परगण्याचे जमीदार (देशमूख-देशपांडे) व मोकासदार यांनी महालातील वसुली बंद ठेऊन तात्पुरती तडजोड घडवून आणली रघुनाथराव दादाच्या तर्फेने बऱ्हाणपूरच्या सुभेदाराचा या परगण्यास उपद्रव होत असल्यामुळे गावोगावचे पाटील व रयत यांना चिंतो त्र्यंबकचा अमल नकोसा झाला. म्हणून ते गावे सोडून गेले. हा परगणा रास्त्यांनी आपल्या सरंजा-

घ्यावा नाही तर कमाविशीने तरी करावा असा गावकऱ्यांचा आग्रह आहे. कीकत पत्रलेखक भाऊ (रास्ते) ना कळवीत आहे. क्र. ४१, ४४ हीं पत्रें थ बाजीरावाने अनुक्रमे रास्त्यांचा कारकून व सावद्याचे देशमुख-देशपांडे यांना ली आहेत. त्यांत चितो त्र्यंबककडे दिलेल्या (सावदे परगण्याच्या) कमावि- अडथळा येऊ देऊ नये अशी आज्ञा आहे. क्र. ४२ चे अशाच मजकुराचे पत्र शचा सुभेदार नारो कृष्ण याने मल्हार बहिरवास लिहिले आहे. या तीनही संपूर्ण कालनिर्देश आहेत.

४५

या पत्रात संपूर्ण काल आहे. पांडवगडावरील शिबंदीपैकी सतरा असामींना मंजूर केल्याचे हे पत्र आहे.

४६

या पत्रात संपूर्ण काल आहे. रास्त्यांच्या शिरंबे गावाकडून वासुदेवबाबा तालीक) यांनी पैसा जबरदस्तीने घेतला. त्याच्या मोबदल्यास रास्त्यांनी देवबाबाच्या आसेगावचे पाटलास धरून आणले. तेव्हा आसेगावकरांनी ऐवज करून पाटील सोडविला त्यासंबंधी हे पत्र आहे.

४७

या पत्रास संपूर्ण काल आहे. पांडवगडावरील शिबंदीपैकी बावीस असामींना मंजूर केल्याचे हे पत्र आहे.

४८

या पत्रात संपूर्ण काल आहे. आनंदराव भिकाजी रास्त्याकडे असलेल्या ळकोट वगैरे महालासंबंधी ऐन जिनसी, हशम व राऊत यांचे हिशेब, गावाचे ब त्याचप्रमाणे तोफा व इमारतींचा झाडा आणि बदामी किल्ल्याचा हिशोब ारात आणून देणे म्हणून माधवराव बल्लाळ प्रधान यांचे हे पत्र आहे.

४९

या पत्रात संपूर्ण काल आहे. आनंदराव भिकाजी रास्त्यास सरंजाम दिलेल्या पूर प्रांतातील प्रतिनिधीचा सात महालांचा बाबती अमल, तीन महालांची ई व दोन गावे इतके वजा करून याचे मोबदल्यात त्यास हिपरगे परगण्या- गावे नेमून दिल्याचे माधवराव बल्लाळ प्रधान याचे हे पत्र आहे.

५०

या पत्रात 'चौदा रमजान, गणपतराव रास्त्याचा काल व चन्नपट्टणची लूट' असे कालदर्शक उल्लेख आहेत. इ. १७७१ त झालेल्या हैदरअलीवरील स्वारीत गणपतराव रास्ते होता. त्यावरून हे पत्र त्या वर्षात घातले. पत्रात तारीख आहे त्यावरून काल निश्चित केला.

५१

या पत्रात 'ज्येष्ठ शुद्ध दशमी बुधवार, त्रिंबकराव मामास सोडून पुढे न यावे' असे कालदर्शक उल्लेख आहेत. इ. १७७२ मध्ये त्रिंबकराव मामा कर्नाटकाच्या स्वारीवर गेला आहे. म्हणून हे पत्र त्या वर्षात घातले आहे. पत्रातील मितीवरून याचा काल निश्चित केला. या वेळेस माधवराव बल्लाळ प्रधान आजारी आहे असे लेखक भाऊसाहेब (रास्ते) यास कळवीत आहे.

५२

या पत्रात संपूर्ण कालनिर्देश आहे. गुजराथेत सरंजाम दिलेल्या बहादरपुरा परगण्यातील ठाणी कमाविसदाराचे हवाली करणेबद्दल गणपतराव भिकाजी रास्ते भाणा मदनजीस कळवीत आहे.

५३

या पत्रावर पैवस्तीचा संपूर्ण काल आहे. लग्ननिश्चयाचा खासगी मजकूर, अली बहादरकडून गुलाम कादरचा पराजय व फौजभरती या गोष्टी काशिनाथ गणपत रास्ते माधवराव (रास्ते) यास कळवीत आहे.

५४

रमाबाई पेशवे अस्पृष्ट झाल्याने थोरल्या माधवराव पेशव्यास येण्यास उशीर झाला असे पत्रलेखक कळवीत आहे.

५५

गैरसोयीमुळे लश्कराबरोबर जाणे अशक्य असेल तर आण्णासाहेब जेजूरी-वरून लश्करांत जाणार आहेत, त्यांचेबरोबर सरंजामाची सोय आहे. थोडे थांबून यमाजीपंता (मुतालीका) चे कामाचा उलगडा करावा असे पत्रलेखक तात्या (सदाशिवनाईक रास्ते) स कळवीत आहे.

५६

विठोबा नाईक (रास्ते) यांचे घरची कबुतरे पाठवून देण्याबद्दल छत्रपती शाहूने पाठविलेले पत्र त्यास द्यावे व बेकैदी चाकरास शिक्षा करावी असे सदाशिव (रास्ते) आप्पा (भिकाजीनाईक रास्ते) स कळवीत आहे.

५७

गमाजीबाबा (मुतालीक) च्या कहीने तासगांवचे गवत नेल्याने वैरणीस तुटवडा आला म्हणून घोड्याची रवानगी केली असे सदाशिव नाईक रास्ते भाऊस कळवीत आहे.

५८

(पेशव्याच्या) स्वारीबरोबर येण्यासाठी बोलावणे आल्यावर सत्वर निघून यावे असे पत्रलेखक भाऊ (रास्ते) स कळवीत आहे.

५९

या पत्रात मार्गशीर्ष शुद्ध १३ गुरुवार ही मिती आहे. परंतु वर्ष समजण्यास साधन नसल्याने कालनिश्चय होत नाही. वाई देशाच्या संरक्षणाची जबाबदारी भाऊसाहेब (रास्ते) याजवर नाही असे पत्रलेखकाचे म्हणणे आहे.

६०

या पत्रात अश्विन शुद्ध १ शनिवार अशी मिती आहे. परंतु वर्ष समजण्यास साधन नसल्याने कालनिश्चय होत नाही. पेशवा व राघोबादादा यांनी दमाजी गायकवाडावर साडेदहा लाख रुपयांच्या वराता केल्या. त्यांचा ऐवज गायकवाडाचे दिवाण रामचंद्र बसवंत व कृष्णाजी नाईक कडू यांची दमाजीशी भेट होईल तेव्हा वसूल होईल व राघोबादादाने दमाजीस हिंदुस्थानांत बोलाविले असल्याने दमाजीस पेच पडला आहे असे पत्रलेखक भाऊ (रास्ते) स कळवीत आहे.

६१

नाशिकाहून सैन्याची खानगी जंबूसरला झाल्यावर यजमानासह थोरल्या श्रीमंताबरोबर (नानासाहेब पेशव्याबरोवर ?) पुण्यास आलो असे पत्रलेखक रावसाहेबास कळवीत आहे.

६२

या पत्रात गमाजीबाबा (मुतालीक) व मोरोपंत पटवर्धन यांच्या सैन्याच्या हालचालीबाबत पत्रलेखक चौकशी करीत आहे. इ. १७६३ त काही मराठे सरदार रुसून मोगलाकडे गेले त्यांत मुतालीक व पटवर्धन होते. त्यावरून हे पत्र त्या सुमाराचे असावे असे वाटते.

६३

सावद्याचा कमाविसदार बाजी सामराज याजकडे पाठविण्यासाठी लोक धाडले आहेत. त्यांजकडून चाकरी करवून घ्यावी व त्यांना वस्त्रे आणि जरुरीप्रमाणे पैसा

घावा. भोरपकरांनी दंगा केला असल्याने पांडवगडास नामजाद लोक पाठविणे अशक्य दिसते असे पत्रलेखक भाऊ (रास्ते) यास कळवीत आहे.

६४

या पत्रात श्रीरंगपट्टणवालियाचे हैंदरनाईकाशी चन्नपट्टणास झुंज झाले असा कालोल्लेख आहे. हैंदरनाईक श्रीरंगपट्टणचा नंदराज याच्या नोकरीत असताना इ. १७५९ त गोपाळराव पटवर्धन व रास्ते यांचेशी त्याचे युद्ध झाले आहे त्यावरून हे पत्र त्या वर्षातील असावे असे वाटते. श्रीरंगपट्टणाहून चन्नपट्टणास हैंदरनाईका-कडे येणारी मदत दादाने थोपवून बाबाने हैंदर नाईकाचा पराभव केला. त्या वेळी बाबाचे अंगावर झाडाची फांदी पडून दुखापत झाली असे गंगाधर भिकाजी (रास्ते) त्रिंबकपंतास कळवीत आहे.

६५

गुजरात प्रांतात (रास्त्याची ?) ठाणी बसली आहेत. तिकडे चिरंजीव आबाजीपंतास पाठवावे अशी पांडुरंग चिमणाजी भाऊ (रास्ते ?) यास या पत्रात विनंती करीत आहे.

६६

बाबासाहेब (रास्ते) याचे मोगलांशी युद्ध झाल्याचे वर्तमान व पारनेर भागात चोरांचा उपद्रव सुरू असल्याने बागडकोटाहून प्यादे आणून (वाईच्या) वाड्याचे रक्षण करावे असे पत्रलेखक भाऊ (रास्ते) यास कळवीत आहे.

६७

राजापूर प्रांत हबशाकडून पेशव्यांनी घेतल्यावर तो सुभा खंडोजी माणकर यास सांगितला. खंडोजीने सुभ्याची फडणिसी पुंडलीकनाईक (रास्ते-फाटक) याच्या नावे करून घेतली. पुंडलीक नाईक याने नेमलेल्या दोन गुमास्त्यांनी फडणीशी चांगली केली. नंतर नेमलेला गोविंद विष्णू हा लायक नव्हता म्हणून दुसरा लायक गुमास्ता पाठवावा असे खंडोजी माणकर भिकाजीनाईक रास्त्यास कळवीत आहे.

६८

श्रीमंत (नानासाहेब पेशवा) जानबा निंबाळकर व सय्यिदलश्करखानासह भीमा पार होऊन गोदावरीकडे निघाल्याचे मल्हारराव (रास्ते) आप्पा (भिकाजी-नाईक रास्ते) यास कळवीत आहे.

६९

तोफांसाठी मुक्काम झाला. नानासाहेबा (पेशवे) चे बरोबर तालिकोटास असे पत्रलेखक आनंदराव निंबाजीस कळवीत आहे.

संकीर्णपत्रे

संकीर्णपत्रे या सदरात ७० ते ९१ अशी बावीस पत्रे समाविष्ट केली आहेत. ल क्र. ७० हे जेजुरीचे श्री. पेशवे, क्र. ८१ हे पुण्याच्या जोगेश्वरीचे पुजारी श्री. चंद्र दामोदर बेंद्रे, क्र ८६,९१ ही डॉ. सौ. कमलाबाई गोखले; यांजकडून ली; आणि उरलेली सर्व पत्रे मंडळ संग्रहापैकी (क्र. ७१–७५,७७–८०,८३, ८७–९० दाभाडे दफ्तरातील व ७६,८२–८४ गुप्ते दफ्तरातील) आहेत.

७०

मूळ पत्र फार्सी–मराठी म्हणजे द्वैभाषिक आहे. अजमगड ऊर्फ पुणेधर दर) किल्ल्याच्या संरक्षणासाठी पाठविलेल्या खान वगैरे अधिकाऱ्यांना याभोवती वीस तीस कोसांच्या परिसरात गनीम आल्यास त्याची वर्दी दिलीच जे असा जेजुरीच्या मोकदम व रयत यांना या पत्रात हुकूम दिलेला आहे. या त कसूर केल्यास बायका-मुलांसह कापले जाल अशी धमकीही यात आहे. औरंगजेबाच्या चाकराने पाठविले आहे.

७१

या पत्रात ' फाल्गून शुद्ध २ ' व ' कर्नाटकची मोहीम ' असे दोन कालदर्शक त आहेत. छत्रपती शाहूने इ. १७२७ मध्ये कर्नाटकात स्वारी पाठविली त्या हे पत्र घातले आहे व पत्रातील मितीवरून काल निश्चित केला.

७२

या पत्रात ' सवाल १८ ' आणि ' कानोजी व राणोजी भोसले यांचे राजश्री नी सख्य करून दिले ' असे दोन कालोल्लेख आहेत. इ. १७२७ मध्ये छत्रपति कान्होजी व राणोजी भोसले यांचा सरंजामाबद्दलचा तंटा मिटविला. त्या- हे पत्र इ. १७२७ त घातले व पत्रातील तारखेवरून काल निश्चित केला. ूर प्रांतात (चौथाईचा) वसूल घेऊन सैन्याचा खर्च भागविण्यासाठी कान्होजी व सदाशिवपंत यांना पाठविल्याचे समजते असे नारो राम (मंत्री) खंडेराव डे सेनापतीस कळवीत आहे.

७३

या पत्रात ' राजश्री स्वामीस सावकाश नाहीसे झाले ' व ' जनार्दनपंत याचा द्र वद्य ७ स मृत्यू ' असे दोन कालदर्शक उल्लेख आहेत. नानासाहेब पेशव्याचा जनार्दनपंत १७४९ त वारला. त्या वर्षात हे पत्र घातले. जनार्दनपंताच्या नंतरचे हे पत्र असल्याने त्या तारखेनंतर असा काल दिला आहे.

७४

छत्रपति शाहूची प्रकृती अधिक बिघडली त्या वेळेचे हे पत्र आहे म्हणून इ. १७४९ त ते घातले. अंबिकाबाई (दाभाडे) ही सोयराबाईचे विचाराने सातान्यास आली, शाहू महाराजांची भेट झाली, खर्चासाठी कर्ज काढण्याचा तिचा प्रयत्न चालू आहे असे पत्रलेखक बाईस कळवीत आहे.

७५

या पत्रांत राजश्री स्वामी (शाहूराजे) आजारी असल्याचा उल्लेख आहे. पत्र क्र. ७३, ७४ व ७५ या पत्रांचा लेखक एकच आहे. पत्र क्र. ७३ मध्ये राजश्री स्वामी आजारी, शहरात गडबड झाल्यास फौज असावी म्हणून पेशव्याची व सौ. मातुश्रीबाई (सकवारबाई) कडील सरदारांची फौज जमा होत आहे असेही आहे. शाहू इ. १७४९ त आजारी होता तेव्हा पेशवे व इतर सरदार यांच्या फौजा सातारेस जमत होत्या. त्यावरून ह्या पत्रास इ. १७४९ हें वर्ष दिलें आहे. पत्र-लेखक स्वतः आजारी आहे. राजश्री स्वामी बरे झालेवर दरबारी जाऊन कार्यभाग करून घेतो असे कळवीत आहे.

७६

या पत्रात संपूर्ण वर्ष व तारखेचा उल्लेख आहे. सातान्याहून आलेल्या (सकवारबाईच्या) पत्रामुळे पेशव्याबद्दल निजामउलमुल्कचे मनात विकल्प निर्माण झाला व रघोजी भोसले आणि उमाबाई दाभाडे यांना सातान्याहून बोलावणी गेली आहेत असे समजल्याचे बाळाजी बाजीराव पेशवा बनाजी माधवरावास कळवीत आहे.

७७

नासिरजंगाने मुतवस्सिलखानाकडून बागलाण प्रांत काढून फतहयाबखानास दिला. परंतु मुतवस्सिलखान हा फतहयाबखानास प्रांताचा अमल देण्यास तयार नसून लोहणेर, मुल्हेर किल्ला वगैरेंची बळकटी करीत आहे. यामुळे त्या प्रांतात युद्ध होण्याचा प्रसंग आल्याचे पत्रलेखक कळवीत आहे.

७८

या पत्रांत संपूर्ण तारीख आहे. पेशव्याने दाभाड्यांची वतने वगैरे त्यांचे-कडून काढून सयाजीराव गायकवाड याचेकडे दिली. तेव्हा सगुणाबाई दाभाडे यांच्या खासगत खर्चासाठी गायकवाडांनी त्या वतनाच्या पैशातून नेमणूक करून दिली त्याबद्दल कमाविसदारास दिलेला हा हुकूम आहे.

७९

या पत्रात संपूर्ण तारीख आहे. त्रिबकराव दाभाड्याची आई मैनाबाई हिने त्याजपासून वेगळे राहू नये. जर वेगळेच राहावयाचे असेल तर नेमून दिलेली रकम घेऊन स्वस्थ राहावे. असे माधवराव बल्लाळ तीस कळवीत आहे.

८०

पत्रलेखक दाभाड्यांचा नोकर असून तो हैदर अलीवरील स्वारींत धारवाड येथे आहे. धारवाडवरील हल्ला व हैदर अलीबरोबर होणारा तह यासंबंधी तो दाभाड्याच्या दिवाणास लिहीत आहे व त्यातच त्याचे वेतन, कर्ज इत्यादिबद्दल काही सूचना देत आहे.

८१

या यादीवर संपूर्ण तारीख आहे. बिदनूर संस्थान हैदर अलीने बुडविले. त्यानंतर पेशव्यांनीं हैदर अलीचे पारिपत्य करण्यासाठीं कर्नाटकात ठेवलेले त्रिबकरावमामा (पेठे) यांनी हैदर अलीचा पराभव केला. त्यामुळे बिदनूरकरांच्या मुत्सद्दी मंडळींना धीर वाटून त्यांनी नरसिंगराव धायगुडे व मादण्णा यांचे मार्फत पेशव्याची भेट घेऊन करार केला की, पेशव्याने आम्हास सैन्याची मदत देऊन बिदनूर संस्थान सोडवून आमचे स्वाधीन केल्यास खंडणी वाढवून देऊ व नजर देऊ. यातील आपाजी रामराव उपयुक्त श्री. भादा. बेंद्रे यांचे पूर्वज आहेत.

८२

सिदी जमरूद व खानजादे (जंजिरेकर) यांची खानसाहेब (जंजिरेकर) याशी भेट होऊ शकली नाही व खानजादे यास त्रास देण्याच्या हेतूने खानसाहेबाने मुलूख ओस करण्याचा विचार केला. त्या वेळी दाताराने मध्यस्थी करून देशाची वाटणी केली व खानजाद्याने मतगडास राहावे असा करार केला. त्यानंतर मतगड घेऊन खानजाद्यास घेऊन येण्यासाठी गोविंदराव माणकरास कोणीतरी मसलत दिल्यावरून तो त्यास कबूल झाला आहे. या पत्राचा प्रारंभीचा व शेवटचा भाग गहाळ झाला आहे.

८३

गोविंदराव गायकवाड पेशवे सरकारचे चाकरीत पुण्यास आहे असा या पत्रात उल्लेख आहे. गोविंदराव इ. १७७५ मध्ये दक्षिणेत आहे. त्यावरून या पत्रास इ. १७७५ हे वर्ष दिले. गोविंदराव गुजराथेत आला तर त्याशी कलह होईल असे कान्होजी गायकवाडाने त्यास कळविल्याचे पत्रलेखक लिहीत आहे.

८४

इंग्रजांचे सैन्य कलकत्याहून पुण्याकडे येऊ लागले त्यावेळीं पुरुषोत्तम महादेव हिंगण्याने बापू (सखाराम बापू) स पत्र लिहून सुचविले आहे की, पेशव्याकडून इंग्रजास असे पत्र यावे की, पेशव्याकडून इंग्रजाशी केलेल्या करारात त्यांनी अंतर आणू नये.

८५

सुरतेचा मुगल मेल्यामुळे पेशव्याचे सैन्य रामनगर प्रांतात आले. अशा वेळी आपला प्रांत सोडून गेल्यास ते सैन्य देश हस्तगत करील म्हणून सध्या चांदखेडास येणे अशक्य वाटत आहे असे खंडेराव गायकवाड सेनाखासखेल दाभाडे यास कळवीत आहे.

८६

या करारनाम्याचा पाठ एक अस्सल व एक नकल यांच्या साह्याने तयार केला आहे. अस्सलांत १,२,५,११, अंशतः १२,१३ व १४ ही कलमे असून उरलेली ३,४,६–१०, अंशतः १२ ही नकलेतून घेतली आहेत. यावर संपूर्ण तारीख आहे. टिपूवर पेशवे, निजाम व इंग्रज या तीन सत्तांनी एकत्र होऊन मोहीम करावी त्यासंबंधी झालेला हा चौदा कलमी करार आहे.

नकलेतील पाठ अस्सलाच्या पाठाशी मिळता असल्याने अस्सलात नसलेली कलमे नकलेतून घेणे समर्थनीय आहे.

८७

या पत्रात 'फाल्गून वद्य ६, नवाब (निजाम) मोहरीचा घाट उतरून खरडे-अलीकडे आला' असे कालोल्लेख आहेत. इ. १७९५ त निजाम मोहरीचे घाटाने आला व खरडे येथे मराठे व मुघल (निजाम) यांचे युद्ध झाले त्यावरून ह्या पत्राची तारीख निश्चित केली. या पत्रावरून खर्ड्यांच्या लढाईत दाभाडे होते असे दिसते. लढाईची व लुटीची हकीकत, तसेच नाना फडणीसाचा स्वभाव इत्यादि-संबंधी दुसरा यशवंतराव दाभाडे आपल्या आईस कळवीत आहे.

८८

या 'पत्रावरील मिती व पैवस्तीचे वर्ष यावरून याची काल निश्चित केला आहे. थोरले माधवरावापासून ते सवाई माधवारावपावेतो पेशवेपदावर आलेल्या व्यक्तींना छत्रपतींनी समारंभपूर्वक पदाधिकार दिले त्याचे वर्णन लेखकाने केले आहे.

८९

या पत्रात फक्त मितीचा उल्लेख आहे. पत्रातील मजकुरावरून हे पत्र शिंदे व भोसले यांचे इंग्रजांशी युद्ध झाले त्या अगोदरचें असावे. त्यावरून या पत्राचा काल निश्चित केला आहे.

पत्रलेखक सेनापति दाभाड्यांना सदर युद्धात भाग घेण्यास अथवा ते न जमल्यास निदान त्यानी खानदेश बागलाण प्रांती येऊन राहावे असे सुचवीत आहे.

९०

या पत्राचा काल निश्चित ठरविता येत नाही. पेशव्याकडील जरीपटका, लगी इत्यादि जिनसा जुन्या झाल्यावर त्यांचे पुढे काय करतात त्याची माहिती पत्रलेखक, बहुधा दाभाड्यांना कळवीत आहें.

९१

या पत्राचा काल निश्चित करता येत नाही. पेशव्याने पोतुगीजांना दिलेल्या नगरहवेली परगण्याचा महसूल व जकात घेण्याचा अधिकार पोर्तुगिजांना असता महसूलाच्या रकमेची मागणी करू नये असे दमणचा पोर्तुगिज गव्हर्नर पेशव्यांच्या बसईच्या सुभेदारास कळवीत आहे.

सूची

(व्यक्तीनामें व स्थलनामें)

नावापुढे दिलेले आकडे पत्रक्रमांकाचे आहेत.

५५८

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकासंबंधी केंद्र शासनाच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम ८ नमुना ४)

१. प्रकाशनस्थळ : भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

२. प्रकाशनकाल : त्रैमासिक (सध्या वार्षिक)

३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : चिं. ना. परचुरे, भारतीय, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०
मुद्रणस्थळ : ज्ञानविलास प्रेस, २७ बुधवार पुणे २

४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : चिं. ना. परचुरे, भारतीय, चिटणीस, भा. इ सं. मंडळ १३२१ सदाशिव पेठ, पुण ३०

५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : म. श्री. माटे, भारतीय, कार्यकारी संपादक, भा. इ. सं. मं., १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

६. मालक व पत्ता : भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

मी चिटणीस प्रकट करतो की, माझी माहिती व विश्वास याप्रमाणे वर दिलेला तपशील अचूक आहे,

१५-९-१९७८

चिं. ना. परचुरे
(चिटणीस)